294 298
म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. ~~१०५~~ १०१५
१८८४

मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याशाळाखातें.

# जगाच्या इतिहासाचें सामान्य निरूपण,

ह्मणजे

## औत्लैन आफ् युनिवर्सल् हिस्तोरी

ह्या नांवाच्या इंग्रजी पुस्तकाचें भाषान्तर


जनार्दन बाळाजी मोडक

त्रान्स्लेशन एक्सिबिशनर

ह्यांनीं केलें, तें

श्रीकृष्ण रघुनाथ शास्त्री तळेकर

देपुती एद्युकेशनल् इन्स्पेक्तर

ह्यांनीं तपासून नीट केलें.



आवृत्ति दुसरी.

सहा हजार प्रती.



ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७च्या २५व्या आक्ताप्रमाणें रजिस्तर केली आहे.



मुंबई.

गवर्नमेंत सेंत्रल बुक दिपो.

इसवी सन १८७४.



(ह्या पुस्तकासंबंधीं सर्व अधिकार सरकारानें स्वाधीन ठेविले आहेत.)


किंमत साडेतीन आणे.

मुंबईमध्यें
एज्युकेशन सोसैटीच्या छापखान्यांत छापिलें.

# तपासणाऱ्याची सूचना.

हा ग्रंथ मेहरबान डैरेक्टर साहेब बहादूर ह्यांच्या हुकुमावरून मुळापासून शेवटपर्यंत तपासून दुरुस्त केला आहे.

ह्या ग्रंथांत प्राचीन आणि अप्रसिद्ध असीं पुष्कळ नांवें आलेलीं आहेत. तीं समजण्यास अडचण पडूं नये ह्मणून त्यांचा एक कोश करून पुढें जोडला आहे, आणि त्यांत त्यांच्या व्याख्या दिल्या आहेत. परंतु ज्या नांवांची माहिती ग्रंथांतले ग्रंथांतच कोठें स्पष्ट लिहिल्यानें आणि कोठें पूर्वापर संबंधानें होते, त्या नांवांच्या व्याख्या दिल्या नाहींत.

जीं नांवें एक दोन ठिकाणीं मात्र आलीं आहेत त्यांच्या व्याख्या जेथल्या तेथेंच खालीं टिपेंत दिल्या आहेत, आणि जीं पुष्कळ ठिकाणीं आलीं आहेत तीं कोशांत घातलीं आहेत. कोशांत ज्या नांवापुढें कंसांत दुसरें नांव लिहिलेलें आहे तें त्याचें इंग्रजींतलें नांव समजावें, आणि वर्णक्रमांत जें आहे तें इकडील भाषांच्या रूढीप्रमाणें होईल तितकें करून लिहिलेलें आहे, असें समजावें.

जेथें देशचालीच्या किंवा दुसऱ्या कांहीं संबंधामुळें हा ग्रंथ दुर्बोध झाला आहे असें वाटलें तेथें तो संबंध समजण्यासाठीं नांवांच्या व्याख्यांशिवाय दुसऱ्याही टिपा खालीं दिलेल्या आहेत. कोठें प्रसिद्ध नांवांच्याही व्याख्या, त्यांविषयीं कांहीं विशेष सांगणें असलें तर दिल्या आहेत.

मोठ्या ठिकाणीं ज्याजवळ प्राचीन इतिहास आणि प्राचीन नकाशे आहेत किंवा ज्यांस ते मिळण्याची सोय आहे, त्यांच्या साठीं ह्या व्याख्या दिलेल्या नाहींत. कारण, त्यांला पाहण्या-ला पुष्कळ साधनें आहेत; परंतु जिल्ह्यांतील मास्तरांजवळ असलें कांहीं एक साधन नसतें. तेव्हां त्यांला हा ग्रंथ शिकविण्याचा कांहीं तरी मार्ग व्हावा, ह्मणून हा व्याख्या देण्याचा यत्न केला आहे.

---

## टीप.

ही दुसरी आवृत्ति रावजी शास्त्री गोडबोले दक्षिणा प्रैज कमिटीचे सक्रतारी ह्यांनीं तपासिली.

# मूलग्रंथ करणाऱ्याची

# सूचना.

---

पुढील धड्यांत जो विषय आहे त्याला इतिहास हें नांव जितकें शोभतें तितकेंच भूगोलाचें वर्णन हेंही शोभतें. कारण ह्या धड्यांपासून (ते फारच संक्षिप्त असल्यामुळें) राष्ट्राच्या स्वरूपापेक्षां त्यांच्या स्थलांतरांचीच विशेष माहिती होते. ह्यास्तव जो कोणी हातीं नकाशा न घेतां हे धडे वाचील, किंवा प्रत्येक धड्याला योग्य जो नकाशा त्याचा पूर्ण अभ्यास करण्यास चुकेल, त्याला हे धडे वाचल्यापासून फारच थोडा फायदा होईल. मनुष्याचे कुळांनीं जे प्रवास केले व ज्या वसाहाती केल्या त्यांचें अगदीं स्पष्ट व ढळढळीत असें स्वरूप तुमचे मनांत नकाशावरून येणार आहे, ही गोष्ट ध्यानांत ठेवा.

कोणत्याही लोकांचें स्वरूप पाहिलें असतां त्याचा भाषा व धर्म ह्या दोहोंशीं अति निकट संबंध असतो. ह्याकरितां नकाशाचीच माहिती समजून इतिहासाचा अभ्यास केला तर तेणेंकरून लोकांची भाषा व स्वरूप ह्यांची माहिती होण्यास मार्ग होतो.

ह्या धड्यांवरून जी माहिती होईल ती करून घेण्याचा मार्ग दाखविण्यासाठीं आणि ती वाढविण्यासाठीं वरिष्ठ प्रतीच्या इंग्रजी शाळांमध्यें खालीं लिहिलेलीं बुकें आणि नकाशे ठेविलेले आहेत. शाळेंत नेमून दिल्याप्रमाणें धडा तयार करावा एवढाच उद्देश मनांत न धरितां कांहीं विशेष उद्देशानें जे हे धडे वाचतील त्यांच्याकरितां हीं बुकें आणि नकाशे ठेविलेले आहेत. आणि

विशेषेंकरून शिक्षक रोजचा शिकविण्याचा धडा तयार करितील त्यावेळेस त्यांस ह्यांचा उपयोग व्हावा ह्मणून ठेविलेले आहेत.

कीथ जान्स्तन ह्यानें केलेलें जुन्या भूगोलाचें बूक.

" " ह्यानें केलेला भूगोल खगोल.

" " ह्यानें इतिहासाप्रमाणें तयार केलेल्या भूगोलाचे आराखड्याचे नकाशे.

स्पूनर ह्यानें इतिहासाप्रमाणें तयार केलेल्या भूगोलाचे नकाशांचें बूक.

हारोचें अर्वाचीन भूगोलाचें शालोपयोगी नकाशांचें बूक.

रालिनसन ह्यानें केलेलें प्राचीन इतिहासाचें बूक.

फिलिप स्मिथ ह्यानें केलेला प्राचीन इतिहास.

गिबन ह्यानें केलेलें रोमन साम्राज्याची उतरती कला आणि लय ह्यांचें वर्णन.

दायर ह्यानें केलेलें अर्वाचीन युरोपाचें वर्णन.

हीरन ह्यानें केलेलें युरोपांतील संस्थानें आणि वसाहाती ह्यांचें वर्णन.

एल्फिन्स्तन ह्यानें केलेला हिंदुस्थानचा इतिहास.

मार्शमन ह्यानें केलेला " "

मार्तिन ह्यानें केलेलें राजमंत्र्याचें वर्षाचें बूक.

तेलर ह्यानें केलेलें प्राचीन इतिहासाचें बूक.

" " अर्वाचीन. " "

इ. क्रे. नं. ना.

हिंदुस्थानांतील स्कूलमास्तरांकरितां

# जगाच्या इतिहासाचें सामान्य निरूपण.

---

## धडा १.

आपणांस मनुष्यांविषयीं जी माहिती असते तिची इतिहासाचा अभ्यास केल्यानें वृद्धि होते. आपणांस दिसून येतें कीं, जे विचार आपले मनांत येतात ते आपल्या पूर्वींच्या मनुष्यांचे मनांत आले होते, व त्या विचारांप्रमाणें ते वागले होते, व चुकल्या ठिकाणीं ते त्यांनीं नीट केलेले होते. आपले अनुभवास ज्या गोष्टी येतात त्या त्यांचे अनुभवास आलेल्या गोष्टींशीं आपण ताडून पाहतों, व अशा करण्यापासून प्राप्त झालेल्या उपदेशाचा व्यय आपण शहाणपणानें केला, तर ज्या लोकांच्या रीतिभाती व विचार करण्याचे मार्ग हीं आपल्या रीतिभाती व विचार करण्याचे मार्ग ह्यांपासून फार भिन्न आहेत, ते लोक आपणापेक्षां वाईट किंवा मूर्ख नव्हते, असें समजल्यामुळें त्यांजविषयीं आपल्या मनांतील वाईट समज आपण कमी करतों. इतिहासाचा उपयोग ह्मटला ह्मणजे असा आहे कीं, तेणेंकरून पूर्वींच्या व हल्लींच्या मानवी कृत्यांची पुष्कळ माहिती होते. एकादा मनुष्य आपले गांवांत एकादी फार दुरून येणारी व फार दूर जाणारी नदी किंवा मार्ग पाहतो. कदाचित् गांवांतून जिच्या पलीकडचें कांहीं दिसत नाहीं अशी एकादी टेंकड्यांची

रांग किंवा एकादें अरण्य पाहतो. मग त्याचें मन शोधक असलें तर आपणास दूरपर्यंत दिसावें ह्मणून सर्वांत उंच जी टेंकडी सांपडेल तीवर तो जातो. मग त्याला दिसून येतें कीं, आपणाखालचे मैदानांत आपलाच कांहीं एकटा गांव नाहीं, आणखी पुष्कळ गांव आहेत त्यांत आपलाही एक आहे; व ज्या टेंकडयांमुळें आपणाला पलीकडचें कांहीं दिसत नाहीं, त्यांच्याच योगानें, ज्या खोऱ्यांत आपला गांव आहे, तें इतर खोऱ्यांपासून निराळें झालें आहे. आपल्या गांवावरून जाणारा रस्ता किंवा नदी आपल्या गांवापेक्षां मोठया गांवाकडे जाते, तिच्या मुखाजवळ बंदरें असलेलीं शहरें आहेत, व पलीकडे समुद्र आहे; व तो दुसऱ्या देशांतून येणाऱ्या व दुसऱ्या देशांत जाणाऱ्या लोकांच्या गलबतांनीं भरलेला आहे, असें त्यास दिसतें. आतां त्या मनुष्याला ह्या टेंकडीच्या माथ्यावरून खालचा प्रदेश फार झालें तर दहा कोसपर्यंत नकाशाप्रमाणें पसरलेला दिसेल. ह्या दहा कोस प्रदेशाचा नकाशा त्याच्या जवळ असला, तर त्या नकाशांतील प्रत्येक स्थल त्याला आपणापुढील प्रदेशांतल्या त्या त्या स्थलाशीं ताडून पाहतां येईल. त्या प्रदेशांत निळ्या मैदानासारखा समुद्र दिसतो. तसाच नकाशांतही निळा रंग देऊन समुद्र दाखविलेला असतो. तशीच वळणावळणांनीं गेलेली नदी दाखविलेली असते. तशाच टेंकड्या जशा खरोखर काळ्या दिसतात तशा काळ्या रंगाच्या छायेनें त्या नकाशांत दाखविलेल्या असतात. परंतु त्या मनुष्याच्या मनांत आणखी देश पहावा, व ज्या समुद्रापलीकडे त्याची दृष्टि पोंचत नाहीं त्या समुद्रापलीकडे कोणकोणते देश आहेत ते समजून घ्यावे असें असलें, तर टेंकडीवर जाऊन काम होत नाहीं. मग तो नकाशा घेतो, आणि त्यांत पाहतांना असें मनांत आणितो कीं, आपल्या गांवा-

२०२५

जवळच्या टेंकडीवरून जसा मी खालीं नजर लावून पाहत होतों, तसाच आतां ह्या नकाशांत दाखविलेल्या देशांकडे मी वरून पाहत आहें. समुद्र जमिनीहून निराळा दाखविलेला आहे, आणि जमिनींत मध्यें मध्यें डोंगरांच्या ओळी दाखविलेल्या आहेत, असें त्याला नकाशांत दिसतें. पण ह्याखेरीज दुसरें त्याला नकाशांत काय दिसतें? तर सृष्टींत दिसत नाहींत अशा रंगाच्या खुणा दिसतात. ह्या निरनिराळ्या लोकांच्या हद्दी दाखविण्या-साठीं नकाशावर करीत असतात. ह्यांचे योगानें मनुष्याच्या कृत्यांचें ज्ञान नकाशावरून होतें. पर्वत, नद्या, व समुद्र ह्यांचे योगानें मनुष्याच्या हातून कसकशीं कृत्यें घडलीं, हें आपणांस समजलें ह्मणजे पर्वतादिकांकडे आपलें चांगलें लक्ष्य लागतें. मग आपण विचारतों कीं, ह्या नदीवर कोणत्या लोकांनीं आपलें शहर वसविलें, व तीमधून आपला माल आणिला? हे पर्वत कोणत्या दोन लोकांच्यामध्यें आहेत? ह्या समुद्रावर कोणता व्यापार मोठा चालतो? आपल्या गांवाच्या हद्दीपलीकडे काय आहे, हें मनुष्य विचारूं लागला ह्मणजे तो इतर मनुष्यांच्या हकीकतीविषयीं आतां विचारूं लागला, असें समजावें. तो ह्मणतो कीं, ह्या गांवांत पुष्कळ हिंदुलोक मी पाहतों, त्यांच्या कांहीं गोष्टी परस्परांशीं मिळतात; पण त्यांच्या जाती निरनि-राळ्या आहेत. मुसलमानही मी पाहतों, त्यांपैकीं कांहीं मोग-ल व कांहीं अरब आहेत. तो दुकानदार पारशी आहे. तो सरकारी कामगार इंग्रज आहे, व त्याचे चाकर पोर्तुगाली आहेत. तर हे निरनिराळ्या राष्ट्रांतले लोक एका गांवांत कसे आले? आमच्या गांवांतील नदी व रस्ता ह्यांच्या सारखे ते निरनिराळ्या दिशांकडून आले आहेत ह्यांत संशय नाहीं, व ह्या पर्वतांच्या पलीकडे ह्यांची स्थिति काय आहे, ह्याजविषयीं समजून घेण्यास

रखें कांहीं तरी असेल. आतां एकाद्या खऱ्याखुऱ्या टेंकडी-वरून खालीं पाहिल्यानें त्याला कांहीं समजणार नाहीं, पण नकाशावरील एकादा कल्पित उंचवटा घेऊन त्यावरून आपण पाहत आहों, असें त्यानें मनांत आणिलें, तर त्याला कांहीं तरी माहिती होईल. इंग्लंद, पोर्तुगाल, हिंदुस्थान, इराण, व अरबस्थान ह्यांच्या मर्यादा हल्लीं जशा आहेत तशा त्यांचे दृष्टीस पडतील. परंतु तो असा प्रश्न करील कीं, हे लोक हल्लीं जेथें असतात तेथें ते आले केव्हां? व तेथून ह्या आमच्या हिंदुस्थानांतील गांवांत आले कसे? ह्यांपैकीं कोणते लोक जय पावलेले, व कोणते पराजय पावलेले? आणि असें कां अनुभव घेऊन हे कोणत्या प्रकारचे झाले आहेत? हे आपले आपणावरच राज्य कसें करतात? ह्यांच्यामध्यें नीति व विद्याचार ह्यांची स्थिति कशी आहे?

आतां येथें शोध करण्याला पुष्कळ जागा आहे, पण ह्यांत भानगडी पुष्कळ आहेत. एकाद्या सपाट मैदानांतून कोणी मनुष्य धालूं लागला असतां, त्याची वाट झाडें, नद्यादिकांचे कांठ, व कुंपणें ह्यांत जाऊन सहज नाहींशी होते. ह्याप्रमाणें पुढें दूर दिसेनासें झालें ह्मणजे मग आपण कोठें जात आहों, व आपणा सभोंवतीं काय आहे, ह्याविषयीं तो अटकळ मात्र करितो, पण त्याला खरें समजत नाहीं. ह्यास्तव बाहेर निघावयाचे पूर्वीं एका टेंकडीवर चढून ज्या देशांत फिरावयाचें असेल तो देश कसा आहे, हें लक्ष्यपूर्वक तो पाहून ठेवील, तर बरें; किंवा मिळण्यासारखा असल्यास त्या देशाचा नकाशा बरोबर घेईल, तर बरें. ह्मणजे जसजसा तो पुढें जाईल तसतसें त्यास त्यांत पाहतां येईल. ह्याप्रमाणेंच जिज्ञासा वाढविणारी मनुष्याविषयीं थोडीशी माहिती झाल्यावर मग विद्यार्थ्यानें आपण एका उंचवट्यावर उभे आहों, असें समजून सगळा इतिहास मनांत आणावा, व बाहेर

फिरतांना आपणाबरोबर घेऊन जाण्यासाठीं एक साधारण मानाचा नकाशाही तयार करावा. खऱ्याखुऱ्या नकाशावरून मनुष्यांचे कृत्यांची माहिती होईल तितकी नेहमीं करून घ्यावी, परंतु अशा नकाशावरून ज्या वेळचा तो असेल त्या वेळीं निरनिराळे लोक कोण कोणत्या स्थळीं होते एवढेंमात्र समजतें. परंतु मनुष्यांनीं स्थलांतरें कसकशीं केलीं व लोकांचे परस्परांशीं संबंध कसकसे होते ह्यांतून एकही त्यावरून कळत नाहीं. ह्या गोष्टींचा नकाशा विद्यार्थ्यांचे मनांतच असला पाहिजे म्हणजे जेव्हां जेव्हां तो खऱ्याखुऱ्या नकाशांत पाहील तेव्हां तेव्हां त्याला मनांतला नकाशा डोळ्यापुढें आणितां येईल.

आतां ह्या धड्यांवरून जी सामान्य माहिती करून देण्याचा यत्न आहे तिचे उद्देश दोन आहेत. पहिला हा कीं, विशेष माहिती करून घेण्याच्या खऱ्या मार्गापासून मनुष्यानें बहकूं नये; व दुसरा हा कीं, तीविषयीं त्याचे मनांत जिज्ञासा उत्पन्न व्हावी. ह्यांत पहिला उद्देश सिद्धीस जाण्याला हें पुस्तक पूर्ण ह्मटलें पाहिजे आणि दुसरा सिद्धीस जाण्याला अपूर्ण ह्मटलें पाहिजे. चितारी चित्र काढण्यास आरंभ करण्यापूर्वी स्पष्ट व काळी अशी एक मर्यादारेषा काढतो. आतां ह्या मर्यादारेषेवरून जें ज्ञान व्हावें असा उद्देश असतो तें पूर्ण होतें, परंतु तें चित्र नव्हे. तो चित्राचा आराखडा चांगला आहे व आकृति भव्य आहेत असें त्या मर्यादारेषेवरून ह्मटलें तर शोभेल; पण कारागीर आंत रंग कसकसे भरणार हें तीवरून कसें समजेल? राष्ट्रांतील निरनिराळ्या जातीचे लोक हल्लीं जेथें आहेत तेथें आपल्या पूर्वजांचीं मूलस्थानें सोडून कसकसे आले व त्यांनीं परस्परांला कसकसें जिंकिलें ह्या गोष्टींची माहिती ह्या पुस्तकावरून होईल, परंतु ज्याला इतिहास ह्मणून ह्मणतात त्याची माहिती ह्या पुस्तका-

वरून होणार नाहीं. एकाद्या राष्ट्रांतले लोक कसे राहत असत, त्यांच्या परस्पराशीं वागण्याच्या चाली कोणत्या होत्या, अनुभवास आलेल्या गोष्टींच्या जोरावरून त्यांनीं कोणती वृत्ति धरिली, आणि स्वातंत्र्य व ज्ञान ह्यांचा प्राप्ति करून घेण्याकरितां त्यांनीं काय काय संकटें भोगिलीं; ह्या गोष्टींची माहिती ह्या पुस्तकावरून होणार नाहीं. ह्या गोष्टी मागाहून समजून घ्यावयाच्या आहेत. डोंगराच्या माथ्यावरून पाहणारा मनुष्य सभोंवतालच्या देशाचा नकाशा नीट लक्षांत आणिल्यावर ज्याप्रमाणें एकाद्या खोऱ्यांत, तेथें कोणते लोक राहतात व ते कोणत्या डौलानें राहतात, हें पाहण्याकरितां जातो, त्याप्रमाणेंच राष्ट्रांत घडलेल्या मोठमोठ्या गोष्टींची माहिती झाली, आणि मागें गेलेल्या व पुढें त्यांच्या जागीं झालेल्या प्रत्येक राष्ट्राचा संबंध समजला ह्मणजे मग विद्यार्थ्यानें आवडेल त्या प्रदेशाची शोधक मनानें विशेष माहिती करून घ्यावी. शाळेंतील मुलाला केवळ सामान्य माहिती असली ह्मणजे बहुधा पुरी आहे. त्याला चौघांत वागूं लागतांना लक्ष्यपूर्वक कोणतीही गोष्ट पाहून तिजविषयीं आपलें मत देण्याची शक्ति आलेली असली आणि त्याचें मन जिज्ञासेनें भरलेलें असलें ह्मणजे झालें. मग डोंगराच्या माथ्यावरून पाहणारा मनुष्य जसा आवडेल त्या खोऱ्यांत तेथील विशेष माहिती करून घेण्यास उतरतो, त्याप्रमाणें ह्यानें आवडेल त्या देशाचा इतिहास हाच जन्मभर शिकण्याचा मुख्य विषय केला तर त्याला त्यापासून आनंद होईल.

---

## धडा २.

टेंकडीच्या माथ्यावरील मनुष्याला फार अंतरावरचा प्रदेश धुक्यांत आहे असें दिसतें. तो त्याला स्पष्ट दिसत नाहीं. त्याप्रमा-

णेंच ह्या इतिहासाच्या सामान्य माहितीची गोष्ट आहे. मानवी प्राणी उत्पन्न होऊं लागल्यापासून जो काळ गेला, असें मानितात त्या सर्व काळाच्या इतिहासाची माहिती खात्रीनें सांगतां येईल असें समजूं नका.

फार प्राचीन इतिहास बरोबर समजत नाहीं.

इतिहासाची भरंवसा ठेवण्यासारखी जी माहिती आह्मांस पहिल्यानें मिळाली ती जुन्या लेखांवरून मिळाली. ते लेख कांहीं शिळांवरचे होते व कांहीं जुन्या ग्रंथांतले होते. हे अर्वाचीन इतिहासांप्रमाणें लोकांची माहिती करून देण्यासाठीं लिहिलेले नव्हते, तरी ते ज्या लोकांचे होते त्यांच्या स्थितिरीति व धर्म ह्यांविषयीं त्यांवरून पुष्कळ माहिती होते. त्यांवरून असेंही समजतें कीं, त्यांच्या पूर्वींही कांहीं लोक होऊन गेले, पण ते होऊन गेले इतकें मात्र समजतें, दुसरें त्यांविषयीं ह्मणण्यासारखें कांहीं समजत नाहीं. आजपासून ४,००० वर्षांच्या मागें तुह्मी गेलां ह्मणजे मनुष्याविषयीं भरंवसा ठेवण्यासारख्या विशेष माहितीची मर्यादा तुह्मीं उल्लंघिली असें होईल. परंतु अर्वाचीन विद्वानांस भाषेचा विचार हें माहिती करून घेण्याचें एक नवीन साधन सांपडलें आहे. त्यावरून त्यांनीं मनुष्याचीं तीन मोठीं कुळें केलीं आहेत. त्यांपैकीं तुराणी ह्मणून जें कूळ आहे त्यांत आशिया खंडांतील फिरत्या लोकांचा समावेश होतो. ते लोक पृथ्वीवर जिकडे तिकडे पसरलेले होते, तरी कोठें एका ठिकाणीं राहून त्यांनीं कोणत्याही राज्याची स्थापना केली नाहीं, व त्यांच्या मागून झालेल्या लोकांला मिळण्यासारखीं गाणीं, कायदे, किंवा कथा त्यांच्यांत झालेल्या नाहींत. ह्या फिरणाऱ्या लोकांचा इतिहास असेल, पण आपणास तो कधीं माहीत

तुराणी कुळांतील लोक जनावरांचे कळप बरोबर घेऊन फिरणारे होते.

होणार नाहीं. ह्या लोकांचें अधिक बलाढ्य किंवा अधिक एकोप्याचे लोकांपुढें कांहीं चालेनासें झाल्यामुळें हे हिंदुस्थानांतील पर्वत, हिंदुस्थानच्या दक्षिणेकडील फार दूरचा प्रदेश, व मलाया द्वीपकल्प, आणि पालिनीशिया बेटें ह्या ठिकाणीं आले, तेव्हांपासून त्यांच्या विषयीं माहिती आपणास लागते. मध्य आशियांतील आपलीं मूलस्थानें सोडून इतिहासरूपी नाटकाच्या कांहीं अंकांत ते वरचेवर येऊन बखेडा करीत असत असें आपणास पुढें वर्णनांत दिसून येईल. हा बखेडा मध्यें केला नसता तर दुसऱ्या दोन कुळांनींच इतिहासरूपी नाटक शेवटपर्यंत केलें असतें.

मध्य आशियांतील उच्च प्रदेश ही मनुष्याचे वस्तीची लक्षांत ठेवण्यासारखी पहिली जागा.

आतां आशिया खंडाचा नकाशा घ्या, आणि त्यांतील मुख्य नद्यांचा उगम कोठें आहे तो त्यांच्या वळणांवरून पहा, आणि मधल्या उच्च प्रदेशांतून निघून त्या सगळ्या खालीं चोंहींकडे कशा वाहत आहेत त्याकडे लक्ष्य द्या. पारसी लोकांच्या वन्दिदाद नांवाच्या धर्मपुस्तकाच्या पहिल्या अध्यायांत असें वर्णन आहे कीं, आर्य लोक हे सिहून व जिहून ह्या नद्यांच्या उगमापाशीं एक स्थळ आहे तेथून निघून मध्यें पुष्कळ फेरफार होतां होतां शेवटीं हप्त हिंदूंच्या ह्मणजे सप्त सिंधूंच्या भूमीला (पंजाबाला) आले. पुढें ते मेदी देशाचा उत्तरभाग व कास्पियन समुद्राला जाण्याचे मार्ग एथेंही येऊन राहिले. ह्या आर्य कुळांत हिंदुस्थानांतील आर्य लोक व इराणांतील जरतुष्टी लोक ह्यांचेच पूर्वज केवळ होते असें नाहीं, तर युरोप खंडांतील ग्रीक, रोमन, केल्त, व त्यूतन ह्या सर्व लोकांचेही पूर्वज त्यांत होते.

आर्य कुल.

आर्य लोक कधीं परागंदा झाले हें कळत नाहीं. एक घराणें सतलज नदी उतरून हिंदुस्थानांत आलें. दुसरें इराणांत जाऊन राहिलें.

कांहीं घराणीं खोरासान प्रांत व रूस देश ह्यांमधून काळा समुद्र व थ्रेस देश ह्यांपर्यंत गेलीं. कांहीं आर्मनी देशांतून निघून कौकसस पर्वतावरून ग्रीस देश्याच्या उत्तरभागीं, आणि तेथून दान्युब नदी उतरून जर्मनींत गेलीं. तीं कोणकोणत्या दिशांकडे गेलीं आणि कोठकोठें जाऊन राहिलीं ह्याचा शोध त्यांचे भाषेवरून लागला आहे. पुष्कळ काळ गेल्यामुळें व परस्परांत जागेचें पुष्कळ अंतर झाल्यामुळें फार भेद झाले आहेत. तरी त्या सर्वांची भाषा अजून एकच आहे. त्यावरून विद्वानांची खातरी होते कीं, पूर्वीं केव्हांतरी एकदां इंग्रज, जर्मन, ग्रीक, आणि रोमन तसेच पारसी आणि हिंदु ह्या लोकांचे पूर्वज शमी व तुराणी ह्या दोन कुळांहून निराळे असे एकाच ठिकाणीं राहत होते.

शमी कुळ.

तिसरें शमी कुळ हें युफ्रातिस व तैग्रिस ह्या नद्यांजवळ प्रथम आढळलें. बाबुलोन व निनवी येथील आरामी भाषा; पालिस्तैन देश, फिनिकी देश, व कार्थेज शहर एथील इब्री भाषा; व अरबस्तानाच्या द्वीपकल्पांतील भाषा; ह्या तीन भाषा ह्या कुळांतील लोकांच्या होत्या. मिसर देशांत प्राचीन सांकेतिक चिन्हात्मक अक्षरांच्या भाषेपासून काप्ती (जी १७ वे शतकापुढें बोलण्याची बंद झाली) भाषेपर्यंत चालू असणारी भाषाही ह्याच कुळांतील लोकांची असें ह्मणतात. असेंही कोणी ह्मणतात कीं, सुधारलेल्या जगाच्या इतिहासांत आजपर्यंत आर्य व शमी हींच कार्यतीं दोन कुळें येतात; तुरानी कुळांतील लोक हल्ले करून कधीं कधीं त्याला अडथळे मात्र करीत असत.

## धडा ३.

पुनः आशिया खंडाचा नकाशा घ्या आणि युफ्रातिस व तैग्रिस ह्या नद्यांचे खालच्या भागाकडे दृष्टि द्या. हा सपाट देश ह्या नद्यांच्या होरीनें झालेला आहे. त्याला खालचा मेसोपोतामिया असें ह्मणत. आह्मांला ज्याची कांहीं खात्रीनें माहिती सांगतां येते असें पहिलें एकसत्ताक राज्य हेंच आहे. ह्याचें नांव खाल्दीचें राज्य असें होतें. ह्याची सुरवात ख्रिस्तापूर्वी निदान २३०० वर्षांमागें झाली असावी, पण कोणत्या कुळांतल्या लोकांनीं तें स्थापिलें हें चांगलें स्पष्टपणें समजत नाहीं. एक इतिहासकर्ता ह्मणतो कीं, पूर्वेकडील मेदी देशांतील उच्च प्रदेशांतून एक विजयी पुरुष आला, आणि त्यानें तेथें राज्य केलें. पण जरतुष्टास अनुसरणारे आर्य लोक एथें पुनः प्रथमतः प्रकट झाले कीं काय, ह्याविषयीं खातरीनें कांहीं सांगवत नाहीं. असें ह्मणतात कीं, ह्या मेदी देशांतल्या पुरुषानंतर पश्चिमेकडून इथियोपी देशामधून निम्राद नांवाचा एक विजयी पुरुष आला. त्याच्या लोकांना "किम्रत अर्बत" ह्मणजे चार कुळें असें ह्मणत. ह्यावरून कुळें व भाषा ह्यांचें ह्या लोकांत मिश्रण झालें होतें, ह्यांत संशय नाहीं. ह्यांच्यामध्यें निम्राद, (इ० स० पू० २,२३४) उरुख नांवाचा एक मोठा इमारती बांधणारा, आणि कदरलाओमर हे तीन पुरुष विख्यात होते. अंकगणित, ज्योतिष, लेखन, व शिल्पशास्त्र ह्यांत हे लोक प्रवीण होते. हे विटांनीं बांधिलेल्या मोठमोठ्या देवमंदिरांत आकाशांतील ताऱ्यांचें भजन पूजन करीत. सुमारें इ० स० पू० १५०० चे वर्षी शमी लोकांनीं स्वारी करून त्यांना जिंकिलें;

खाल्दी देश इ० स० पूर्वी २३००—१५००.

त्या दिवसापासून ते मागें पडले. हल्ला करणारे लोक अरब होते असें खाल्दी देशांतला बेरोसस नांवाचा इतिहासकर्ता ह्मणतो. खाल्दी देशचे लोक सात शतकांहून अधिक काळ पर्यंत परतंत्र राहिल्यानंतर जेव्हां बाबुलोनच्या राज्यांत पुन्हा आले तेव्हां ते अगदीं शमी लोकांसारखे झालेले होते.

---

## धडा ४.

ह्या इतिहासाचा पुढला भाग अजून ह्याच प्रदेशांतला आहे. वर सांगितलेल्या होरीच्या मैदानाच्या वरच्या बाजूस आणि तें मैदान व आर्मनी देशचे तुटलेल्या कड्यांचे पर्वत ह्यांच्यामध्यें चढउताराचें एक मैदान तुमच्या दृष्टीस पडेल. तेथें तैग्रिस व युफ्रातिस ह्या दोन नद्यांच्या योगानें पाण्याचा पुरवठा होतो. ह्या मैदानांत इ० स० पू० १७००–१३०० पर्यंत हळूहळू शुद्ध शमी कुळांतील लोकांचेंच एक नवें राज्य झालें. ज्याचें नांव आपणास असुर देशचें राज्य ह्मणून ठाऊक आहे तेंच हें राज्य. ह्या लोकांनीं आपलीं लिहिण्याचीं अक्षरें, धर्म, व शिल्पविद्या हीं खाल्दी देशाहून आणिलीं. असुरी लोक प्रबल होत चालले तसा त्यांनीं आपला मुलूख वरतीं सांगितलेल्या मैदानाच्या हद्दीपर्यंत वाढविला, उत्तर व पूर्व ह्या दिशांकडील पर्वतांत जे लोक राहत होते त्यांच्यावर हल्ले केले; आणि खाल्दी लोक व पश्चिमेकडील सुरी लोक ह्यांला जिंकिलें. ह्यावेळीं त्यांचे राज्याचें क्षेत्रफळ सुमारें मुंबई इलाख्यांतील सतरा जिल्ह्यांच्या क्षेत्रफळा इतकें होतें. इ० स० पू० १०९० आणि ८९० ह्यांच्यामध्यें ह्यांच्या प्राबल्याचा ऱ्हास झाला असें दिसतें.

असुर देश. १२६०–६२७.

ह्यावेळीं पालिस्तैन देशामध्यें इब्री लोकांच्या राज्याचा तर पराकाष्ठेचा भरभराट चालला होता. पुढें इ० स० पू० ८८० पासून ६४७ पर्यंत असुरी लोक इतके प्रबल झाले कीं, त्यांनीं अरबी किनाऱ्यापर्यंत सगळ्या लोकांला जिंकिलें, आणि ते आशिया मैनर (अनातोलिया*) मध्यें शिरले. पुढें त्यांनी मिसर देशावर स्वारी करून दक्षिणेस थीब्स शहरापर्यंत तो देश जिंकिला, आणि इराणी अखाताचा किनारा घेतला. ह्या लोकांच्या राजांचे वाडे मोठ्या चार शहरांतील मोडून पडलेल्या इमारतींत अजून सांपडतात. ह्या मोडून पडलेल्या इमारतींवरून असें दिसून येतें कीं, सुधारणेच्या कामांत ते लोक अर्वाचीन लोकांपेक्षां कमी नव्हतेच ह्मटलें तरी चालेल. जवळच्या कोणत्याही बलाढ्य लोकांशीं त्यांचा संबंध नव्हता तोंपर्यंत ते प्रबल होत गेले. पण त्यांचें प्राबल्य शेवटीं मोडलें तें जवळच्या लोकांतून कोणी मोडलें नाहीं. इ० स० पू० ८५०-६५० पर्यंत ह्यांच्या पश्चिमसरहद्दीवरील डोंगरांत मेदी ह्मणून कांहीं आर्य लोक जमले होते. इराणांत मागें पैलवी भाषा चालू होती ती निनवी येथील असुरी भाषेपासून भिन्न नव्हती;[१] ही गोष्ट खरी असेल तर असें दिसून येईल कीं, मेदी लोक प्रबल होण्यापूर्वी असुरी लोकांचा त्यांच्यावर पुरा अंमल होता. परंतु पुढें प्रबल होऊन ह्या चलाख डोंगरी लोकांनीं इ० स० पू० ८५०-६२५ पर्यंत असुरी लोकांवर दोन वेळा हल्ला केला; पण त्यांचे हिकमतीपुढें ह्यांचें कांहीं न चालतां ह्यांचा पराभव झाला. दुसऱ्या वेळीं मेदी लोकांचा सरदार सियाग्जारिस होता. परंतु ज्या फिरस्त्या तुराणी लोकांला आपण (दुसऱ्या धड्यांत) मध्य आशि-

---

* अनातोलिया हा अशिया मैनरचा एक पोटभाग आहे.

१ हें दाक्तर हौग साहेबाचें मत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय

यापर्यंत आणून सोडिलें आहे त्यांच्यापैकीं एका जातीच्या लोकांनीं त्यांवर हल्ला केल्यामुळें त्यांस परत जावें लागलें. हे लोक ह्मणजे तुराणी लोकांतल्या एका जातीचे स्कुथी लोक कौकसस पर्वतावरून खालीं उतरले. मेदी लोक डोंगरांत आपल्या घरांत जाऊन राहिले असतील, पण स्कुथी लोक डोंगरांतून खालीं असुरदेशाच्या मैदानांत उतरले खरे. येथें ते कांहीं वर्षांपर्यंत राहिले. पण मग येथून ते गेले असावे किंवा त्यांला कोणी घालवून दिलें असावें. ते गेले त्यावेळीं असुरदेश फार क्षीण व दुर्बल झाला होता. इ० स० पू० ६२७ वे वर्षीं सियाग्जारिस हा मेदी लोकांसह पुनः असुरदेशांत आला. जुन्या खाल्दी लोकांचें राज्य नष्ट होऊन त्या जागीं बाबुलोनचें राज्य झालें होतें तें असुरी लोकांच्या अमलाखालीं असल्यामुळें त्यांतील कांहीं लोक ह्या प्रसंगीं असुरी लोकांच्या सैन्यांत होते. तेव्हां त्या लोकांचा सेनापति नाबोपोलासर हा मेदी लोकांना जाऊन मिळाला, त्यामुळें असुरदेशचा राजा साराकस हा हटून माघारां आपली राजधानी जें निनवी शहर ह्यांतील आपल्या वाड्यांत आश्रयास गेला व तेथें जळून मेला. खाल्दी देश ज्याला हल्लीं बाबुलोन देश ह्मणतात तो व युफ्रातिस नदीच्या थडीचा खालचा भाग, इतका मुलूख मेदी लोकांनीं नाबोपोलासर ह्याला दिला.

वरील इतिहासावरून दिसून येतें कीं, वन्दिदाद ग्रंथांत सांगितलेल्या स्थळांपैकीं इराण ह्मणून जें एक सपाट स्थळ आहे त्यावरून कांहीं आर्य लोक, शमी लोक राहत होते त्या युफ्रातिस व तैग्रिस ह्या नद्यांच्या थडीवर उतरले, व त्यांचा व शमी लोकांचा परस्पर कलह चालला असतां फिरस्त्या तुराणी लोकांच्या एका टोळीनें कांहीं वेळ त्या कलहांत हात घातला. ते

हल्ला करून गेल्यावर मग शमी लोकांच्या विध्वस्त झालेल्या राज्यावर पश्चिमेकडे पुनः चाल करण्यास आर्य लोकांना सवड सांपडली.

---

## धडा ५.

आतां शमी लोकांच्या नदीची थडी सोडून तिचे पूर्वबाजूस आर्य लोकांच्या डोंगर सपाटीकडे कास्पियन समुद्राचे नैर्ऋत्य कोंपऱ्याचे सुमारास आपण चढूं. ही डोंगर सपाटी चोहींकडे समुद्राचे सपाटीपासून ३,००० फूट उंच (ह्मणजे आपल्या महाराष्ट्र देशापेक्षां फार उंच) आहे. वन्दिदाद ग्रंथांत ज्या लोकांचे स्थलांतराविषयीं वर्णन केलें आहे त्यांचे अकरावे वसाहतीचें नांव पूर्व हद्दीवरील रागी नामक शहरानें चालविलें. फार प्राचीन काळीं मेदी लोक खाल्दी देशांत कसे आले ह्याविषयीं तुह्मी वरतीं (तिसऱ्या धड्यांत) वाचिलें आहे. ह्याविषयीं व पुढें पुष्कळ शतकांपर्यंत काय झालें ह्याविषयीं आपणांस फार थोडी माहिती आहे. तथापि इ० स० पू० ८५० वे वर्षीं ह्या डोंगर सपाटीचे वायव्य दिशेकडील भागीं मेदी लोकांची संख्या बरीच वाढली होती. तरी त्यांचें संस्थान हा वेळपर्यंत लहान व दुर्बलच होतें. असुरी लोकांचे राजे वेळोवेळीं त्यांच्यावर स्वाऱ्या करीत व त्यांना जिंकीत. परंतु इ० स० पू० सातव्या शतकाचे मध्यास पूर्वेकडून नवे आर्य लोक येऊन त्यांस मिळाल्यामुळें ते प्रबळ झाले. त्यामुळें ते पुढें उलटे असूरदेशचे मैदानांत स्वाऱ्या करूं लागले. पहिल्या प्रथम त्यांचा यत्न कसा निष्फल झाला, व जनावरांचे कळप बरोबर घेऊन फिरणाऱ्या स्कुथी

मेदी लोक० इ० स० पूर्वी ६५०—५५८.

लोकांनीं असुरदेश क्षीण करून टाकिल्यावर त्यांनीं पुनः असुर देशांत येऊन निनवी शहर इ० स० पू० ६२९ वे वर्षीं कसें घेतलें, हें मागें चवथ्या धड्यांत सांगितलें आहे. नाबोपोलासर हा आपल्या बाबुलोनच्या फौजेसह सियाक्सारिस ह्याला जाऊन मिळाला, व त्याचा मुलगा नबुखद्रेस्सर ह्यानें सियाक्सारिस ह्याचे कन्येशीं लग्न केलें. नंतर मेदी लोक कौकसस पर्वतांपर्यंत व आशिया मैनरांतील हालस नदी पर्यंत गेले. तेथें लुदी देशचा राजा आलियातिस ह्याची गांठ पडली, परंतु बाबुलोन देशच्या राजाचे मध्यस्थीच्या योगानें लढाई टळली. मग आलियातिस ह्यानें सियाक्सारिस ह्याचा मुलगा आस्त्याजिस ह्याला आपली मुलगी दिली. आस्त्याजिस हा आपल्या बापाचे मागें इ० स० पू० ५९३ वे वर्षीं गादीवर बसला, व त्यानें इ० स० पू० ५५८ वर्षं पर्यंत निवांत राज्य केलें. परंतु त्याचा बाप व तो ह्या दोघांनीं जरतुष्टाच्या धर्माचे जागीं मागी धर्माची ह्मणजे तुराणी कुळांतील स्कुथी लोकांच्या धर्माची स्थापना केली होती. इकडे डोंगर सपाटीचे पूर्वभागीं व दक्षिणभागीं त्यावेळीं पारसी ह्मणून जरतुष्टाला अनुसरणारे आर्य लोक प्रबल झाले होते. त्यांचा राजा खोरेश ह्यानें आस्त्याजिस ह्याचा पराजय केला, आणि मेदी लोकांचे जागीं पारशी लोकांची स्थापना करून जरतुष्टाच्या धर्माची स्थापना केली.

रागी शहरापासून हालस नदी पर्यंत मेदी लोकांचा अंमल असतां त्यांच्या राष्ट्राचें क्षेत्रफळ सुमारें ५,००,००० चौरस मैल ह्मणजे हिंदुस्थानाच्या क्षेत्रफळाच्या एका तृतीयांशाइतकें होतें. परंतु राज्यव्यवस्थेच्या कलेची त्यांला फारच थोडी माहिती होती. हालस नदीच्या योगानें पूर्वार्ध व पश्चिमार्ध असे आशिया मैनरचे दोन वांकडेतिकडे भाग झाले होते. हालस नदीच्या

पलिकडे पश्चिमार्धांत आर्य लोकांचीं पुष्कळ लहान लहान संस्थानें होतीं. परंतु हालसनदीच्या पूर्वेकडचे लोक शमीकुळांतले होते.

---

## धडा ६.

एवढा वेळ पर्यंत ज्या ज्या लोकांचें वर्णन केलें ते सर्व आतां इराणी लोकांचे साम्राज्यांत नाहींतसे होणार आहेत. त्यांत बाबुलोनी लोकांच्या पुनः पूर्वस्थितीवर आलेल्या राज्याचें काय झालें तें प्रथम सांगतों. इ० स० पू० १५०० वे वर्षी अरब लोकांनीं जिंकिल्यामुळें जुनें खाल्दी लोकांचे राज्य कसें नष्ट झालें हें तुह्मांला आठवत असेल. सुमारें १२७० वे वर्षी जुन्या खाल्दी देशांत असुरी लोकांचे लहान राज्याची स्थापना झाली. ह्या वेळीं तैग्रिस व युफ्रातिस ह्या नद्यांच्या मुखांजवळच्या होरीच्या जमिनीची वृद्धि झाल्यामुळें व नैर्ऋत्येकडे पाटाच्या योगानें जमिनीस पाण्याचा पुरवठा झाल्यामुळें खाल्दी देशाचें क्षेत्रफळ वाढलें होतें. नाबोपोलासर हा सियाक्सारिस ह्याला असुरी लोकांचें संस्थान नष्ट करण्यास साहाय्य करीपर्यंत बाबुलोनचे राजांनीं असुरी लोकांबरोबर सतत तंटे चालविले होते. पुढें असुरी लोकांचे राज्याचा विध्वंस झाल्यावर मागें सांगितल्याप्रमाणें दोन नद्यांचे मधला असुरदेशाचा भाग (मेसोपोतामिया) नाबोपोलासर ह्याला मिळाला. त्याचा मुलगा नबुखद्रेस्सर ह्यानें भूमध्यसमुद्राचे किनाऱ्यावरील सुरदेश व पालिस्तैन आणि अरबस्तानाचा उत्तरभाग व मिसर इतके देश आपल्या राज्याखालीं आणिले. नबुखद्रेस्सर ह्याच्या मागें त्याच्या वंशांतील पुरुषांनीं तीन पिढ्यांपर्यंत राज्य केलें त्यांच्या मागें जो राजा झाला त्यानें इराणी लोकांबरोबर टक्कर

बाबुलोन. इ० स० पू० ६२५–५३८.

मारण्याकरितां लुदी देशचे राजाला साहाय्य केलें, व पुढें इराणचे राजाचा उत्कर्ष झाला तेव्हां त्यानें बाबुलोन शहरावर चाल केली. त्यावेळीं तेथील राजाचा मुलगा बेलशास्सर ह्यानें बाबुलोनचें रक्षण करण्याकरितां यत्न केला; पण अखेरीस तें शहर शत्रूचे हस्तगत झालें, व तो स्वतः मारला गेला. ह्या प्रमाणें इ० स० पू० ५३८ वे वर्षीं बाबुलोनचे राज्याचा शेवट झाला.

त्या राज्याची राजधानी बाबुलोन शहर ह्याला अजूनही अरब लोक बाबिल असें ह्मणतात. तेथें ज्या जुन्या इमारती मोडून पडलेल्या आहेत त्यांवरून ते लोक इमारती बांधण्याचे कामात मोठे प्रवीण होते असें दिसून येतें. ज्योतिष शास्त्रांतही ते लोक हुशार होते. त्यांला कांहीं ग्रह माहीत होते, पण, सर्व ग्रहांच्या मध्यभागीं पृथ्वी आहे, असें ते मानीत असत. त्यांनीं छायायंत्राची युक्ति काढली, व बहुधा ते दुर्बिनी कामास लावीत असत, असें वाटतें. खाल्दी लोकांचा जो धर्म तोच त्यांचा धर्म होता. ऐन भरभराटींत त्यांचे राज्याचें क्षेत्रफळ २,५०,००० चौरस मैल, ह्मणजे सुमारें असुर देशाच्या अर्ध्या क्षेत्रफळाइतकें होतें.

---

## धडा ७.

आर्य लोकांचीं नव्हत अशीं व पुढें लवकरच इराणचे राज्याखालीं येणारीं कांहीं जुनीं राज्यें आहेत त्यांच्या इतिहासाविषयीं एथें थोडा विचार केला पाहिजे. शामी लोकांचीं पहिलीं राज्यें पश्चिमेकडे कशीं पसरत गेलीं, हें तुह्मीं पाहिलें आहेच. नैर्ऋत्येस भूमध्यसमुद्राचा किनारा आला होता त्यावर यहुदी लोकांचें राज्य, फीनिकी देशाचें राज्य, व सुरी लोकांचें राज्य, अशीं तीन

मिसरदेश. फीनिकीदेश. सुरदेश. यहुदीदेश.

राज्यें होतीं; दक्षिणेस अरबस्थानचा ओसाड प्रदेश होता; आणि नैऋत्येस मिसर देशचे जुने लोक होते.

मिसर देश हा सर्व राष्ट्रांत फार जुनाट असा जरी आहे, तरी इ० स० पू० ६६४ त तेथें सामेतिकस ह्मणून एक राजा होता, त्याच्या पूर्वी तेथील राजांच्या नांवांखेरीज दुसरें कांहीं माहीत नसल्यासारखेंच आहे. तथापि त्या कालापूर्वी तो देश एकदां इथियोपी लोकांनीं, व एकदां असुरी लोकांनीं जिंकला असावा, असें दिसतें. पुढें असुरदेश दुर्बल झाला तेव्हां मिसर देशच्या राजानें आपला अंमल युफ्रातस नदापर्यंत वाढविला; परंतु नबुखद्रेस्सर ह्यानें बाबुलोनचें राज्य पुनः नीट पूर्व स्थितीवर आणिल्या नंतर युफ्रातस नदाच्या कांठीं कर्कमिश एथें जे मिसरदेशचे शिपाई होते त्यांला त्यानें तेथून घालवून दिलें. तथापि सामेतिकस ह्याचा मुलगा नेको ह्याचीं भूमध्यसमुद्रांत व तांबड्या समुद्रांत आरमारें होतीं, आणि असें ह्मणतात कीं त्याच्या खलाशांपैकीं कांहींजण आफ्रिकेभोंवती प्रदक्षिणा करून जिब्राल्तरच्या सामुद्रधुनींतून परत आले होते. हल्लीं नुक्ता पुरा झालेला सुएज संयोगभूमीवरचा कालवाही तयार करण्यास त्यानेंच आरंभ केला होता. ग्रीस देशांतील आर्य लोकांशीं नेकोचें पुष्कळ दळणवळण होतें. त्या लोकांपैकीं पुष्कळजण मिसर देशांतील नैल नदाच्या मुखाजवळ येऊन राहिले होते. नबुखद्रेस्सर ह्यानें स्वारी करून मिसर देश काबीज केला (इ० स० पू० ५६९), व तेथील अधिकार चालविण्यास आमासिस ह्यास नेमिलें, असें दिसतें. लुदी देशचा राजा इराणी लोकांबरोबर युद्ध करीत असतां त्याचे कुमकेस लोक पाठविल्यामुळें आमासिस ह्याची फौज क्षीण झाली. इराणचा राजा खोरेश ह्याचा मुलगा कांबुसेस ह्यानें आमासिस ह्याचे मुलावर स्वारी केली, व त्याचा परा-

भव करून त्यास ठार मारिलें. (इ० स० पू० ५२५). मिसर देशांतील इतिहासकर्त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें आमासिस ह्याचा मुलगा सामेनितस ह्याच्या मरणापर्यंत मिसर देशामध्यें सव्वीस राजवंशावळी झाल्या, आणि सत्तावीसावी वंशावळ ही मिसर देश इराणचे राज्यांत सामील झाला तेव्हांची होय.

फिनिकी देश.

लबानोन पर्वत व भूमध्यसमुद्र ह्यांच्यामध्यें फीनिकी देश ह्मणून एक जमिनीची अरुंद पट्टी होती. परंतु तेथील व्यापार मोठा होता. तूर व सिदोन हीं दोन तेथील मुख्य शहरें होतीं. इ० स० पू० ८०० वर्षांपूर्वींच फीनिकी देशांतले लोकांनीं भूमध्यसमुद्र व्यापून टाकिला होता. व हर्क्युलिसाचे स्तंभांमधून (ह्मणजे जिब्राल्तरचे सामुद्रधुनींतून) पार जाऊन समुद्रकिनाऱ्यावर त्यांनीं वसाहती केल्या होत्या. त्यांपैकीं [1]लिलुबियम व [2]पनार्मस ह्या सिसिली बेटांत होत्या; [3]यूतिका व कार्थेज ह्या आफ्रिकेंत होत्या; आणि [4]मलाका ही स्पेन देशांत होती; जिब्राल्तरचे सामुद्रधुनीच्या पलीकडे [5]बीतिस नदीवर तार्तेसस आणि गेदिज बेट (ज्याला हल्लीं केदिज ह्मणतात) ह्या होत्या; आणि इराणी अखातांत तुलास आणि आरादस ह्या होत्या. तार्तेसस येथून ते इंग्लंदांतील कार्नवाल प्रांत व सिली बेटें एथें आले, आणि तुलास एथून हिंदुस्थान व सिलोन (लंका) एथें आले. असुरी लोकांनीं फीनिकी देश इ० स० पू० ८५० त जिंकिला, व असुरी लोकांचा

---

१ लिलुबियम=हल्लीं दाकों ह्मणतात.

२ पनार्मस=हल्लीं पालर्मो ह्मणतात.

३ यूतिका=हल्लीं सत्कोर ह्मणतात.

४ मलाका=हें फीनिकी लोकांनीं वसाहत केली तेव्हां नांव दिलें आहे. त्याचें दुसरें नांव मलागा आहे.

५ बीतिस=हल्लीं गादालकीविर ह्मणतात.

पाडाव झाल्यावर तो देश इ० स० पू० ६०८ त मिसर देशचे लोकांनीं जिंकिला. फीनिकी देश ६०५ त बाबुलोनच्या ताब्यांत गेला. इराणचे अमलाखालीं त्याला बरेंच स्वातंत्र्य होतें. ग्रीस देशातले आर्य लोक व्यापार व वसाहती करूं लागले तेव्हां फीनिकी लोकांचा व्यापार कमी झाला.

इब्री ह्मणजे यहुदी लोक हे शामी कुळांतले होते. पवित्र इतिहासांतील लेखावरून असें समजतें कीं, त्यांचा [1]मूळपुरुष

यहुदीदेश. सुरदेश.

खाल्दी लोकांचे राज्यांत ऊर नामक गांवीं जन्मला होता. असुरी लोकांचे राज्याचा आरंभ होण्यापूर्वी तो तेथून युफ्रातिस नदीच्या थडींत आला, आणि मग पूर्वेस वळून खनान ह्मणजे ज्याला पुढें पालिस्तैन ह्मणूं लागले त्या देशांत राहिला. दुष्काळामुळें त्याचा नातू आपल्या कुटुंबासहवर्तमान तेथून मिसर देशांत गेला. त्या ठिकाणीं यहुदी लोक इतके वाढले होते कीं त्यांचें एक राष्ट्र झालें होतें. मिसर देशांतून निघून पुष्कळ काळपर्यंत भटकत फिरल्यानंतर इ० स० पू० सुमारें १६०० त ते पुनः खनान देशामध्यें येऊन राहिले. कितीएक शतकांपर्यंत ते सभोंवतालचे लोक जिंकण्याच्या कामांत गुंतले होते. १०१५ त शलमोन हा त्यांचा राजा असतां ते असुरदेश किंवा मिसरदेश येथील लोकांपेक्षांही प्रबळ झाले होते. शलमोन ह्याचें तांबड्या समुद्रावर एसियोनगेबर हें बंदर होतें, व भूमध्यसमुद्रावरील व्यापाराचें मोठें शहर जें तूर एथील राजा हा त्याचा स्नेही होता. सुरी लोकांचें लहानसें राज्य त्याचे ताब्यांत असल्या मुळें तो वैराग देशाच्या पार युफ्रातिस नदीपर्यंत व्यापाऱ्यांचे काफले पाठवी. त्यानें चंदनी लाकूड, सोनें, हस्तिदंत, माकडें,

१ त्याचें नांव अब्राहाम.

व मोर हीं आणण्याकरितां हिंदुस्थानांत गलबतें पाठविलीं, तेव्हां संस्कृत बोलणारे आर्य लोक तेथें पूर्वींच जाऊन राहिलेले होते असें दिसतें. कारण कीं, वर सांगतलेल्या वस्तूंचीं नांवें इब्री लोकांचे धर्मपुस्तकांत आहेत तीं संस्कृत आहेत. परंतु शलमोनाच्या मागें यहुदी लोकांचे राज्याचा विभाग झाला, त्याचें प्राबल्य कमी झालें, व चोहोंकडून त्याला शत्रु उत्पन्न झाले. दमास्कस शहराभोंवताली इ० स० पू० ९७९ त सुरी लोकांचें एक राज्य झालें होतें. त्या लोकांनीं इस्राएल व यहुदा ह्या दोहोंतून कोणते तरी एका यहुदी लोकांचे राज्या बरोबर इ० स० पू० ८३९ पर्यंत लढाई चालविली. नंतर यहुदी लोक दुर्बळ झाले तेव्हां असुरी लोकांनीं त्यांजवर हल्ला करून इ० स० पू० ७७३ त त्यांजपासून प्रथम फार मोठी खंडणी घेतली. नंतर सुरीलोक व इस्राएल लोक ह्या दोघांनीं मिळून यहुदावर हल्ला केला. तेव्हां तथील राजानें असुरी लोकांला आपले कुमकेस बोलाविलें, त्यामुळें असुरी लोकांचे राजानें सुरदेशचे राज्याचा विध्वंस केला, व पुष्कळ इस्राएल लोकांला पाडाव करून नेलें. इस्राएलच्या शेवटच्या राजानें मिसर देशच्या राजाचें साहाय्य घेऊन असुरी लोकांशीं बंड केलें, परंतु त्याचा पराभव झाला, व त्याचे लोक असुरी लोकांनीं आपले चालीप्रमाणें युफ्रातिस नदीचे पलीकडे नेले, आणि त्यांचे जागीं परके लोक नेऊन ठेवले (इ० स० पू० ७२१). नंतर असुर व मिसर ह्या दोहों देशांच्या मध्यें मात्र यहुदाचें एकटें राज्य राहिलें; तें बहुधा मिसर देशच्या राजाजवळ साहाय्य मागत असे. परंतु इ० स० पू० ६०८ त यहुदाचा शेवटला स्वतंत्र राजा योशीया ह्मणून होता त्यानें मिसर देशचा राजा नेको हा युफ्रातिस नदीकडे जात असतां त्याला हरकत केली, ह्मणून त्यानें ह्याचा

पराभव करून त्यास ठार मारिलें. नंतर त्याचा मुलगा यहोयाकिम ह्याला नेकोनें राजा करून त्यास मिसर देशच्या राजाचा ताबेदार करून ठेविलें. ह्या वेळेस असुरी लोकांचें राज्य तर नष्ट झालेंच होतें; आणि नबुखद्रेस्सर हा नेको युफ्रातिस नदी कडे येत होता त्याला परत हाकून लावण्याच्या कामास लागला होता. हें काम करतांना नबुखद्रेस्सर ह्यानें यरूशालेम शहरावर स्वारी करून तें घेतलें, व तेथील राजा आणि राजपुत्र ह्यांना कैद करून बाबुलोन येथें नेलें. नंतर यहोयाकिम ह्याला त्याचें राज्य परत देऊन त्याला आपला ताबेदार करून ठेविलें, परंतु त्यानें पुनः बंड केलें त्यामुळें यरूशालेम पुनः घेऊन यहोयाकिमास ठार मारिलें. योशियाचा दुसरा एक मुलगा सिद्किया ह्मणून होता त्याचे हाताखालीं आतां थोडेच यहुदी लोक राहिले होते, तरी त्यांनीं आणखी एकदां मिसर देशच्या राजाला बंड करण्याकरितां कुमक केली. तेव्हां नबुखद्रेस्सर ह्यानें त्याचा अगदीं नाश करण्याचा निश्चय केला; आणि यरूशालेम घेऊन त्यानें तें शहर व तेथील देवमंदिर हीं जमीनदोस्त केलीं, आणि सगळ्या यहुदी लोकांला कैद करून इ० स० पू० ५८६ त बाबुलोन येथें आणिलें.

खोरेश ह्यानें इ० स० पू० ५३८ त बाबुलोन घेतलें, तोंपर्यंत यहुदी लोक अटकेंतच होते.

## सारांश.

हा वेळपर्यंत जें वाचिलें त्याचा आपण आतां पुनः विचार करूं. युफ्रातिस व तायग्रिस ह्यांची थडी हा मध्य होय, त्यापासून शमी कुळांतले लोक चोहोंकडे कसकसे पसरले ह्याचा इतिहास हा आहे. खाल्दी देशांतील मिश्रित जातीचे लोक

फारसें वैभवास चढले नाहींत; परंतु शुद्ध शमी कुळांतले जे असुरी लोक होते त्यांनीं मात्र पश्चिमेकडे पुष्कळ प्रांत जिंकून घेतले. पूर्वेस मेदी नांवाचे आर्य लोक राहत होते. त्यांनीं अखेरीस ह्या असुरी लोकांचीं राज्यें बुडविलीं. पश्चिमेस शमी कुळांतले दुसरे लोक होते त्यांचे बरोबर युद्ध करण्याचे कामांत असुरी लोकांना यश आलें, त्यामुळें त्यांनीं व्यापारी व वसाहत करणारे लोक ह्यांना पश्चिमेस आणखी दूर पाठविलें. जे आर्य लोक पश्चिमेकडे गेले ह्मणून दुसऱ्या धड्यांत सांगितलें आहे ते मागील वर्णनाच्या शेवटीं व्यापारी किंवा मुशाफरी घेऊन काम करणारे, व आशिया मैनरचा पश्चिम किनारा, त्याच्या लगत्याचीं बेटें, आणि मिसर देश ह्या ठिकाणीं लहान लहान संस्थानांची स्थापना करणारे ह्मणूनही पुनः दृष्टीस पडायाला लागले. ह्याप्रमाणें दोन विरुद्ध फौजा एकमेकींजवळ आल्या असतां दोहींतील कांहीं माणसें पुढें येऊन एकमेकांत मिसळतात, त्याप्रमाणें ह्या दोन घराण्यांतील आघाडीचे लोक एकमेकांत मिसळूं लागले होते. आणि इराणांतील आर्य लोकांनीं शमी कुळाच्या नष्ट झालेल्या संस्थानांत आपला अंमल बसविल्यावर त्यांनीं आपले ताब्यांतील लोकांना युरोपांत कसें नेलें, व लढाई करण्याकरितां मुख्य मुख्य राष्ट्रांची कशी गांठ पडली, हें आपणास पुढें दिसून येईल.

---

## धडा ८.

इराणच्या उंच सपाटीवर इराणचें राज्य कसें उदयास आलें ह्याविषयीं शोध करणें आतां आवश्यक आहे. जंदावस्तामध्यें इराणी लोकांविषयीं कोठें निराळा लेख नाहीं, परतु इराणी लोकांचें निराळें राज्य झालें तें, जरतुष्टास अनुसरणारे आर्य लोक इराणचे सपाटीवर येऊन रा-

इराण. इ॰स॰ पू॰ ५५८–५२१.

हिल्यानंतर फार वेळानें झालें होतें. जसें हल्लीं मिसर देशचें राज्य रूमचे सुलतानाच्या ताब्यांत आहे, तसेंच हें राज्य पहिल्यानें मेदी लोकांच्या ताब्यांत ठेविलें होतें. आतां कांबुससचा मुलगा खोरेश ह्यानें इ० स० पू० ५५८ त मेदी लोकांचा कसा पराभव केला तें आपणांस (पांचव्या धड्यांत) समजलेंच आहे. खोरेश ह्यानें मेदी लोकांचा पराभव केल्यावर जे राजे त्यांचे स्नेही होते त्यांजवर तो गेला. त्यांत पहिल्यानें आशया मैनरांतील लुदी देशचा राजा क्रीसस ह्यावर जाऊन नंतर पश्चिम किनाऱ्यावर जीं लहान लहान ग्रीक लोकांचीं संस्थानें होतीं त्यांवर तो गेला. नंतर तेथून परत येऊन कास्पियन समुद्र व सिंधुनद ह्यांच्यामध्यें जे तुराणी लोक राहत होते त्यांचा त्यानें पराभव केला. नंतर त्यानें बाबुलोनचा विध्वंस करून तेथें यहुदी लोक कैदेंत होते त्यांला त्यांचे घरीं परत पाठविलें; तेव्हां ते पालिस्तेन येथें परत आले. तेथें आल्यावर त्यांनीं आपलें देवमंदिर पुनः बांधलें. तेव्हां पासून इराणचे राज्याचा शेवट होईपर्यंत त्यांच्या मुख्य धर्माधिकाऱ्यांचे अमलाखालीं त्यांचा भरभराट चालला. त्यानंतर खोरेश ह्यानें मिसर देशावर हल्ला केला, आणि तो देश व फिनिकी देश हे दोन्ही त्याचा मुलगा कांबुसस ह्यानें घेतले. त्याच्या मागें एकानें राज्य बळकावून घेऊन कांहीं वेळपर्यंत मागी लोकांच्या धर्माची पुनः स्थापना केली होती; परंतु आखामेनिदीच्या जुन्या राजकीय घराण्यांतील दारयावेश हिस्तास्पस नांवाच्या मनुष्यानें इ० स० पू० ५२१ त जरतुष्टाचा धर्म पुनः चालू केला, आणि आपण स्वतः राजा झाला. ह्या दारयावेश राजानें सर्व राज्याची व्यवस्था केली, व निरनिराळ्या प्रांतांवर अधिकार चालविण्याकरितां सुभेदार नेमिले. ह्या आखामेनिदी घराण्यांतले राजांचे लेख अजून

त्यांची राजधानी पर्सोपालिस शहर एथें व बेहिस्तनच्या खडकावर जे पाचरेच्या आकाराच्या अक्षरांचे शिलालेख आहेत त्यांत आढळतात. जंदावस्ताच्या बाक्त्री भाषेपेक्षां त्यांची भाषा अलीकडची होती तरी तिचीं विभक्तिकार्यें जुनी जंद व संस्कृत ह्या दोन भाषांतील पुष्कळ विभक्तिकार्यांशीं मिळतात. इराणी लोकांचा भाव अहूरा मज्दा ह्यावर असे, आणि खोरेश हा, बाबुलोन येथें जे यहुदी लोक कैदेंत होते त्यांचा यहोवा व अहूरामज्दा देव हे दोन्ही एकच, असें समजत असे, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. आणि असा त्याचा समज होता ह्मणूनच तो यहुदी लोकांवर फार मेहेरबानी करीत असे.

---

## धडा ९.

ह्या वेळीं इराणाचें राज्य साग्दियाना व जिहून नदी आणि सिंधुनद ह्यापासून पूर्वेकडे हेलेस्पांत सामुद्रधुनी पर्यंत वाढलें होतें, किंबहुना थ्रेस देशापर्यंतही गेलें होतें, आणि पश्चिमेस सुरदेशच्या किनाऱ्यापर्यंत गेलें होतें. ह्याच्या दक्षिणेकडील हद्दींत मिसर देश मोडत होता. इराणचे बडे लोकांचें डोंगरांतलें गरिबीचें राहणें लवकरच नाहींसें होऊन आणखी मुलूख जिंकावा अशी त्यांस उत्कंठा उत्पन्न झाली. पश्चिमेकडील मुलूख जिंकतांना त्यांना ग्रीस एथील आर्य लोकांचीं स्वतंत्र संस्थानें लागलीं. दारयावेश राजा व त्याचा मुलगा जर्कसीज ह्या दोघांनीं, त्यांच्या उजव्या बाजूस ह्मणजे उत्तरेकडे ज्यांनीं मोठें भय घातलें होतें त्या स्कुथी लोकांतील कळप घेऊन हिंडणारे ( तुराणी ) लोकांना प्रथम मागें हटविलें, आणि नंतर ते ग्रीक संस्थानांवर जाण्या-

इराण ( २ )
इ० स० पू० ५२१ –३३१.

करितां गलबतांत बसून ईजियन समुद्रांत, किंवा त्या समुद्राच्या अगदीं वरच्या भागाला वेढा घालून युरोपांत, तीन वेळां गेले, व तिन्ही वेळां पराभव पावून परत आले. ह्या मोहिमा (इ० स० पू० ४९२–४७९) व ज्यांत ग्रीक लोकांचा जय झाला अशा माराथन, थर्मापली, सालामिस, प्लाती, आणि मुकाली येथें झालेल्या लढाया ह्यांची हकीकत ग्रीस देशाच्या इतिहासांत वाचिली पाहिजे. ह्या स्वाऱ्या बंद झाल्या नाहींत तोंच इराणचे राज्याचें वैभव लयास जाऊन पार झालें. पूर्वेकडील बहुतेक राज्यांतील रीतीप्रमाणें तेथील राजाचे मुलगे गादीकरितां परस्परांशीं भांडत, व ग्रीक लोक वारंवार त्यांचे सेनापतींचा पराभव करीत. परंतु पुढें ग्रीक संस्थानेंही आपसांत तंटे करूं लागलीं, व अथेन्स शहर आणि स्पार्टा शहर एथील लोक पुढारीपणाविषयीं परस्परांशीं भांडूं लागले. ह्या भांडणांत पुढें आशिया मैनरांतील इराणचे सुभेदारांच्या हातीं ह्या दोघांचा जय अपजय होता. ह्मणजे जिकडे हे सुभेदार मिळतील तिकडचा जय होऊन विरुद्धपक्षाचा पराजय व्हावयाचा असें होतें. इराणचे एका राजाचा धाकटा मुलगा खोरेश हा अर्तहशास्त नांवाच्या आपल्या वडील भावाबरोबर लढत होता, त्याचे कुमकेस जेनोफन नामक सरदाराचे हाताखालीं दोरियन ग्रीक लोकांची एक फौज ४०१ त गेली. ते लोक सिलिसी प्रांतांतील मार्गांनीं युफ्रातिस नदी व बाबुलोन शहर येथपर्यंत गेले. पुढें खोरेश मारिला गेला, आणि ग्रीक लोक तैग्रिस नदीच्या कांठानें व आर्मेनी देशांतले पर्वतांच्या बाजूनें काळ्या समुद्राच्या किनाऱ्यावर त्यांच्या लोकांची एक वसाहत होती तेथें परत गेले. पुनः ३९३ त ग्रीक संस्थानांचा एकोपा इतका नाहींसा झाला, व त्यांना मागल्या गोष्टींचा इतका

विसर पडला कीं, आथेन्स शहरचे लोकांनीं स्पार्ता शहरच्या लोकांबरोबर लढण्यासाठीं इराणचे सुभेदाराची कुमक घेतली. पुढें मग इ० स० पू० ३८७ त स्पार्ताच्या लोकांनीं इराणचे राजाला मध्यस्त होण्याविषयीं विनंती केली. तेव्हां त्यानें दोहों-पक्षांचे ग्रीक लोकांकडून तह करविला. तो केवळ त्याच्या आज्ञापत्रासारखा होता. त्यांत त्यानें आशियांतील सगळा मुलूख आपणाकडे ठेविला, व युरोपांतील ग्रीक लोकांला आपसांत समजण्याविषयीं सांगितलें. सालामिसची लढाई झाल्यापासून स्वतंत्र ग्रीक लोकांची इतकी हलकी दशा झाली कीं, त्यांना त्या इराणचे राजाला आशियांतील आपल्या वसाहती देऊन जावें लागलें.

ओकस नांवाचा एक शेवटचा राजा झाला. त्यानें लयास जाणाऱ्या इराणच्या राज्याचें पुनरुज्जीवन करण्याकरितां ३५९ त मोठा प्रयत्न केला. त्यानें मिसर देशच्या लोकांनीं बंड केलें होतें ह्मणून तो देश पुनः जिंकून घेतला. पण ज्याचे हातून इराणचे राज्याचा विध्वंस व्हावयाचा होता त्या नव्या शत्रूची वार्ता ऐकण्यास तो जगला होता. ओकस व त्याचा मुलगा ह्यांना कोणी विष घालून मारिल्यावर कोदोमानस नांवाचा शेवटला राजा गादीवर बसला. हा राजकीय घराण्यांतला नव्हता. ओकसानें जें पाहिलें तें, मासिदोनच्या शिकंदर बादशाहानें युरोपांतील सर्व ग्रीक लोकांची सत्ता आपले एकट्याचे हातीं कशी आणिली, आणि इराणचें राज्य जिंकण्याचा कसा निश्चय केला, हें होतें. शिकंदर बादशाह इ० स० पू० ३३४ त हेलेस्पांत सामुद्रधुनी उतरून पलीकडे गेला. तेव्हां ज्या इराणचे सुभेदारांची त्यांची ग्रानिकस नदीजवळ गांठ पडली त्यांचा त्यानें पराभव केला. तेथून तो खालीं पश्चिमकिनाऱ्याकडे जाऊन पुढें आशिया

मैनरच्या दक्षिणभागाजवळून जात असतां त्याची आणि कोदोमानस ह्याची इसस गांवीं इ० स० पू० ३३३ त गांठ पडली. तेव्हां त्याबरोबर युद्ध करून त्यानें त्याचाही पराभव केला. नंतर सुरदेशचे किनाऱ्यानें तो दक्षिणेस मिसर देशाकडे वळला, आणि तेथील लोक त्याला शरण आले, तेव्हां तेथें त्यानें अलेक्जांद्रिया नांवाचें शहर इ० स० पू० ३३१ त बांधिलें. तेथून परतल्यावर युफ्रातिस नदी उतरून तो पूर्वेकडे वळला. नंतर जुन्या निनवी शहराच्या पूर्वेस पंधरा कोसांवर इराणचे राजाबरोबर त्याची शेवटची लढाई झाली. तींत कोदोमानस ह्याचा अगदीं पराभव होऊन त्याला युद्धभूमीवरून बेसस नांवच्या एका सुभेदारानें कैद करून नेलें, तों इराणच्या सपाटीवरच्या टेंकड्यांवरून कास्पियन समुद्राला जाण्याच्या वाटांमधून बाक्त्री शहरीं नेलें. आणि तेथें शिकंदर बादशाह त्याला धरून नेणाऱ्याचा पाठलाग करीत होता तो येऊन त्याला गांठतो तों अगोदरच त्याला ठार मारिलें. शिकंदर बादशाहानें जिहून नदी ओलांडिली ती ह्याच स्वारींत ओलांडली. परत जातांना तो सिंधुनदांतून त्याच्या मुखापर्यंत खालीं गलबतांत बसून गेला, आणि तेथून बाबुलोन येथें खुशकीनें परत गेल्यावर तो तेथें मृत्यु पावला. त्याचें वय यावेळीं ३२ वर्षांचें होतें.

इराणचे राज्याचा ऐन भरभराट असतां त्याचा विस्तार मोठा होता. त्याच्या पूर्वेस तिबेटचीं रानें, सतलज नदी, व सिंधुनद हीं होतीं; दक्षिणेस हिंदी महासागर, इराणी अखात, व अरबस्तान आणि न्युबिया देश ह्यांतील ओसाड प्रदेश हीं होतीं; पश्चिमेस सिर्तिस नांवाचें वाळूचें मोठें मैदान, भूमध्यसमुद्र, इजियन समुद्र, व स्त्रेमान नदी हीं होतीं; आणि उत्तरेस दान्युब नदी, युक्झेन समुद्र, कॉकसस पर्वत, कास्पियन समुद्र, व

सिंहून नदी हीं होतीं. त्याचें क्षेत्रफळ. २०,००,००० चौरस मैल, ह्मणजे हिंदुस्थानचे क्षेत्रफळाहून एक तृतीयांशानें अधिक होतें.

---

## धडा १०.

आपलीं मूलस्थानें सोडून जीं आर्य लोकांचीं कुळें पश्चिमेकडे गेलीं ह्मणून दुसऱ्या धड्यांत सांगितलें आहे, त्या कुळांतले शिकंदर बादशाह व त्याचे ग्रीक लोक हे होते.

ग्रीस व रोम येथील आर्यलोक. त्यांचा प्राचीन इतिहास.

ह्या नव्या वसाहतींत येऊन अगदीं पहिल्यानें त्यांनीं काय काय केलें ह्याविषयींचा आह्मांपाशीं लेख नाहीं. केवळ त्यांचे भाषेवरून ते कोण होते हें सिद्ध होतें. त्यांनीं काय काय केलें ह्याविषयीं इतिहासाला भरंवसा ठेवण्याजोगा जो लेख सांपडूं लागतो तो, ते एकत्र जमून त्यांचीं लहान लहान संस्थानें झालीं, पुढें तीं संस्थानें वृद्धि पावलीं, व पूर्वेस आणि पश्चिमेस आपल्या मंडळींतील लोक पाठवून त्यांनीं वसाहती घातल्या, आणि आपल्या शमी कुळांतील शेजाऱ्यांबरोबर ते लढाई व व्यापार करूं लागले, इतकें झाल्यावरचा सांपडूं लागतो.

ह्यास्तव आपण रोम व ग्रीस ह्या ठिकाणीं जे आर्य लोक जाऊन राहिले त्यांच्या इतिहासाविषयींच्या फार प्राचीन काळच्या काय गोष्टी आहेत त्यांचा विचार करूं. युरोप खंडाच्या दक्षिणेस भूमध्यसमुद्रांत बाहेर येणारीं जीं दोन द्वीपकल्पें आहेत त्या द्वीपकल्पांत ते आतां राहत आहेत असें समजा. हे राहूं लागल्यापासून हीं दोन द्वीपकल्पें इताली व ग्रीस ह्या नांवांनीं प्रसिद्ध आहेत. ह्या ठिकाणीं जे पहिल्यानें लोक जमले ते चांचेपणा करण्याकरितां किंवा शत्रूपासून आपलें संरक्षण करून घे-

ण्याकरितां जमले, पुढें त्यांचीं लहान लहान संस्थानें झालीं. तें पुढें रोमचें राज्य झालें तें लाशियम प्रांतांत जीं लहान लहान संस्थानें होतीं त्यांपैकींच एक लहान संस्थान होतें. आणि त्यांतील लोक जी भाषा बोलत होते ती, जी पुढें लातिन भाषा झाली तिचाच एक भेद होता. ग्रीसचें राज्य नेहमीं लहान लहान संस्थानांचें मिळून झालेलें असे. परंतु रोमचें राज्य वाढलें तें शेजारचीं संस्थानें आपणांत मिळवून घेऊन वाढलें. ग्रीस देशांतील संस्थानें तर एकमेकांचा नाश करीत करीत शेवटीं एकट्या शिकंदर बादशाहाचे अमलांत गेलीं.

पहिल्या ऑलिंपियद कालापासून, ह्मणजे इ० स० पू० ७७६ वे वर्षापासून, ग्रीस देशाच्या इतिहासाचा आरंभ होतो. त्या दिवसापासून शिकंदर बादशाह व त्याची पिढी हीं नष्ट होत तोंपर्यंत ग्रीकलोक स्वतंत्र होते. त्यानंतर ग्रीसचें राज्य रोमचे राज्यांत मिळे तोंपर्यंत त्याचे इतिहासांत कांहीं अर्थ नाहीं. ग्रीस देशचें तत्त्वज्ञान, विद्या, आणि रीतिभाती ह्यांचा रोमन लोकांनीं स्वीकार केला, एवढीच काय ती एक ह्मणण्यासारखी गोष्ट आहे.

इ० स० पू० १४६.

परंतु रोम व ग्रीस ह्यांचा नेहमी निकट संबंध होता. रोम हें नांवसुद्धां ग्रीक भाषेंतलें आहे. इतालीच्या लोकांनीं ग्रीक लोकांचीं मूळ अक्षरें घेतलीं, त्यांनीं दैवतें सुद्धां त्यांचींच स्वीकारिलीं. रोमी लोकांचे मुलांना ग्रीक भाषा बालवयास शिकवीत असत, आणि प्रथम ज्यानें रोम शहराचा इतिहास लिहिला, त्यानें तो ग्रीक भाषेंत लिहिला आहे (इ० स० पू० २००). ग्रीक भाषेबरोबर ग्रीकलोकांची ऐषआरामी आणि छिचोरी ह्या गोष्टी रोमचे राज्यांत आल्या, व तेथील धर्माचे जागीं ग्रीकलोकांचें तत्त्वज्ञान आलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय

## धडा ११.

ग्रीसच्या खऱ्या इतिहासाचा आरंभ ज्या वेळेपासून होतें त्या वेळेच्या सुमारासच रोमच्या इतिहासाचा आरंभ होतो, असें ह्मणतात. परंतु इ० स० पू० ३९० त गाल ह्मणजे केल्त

रोम.

ह्या लोकांनीं रोम शहरावर हल्ला केला, तेव्हां सर्व लेख नष्ट झाले. तथापि एकादें संस्थान पराक्रमी असल्यास त्याचा उदय कसकसा झाला असावा तो त्या संस्थानाच्या निकट असणाऱ्या संस्थानांवर आपलें वर्चस्व बसविण्यासाठीं त्यानें जे प्रयत्न केले असतील त्यांत त्याला वारंवार जे अपजय प्राप्त झाले असतील त्यांवरून काढतां येणें शक्य आहे. शिकंदरबादशाह मृत्यु पावला त्यावेळीं रोमचें वर्चस्व बसलें नव्हतें. शिकंदरानें पूर्वेकडे मोहीम केली त्याप्रमाणें पश्चिमेकडे एक मोहीम करीपर्यंत तो वांचला असता, तर सामनैत लोकांबरोबर त्यावेळीं रोमचें भयंकर युद्ध चालू असल्यामुळें शिकंदरापुढें कांहीं एक न चालतां रोमचा बहुधा पाडाव झाला असता. रोम शहराकडे सर्व इतालीचें स्वामित्व आलें, व तेथील लोकांची खंडणीदार आणि प्रजा ह्मणून व्यवस्था झाली, ह्या गोष्टी इ० स० पू० २६५ पर्यंत झाल्या नव्हत्या. त्यापूर्वी नुक्तेंच रोम शहरांतील राज्याधिकारी बडे लोकांनीं सर्व रोमशहरवासी लोक सारखे असें कबूल केलें होतें, व त्या वेळेपर्यंत मोठे कुळांतील मनुष्यांना मात्र मोठे मोठे अधिकार व कामें मिळत ती चाल बंद होऊन धनवान् लोकांना तीं मिळूं लागलीं होतीं. नंतर आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावरील तूरबंदर येथील लोकांनीं केलेल्या वसाहतींपैकीं मुख्य वसाहत जें शमी घराण्यांतील लोकांचें कार्थेज संस्थान त्याचे बरोबर कलह

करण्यास रोमचे लोकांनीं आरंभ केला. तेणेंकरून रोमन लोकांना आरमार तयार करून सिसिली, सार्दिनिया, कोर्सिका, व स्पेन येथें जावें लागलें, व कार्थेज एथील सेनापति हानिबल ह्याचा मासिदोनचे राजाबरोबर स्नेह असल्यामुळें ग्रीस देशांत जावें लागलें. हानिबल सुरदेशचे राजाकडे पळून गेल्यामुळें त्या राजाला रोमन लोकांबरोबर लढाई करावी लागली. अखेरीस ज्या वेळीं कार्थेज शहर जमीनदोस्त झालें त्याच वेळेच्या सुमारास मासिदोन व अखाया, ह्मणजे वरचा व खालचा ग्रीस, हे प्रांत रोमन लोकांचे हातीं आले.

ह्या वेळीं (इ० स० पू० १४६) रोमन लोकांचे राज्यांत सगळा इताली देश, व सिसिली, सार्दिनिया, कोर्सिक, लिगुरिया, सिसाल्पैन गाल, स्पेन, उत्तर आफ्रिका (कार्थेज संस्थानांतील मुलूख), ग्रीस, आणि आशियामैनराचा काहीं भाग इतके प्रांत मोडत होते.

---

## धडा १२.

आतां ग्रीस देश शिकंदर बादशहाच्या अमलाखालीं आला त्याविषयीं, शिकंदरच्या राज्याविषयीं, व त्याच्या सेनापतींमध्यें त्यांचे राज्याची वांटणी झाली तीविषयीं थोडेंसें सांगितलें पाहिजे.

ग्रीस. इ० स० पू० ७७६-३२३.

ग्रीक लोकांविषयीं ज्या पहिल्या दंतकथा माहीत आहेत त्यांवरून उत्तरकडून दक्षिणेकडे ते लोक गेले असें समजतें. जसे दोरी लोक उत्तरकडून दक्षिणेस पेलापोनीसस नांवाच्या लहानशा द्वीपकल्पांत गेले, तसेच ग्रीस देशांतले दुसरे आर्य लोक आशियामैनरचा पश्चिम किनारा व त्याच्या लगत्याचीं बेटें एथें गेले,

आणि त्या ठिकाणीं हेलेस्पांत सामुद्रधुनीपासून सिलिसी प्रांतपर्यंत त्यांनीं आपणांसाठीं शहरें बांधलीं हेंही समजतें. हे आर्य ग्रीक लोक इराणचा खोरेश ह्याजबरोबर लढाईंत सांपडले होते हें तुह्मांला समजलेंच आहे. नंतर लवकरच इजियन समुद्रासभोंवतीं ग्रीक लोकांच्या वसाहती झाल्या, व त्या समुद्रांतील बेटांत जिकडे तिकडे ग्रीकच लोक झाले. पश्चिमेकडेही खालच्या इतालीच्या किनाऱ्यांवर ग्रीक लोकांच्या वसाहती पसरल्या. (त्यामुळें इतालीच्या त्या भागाला माग्नाग्रीशिया, ह्मणजे मोठा ग्रीस देश, असें नांव पडलें.) तशाच सिसिलीच्या किनाऱ्यांवर व इतालीच्या पश्चिम किनाऱ्यांवर क्यूमी गांव व नेपल्स शहर एथपर्यंत त्या पसरत गेल्या. कॉर्सिका, सार्दीनिया, सिसिली, आणि सैप्रस ह्या बेटांत कार्थज व तूर ह्या शहरांतील फीनिकी लोकांच्या वसाहती त्यांला प्रतिस्पर्धी भेटल्या. फोकीया हीच मुळीं ग्रीक लोकांची वसाहत होती; पण तिनें मासालिया (ह्मणजे आतांची मार्सेल्स) नांवाच्या वसाहतीची स्थापना केली. परमुलखीं वसाहती करणाऱ्या ह्या लहान लहान संस्थानांत प्रथम केवळ एकट्या राजाचें आधिपत्य असे. तें पुढें संस्थानांतील कांहीं कुलीन पुरुषांचे हातीं गेलें, ह्मणजे तीं संस्थानें लोकसत्तात्मक झालीं, आणि आथेन्स व स्पार्ता ह्या दोन मुख्य संस्थानांत मत्सर असल्यामुळें आपसांत लढाई होण्याचा अगदीं रंग दिसलाच होता. इतक्यांत आशयामैनरांतील ग्रीक लोकांच्या वसाहतींनीं आपणांस इराणचे राजाच्या उपद्रवापासून रक्षण्याकरितां ग्रीक संस्थानांस बोलाविलें. त्यामुळें इराणचे राजे ग्रीस देशावर स्वाऱ्या करूं लागले. इराणी लोकांना मागें हटविण्याच्या महत् कृत्याचें बहुतकरून सर्व श्रेय आथेन्स संस्थानासच आहे. ग्रीस देशांतील बीं संस्थानें स-

इ० स० पू० ५००.

मुद्रावर प्रबल होतीं त्या सर्वांचें तें पुढारी झालें, व ह्यानेंच ग्रीस देशांतील कलाकौशल्य व कविता ह्यांचा उत्कर्ष केला. आथेन्स व स्पार्ता ह्यांच्यामध्यें, ह्मणजे लोकसत्तात्मक संस्थान व महाकुलीन पुरुषसत्तात्मक संस्थान ह्यांच्या मध्यें, फार दिवसांचा कलह असल्यामुळें ४३१ पासून ४०४ पर्यंत त्या दोन संस्थानांत लढाई चालली होती. लढाईची सुरवात झाल्यापासून तेरावे वर्षीं सैराक्यूस शहरीं (सिसिली बेटांत) मोठा अनर्थ झाल्यामुळें आथेन्सचे लोकांचें बळ अगदीं मोडलें. तथापि ४०४ पर्यंत त्यांनीं मोठ्या शौर्यानें लढाई चालविली. नंतर स्पार्ता एथील लोकांनीं आथेन्स शहर घेऊन त्याच्या भिंती पाडून टाकिल्या. आथेन्सचे लोकांनीं इराणचे सुभेदाराची कुमक घेतली, व इराणच्या राजाच्या मध्यस्थीनें स्पार्तांच्या लोकांनीं तह केला असें वरतीं सांगितलें आहे, ती गोष्ट ह्या नंतरच झाली. पुढें ग्रीस देशाचा पुढारीपणा स्पार्तांच्या लोकांकडून थीब्स शहराच्या लोकांकडे गेला, व एपामिनांदास नांवाचा वीरपुरुष पडल्या नंतर थीब्सच्या लोकांचा पुनः मोड झाला. तेव्हां मासिदोनचा राजा फिलिप ह्याचें प्राबल्य वाढलें, आणि त्यानें थोडावेळ झटापटी खाल्यावर ग्रीस देशाचें स्वातंत्र्य नष्ट केलें. शिकंदर हा फिलिपाचा मुलगा होता. शिकंदरानें पूर्वेकडील मुलखांत कसकशा स्वाऱ्या केल्या, आणि तो इ० स० पू० ३२३ त बाबुलोन एथें केवळ ३२ वे वर्षीं मृत्यु पावला, हें तुह्मांला समजलेंच आहे.

---

## धडा १३.

शिकंदराला आपले राज्याला बळकटी आणण्यास फुरसत सांपडली नाहीं, त्यामुळें त्याचे मागें त्याचे सेनापति राज्याकरितां

बावीस वर्षेंपर्यंत (आपसांत) लढत होते. अखेरीस त्याचीं मुख्य चार राज्यें झालीं, व पुढें दोनशें वर्षांत त्या राज्यांपैकीं जें राहिलें होतें तें रोमन लोकांच्या हस्तगत झालें. तीं मुख्य चार राज्यें येणें प्रमाणें:—

शिकंदराच्या राज्याची वांटणी.

आशियामैनर देश, मासिदोन देश, सुरदेश, आणि मिसर देश.

आशियामैनरांत प्रथम आंतिगोनस सेनापति व त्याचा मुलगा दिमेत्रियस पोलियार्केतीस ह्यांचा अंमल होता. पुढें त्यांचा पराभव करून बाकीच्या सेनापतींनीं त्यांचें राज्य वांटून घेतलें.

मासिदोन देशांत आंतिपेतर सेनापति व त्याचा मुलगा कासांदर ह्यांचा अंमल होता. कासांदराच्या मुलग्याला दिमेत्रियस पोलियार्केतीस ह्यानें मारिलें. नंतर पुष्कळ घडामोडी झाल्यावर दिमेत्रियसाच्या मुलाला गादी मिळाली. ह्या वंशांतील एका राजानें इ० स० पू० २२१ त स्पार्ती येथील राजांचें घराणें नाहींसें केलें. मासिदोनचे राजाबरोबर लढाई करण्याकरितां आथेन्सचे लोकांनीं रोम शहरचे लोकांला बोलाविलें, आणि मासिदोनच्या फिलिप राजानें कार्थेजच्या हानिबल सेनापतीशीं तह केला. इ० स० पू० १९७ त फिलिपाचा अगदीं पराभव झाला; तेव्हां रोमन लोकांनीं ग्रीस देश आजपासून स्वतंत्र आहे असें सर्वांस जाहीर केलें. फिलिपाचा मुलगा पर्सियस ह्याचा इ० स० पू० १६८ त अगदींच पराभव झाला. तेव्हां मासिदोनच्या राज्याचे चार परगणे करून ते रोमच्या राज्यास जोडले.

शिकंदराच्या मागें जे त्याचे गादीवर बसले त्यांमध्यें सेल्यूकस हा उत्तम होता. त्याचा अंमल सूरदेशांत इ० स० पू० ३१२ पासून होता, व त्याचें राज्य फार मोठें होतें; त्याचा विस्तार सिंधुनदापासून भूमध्यसमुद्रापर्यंत होता. वस्तुतः जितका

आशियाचा भाग त्या काळीं माहीत होता तितका सगळा त्याच्या राज्यांत होता, व त्याचे त्यानें ७२ सुभे केले होते. अंत्याख शहर ही त्याची राजधानी होती. परंतु त्याचा नातू राज्य करीत असतां स्कूथी (तुराणी) लोकांपैकीं पार्थी नांवाच्या एका कुळांतील लोकांनीं बंड केलें, तेव्हां त्यांचा राजा असासीस हा बंडांत मुख्य होता. पुढें हळुहळू (सुमारें इ० स० पू० १७४ —१३६) युफ्रातिस नदीपर्यंत जो मुलूख होता तो सगळा त्यांनीं घेतला, व असासिदी वंशाची स्थापना केली. इ० स० पू० १९५ त हानिबल सेनापति हा सुरदेशचा राजा अंत्योखस ह्याजकडे पळून गेला. त्याला आश्रय दिल्याचा परिणाम असा झाला कीं. लढाईत अंत्योखसाचा पराभव होऊन आशियामिनरांतील तौरस पर्वताच्या पश्चिमेकडचा त्याचा सगळा मुलूख गेला (इ० स० पू० १९०). ह्याच्या पुढच्या अंत्योखसाचे कारकीर्दींत पालिस्तैन देश गेला. आतां फक्त सुर देश मात्र राहिला होता, तो रोमचा सेनापति पांपी ह्यानें इ० स० पू० ६९ त रोमन लोकांचे राज्याला जोडला.

मिसर देशांत तालमी राजाच्या घराण्यांतील पुरुषांचा अंमल होता, आणि अलेक्जांद्रिया शहर ही त्यांची राजधानी होती. पहिल्या तालमीनें आपल्या कारकीर्दींत मिसरदेश लढाऊ गलबतांनीं मोठा लढणारा केला, व पालिस्तैन, फानिकी, आणि सैप्रस हे देश आपल्या अमलाखालीं आणिले. त्याचे कारकीर्दींत शास्त्र, व्युत्पत्ति, व व्यापार ह्यांला फार उत्तेजन मिळालें, आणि प्रसिद्ध जें मोठें [1]पुस्तकालय त्याची स्थापना झाली. तालमीचा मुलगा व नातू ह्यांनाही त्याचे सारखीच विद्येची अभिरुचि

१ हें अलेक्जांद्रिया शहरीं होतें.

असल्यामुळें अलेक्जांद्रिया शहर हें केवळ विद्येचें घर झालें होतें. ह्या तीन पुरुषांबरोबरच तालमींच्या वंशाच्या भरभराटाची समाप्ति झाली (इ० स० पू० २२२). इ० स० पू० १६८ त रोमन लोक सुरीं लंकांपासून मिसरदेशाचें रक्षण करण्याकरितां समरांगणांत आले. पुढें गादीवर बसण्याविषयीं कलह होऊं लागले, व रोमनलोक मध्यस्थी करूं लागले. विख्यात जी क्लियोपात्रा ती शेवटच्या तालमीची [1]बहीण व बायको होती. त्याच्यामागें तिनें राज्य केलें, व इ० स० पू० ३० त ती राणी असतां मरण पावली. तेव्हां मिसरदेश रोमन लोकांच्या राज्याचा एक प्रांत झाला.

ह्या वेळचीं दुसरीं कांहीं राज्यें आहेत त्यांचीं नांवें रोमशहरचा इतिहास वाचतांना तुम्हांला येतील; ह्मणून त्यांची तुह्मांला थोडीशी माहिती असली पाहिजे.

शिकंदरानें आपल्या सैन्यांतील कांहीं लोक बाक्त्री देशांत (बल्क) आपली वसाहत करण्याकरितां ठेविले होते, परंतु तो बाक्त्रीदेश त्याच्या मरणानंतर सेल्यूकसाच्या अमलाखालीं आला. पार्थीलोक हल्ला करीत तोंपर्यंत बाक्त्रीदेश हा सेल्यूकसच्या वंशांतील राज्याचा एक भाग होता. नंतर इ० स० पू० २५५त तेथील सुभेदार (गवर्नर) दियोदोतस हा स्वतंत्र झाला. बाक्त्रीदेशच्या ग्रीकराजांनीं आपला अंमल इराणचा कांहीं भाग व खालची सिंदेशची थडी ह्यांत बसविला. त्यांचा अंमल कदाचित् कच्छ व गुजराथ आणि पंजाब ह्यांमध्यें, व किंबहुना सतलज नदीच्या पूर्वेकडील मुलखांत देखील असेल. त्यांचीं नाणीं भडोच एथें चालू होतीं. इ० स० पू० १६० चे सुमा-

---

१ पूर्वी युरोप खंडांत बहिणीशीं लग्न करण्याची चाल क्वचित् होती.

रास बाक्त्रीदेशच्या ग्रीकराज्याचा ऱ्हास होण्यास आरंभ झाला. पार्थीलोकांनीं हल्ले केल्यामुळें ही लहानशी वसाहत इतर ग्रीक लोकांपासून तुटक झाली होती. काबूल व कंदाहार एथें त्यांचा अंमल असल्याची कांहींशी खूण इ० स० पू० ८० पर्यंत होती. नंतर यूएचीलोक व दुसरे स्कुथी ह्मणजे तार्तारलोक ह्यांनीं त्यांला अगदीं पालथें घातलें.

अर्मनीचे राज्याची स्थापना तिसऱ्या अंत्योखसाच्या सेनापतीं पैकीं एकानें इ० स० पू० १९० त केली. इ० स० पू० ६६ त अर्मनीचा राजा तिग्रानीस ह्याला पांपीनें जिंकिलें, परंतु रोमचे संस्थानाला मदत करण्याचें त्यानें कबूल केल्यामुळें त्याला आपले गादीवर बसण्यास परवानगी मिळाली होती. त्याच्या मुलानें पार्थी- लोकांशीं क्रासस ह्याचें युद्ध चाललें होतें त्यांत क्रासस ह्याला मदत केली. जे नांवाचे राजे झाले त्यांस रोमचें संस्थान व पार्थीलोक हे इ० स० ११४ पर्यंत नेहमी आपणांमध्यें मागेंपुढें लोटीत असत. अखेरीस इ० स० ११४ त त्राजन बादशा- हानें अर्मनी देश रोमच्या राज्याचा एक प्रांत केला.

इराणचे सुभेदारांनीं पांतस व कापदकी ह्या प्रांतीं स्वतंत्र राज्यांची स्थापना केली, आणि मूळचे राजांनीं बिथिनी व पाफ्ले- गोनी (आशियामैनरांतील प्रांत) एथें आपणांस स्वतंत्र करून घे- तलें. ख्रिस्ती शकाच्या पूर्वी पहिल्या शतकांत पांतसचा राजा पांचवा मिथ्रिदेतीस हा बिथिनीप्रांताचा राजा दुसरा निकोमेदीस ह्याला मिळाला, आणि पाफ्लेगोनीप्रांतांतील राजवंश नष्ट झाल्या- मुळें त्या दोघांनीं तो प्रांत वांटून घेतला. निकोमेदीस मरण पावल्यावर त्याचा मुलगा तिसरा निकोमेदीस ह्याशीं मिथ्रिदेतीस हा विरुद्ध वागूं लागला, तेव्हां त्यानें रोमनलोकांपाशीं साहाय्य मागितलें, व त्यांना बिथिनी प्रांत आपल्या मृत्युलेखांत दिला.

मिथ्रिदेतीस ह्याचा शेवटीं पांपी ह्यानें इ० स० पू० ६५ त परा-भव केला. कापदकीप्रांतांत राज्य करणाऱ्या वंशाचा रोम संस्थानाशीं इ० स० पू० ३६ पर्यंत स्नेह चालला होता, तो इ० स० पू० ३६ त तेथील शेवटच्या राजाला आंतनीनें मारिल्या मुळें नाहींसा झाला.

यहुदीलोक बंदींतून सुटून परत आपल्या राज्यांत आल्यावर

यहुददेश.

इराणचे राजांचा अंमल असतांना ते खुशाल राहत होते. शिकंदर मृत्यु पावल्यावर ते तालमीच्या वंशांतल्या लोकांच्या अमलाखालीं आले. पहिले आणि उत्तम जे तालमीच्या वंशांतले राजे होते ते यहुदीलोकांना उत्तेजन देत असत. परंतु त्यांच्या पुढें झालेले राजे जुलूम करूं लागल्यामुळें यहुदी लोक सेल्यूकसच्या वंशांतल्या राजांच्या अमलाखालीं गेले. सेल्यूकस वंशांतले राजांनींही प्रथम त्यांस चांगल्या रीतीनें वागविलें; परंतु पुढें ते त्यांस गांजूं लागले, व त्यांनीं त्यांचें देऊळ लुटलें. तेव्हां इ० स० पू० १६८ त यहुदी लोकांनीं बंड केलें, आणि ते आपल्या मक्काबी राजांच्या हाताखालीं बहुतेक अंशीं स्वतंत्र झाल्यासारखेच झाले. इ० स० पू० ६३ पासून रोमन लोक त्यांच्या राज्यकारभारांत हात घालूं लागले, व त्यांनीं इ० स० ४४ त रोमच्या राज्यांतील सुरदेशच्या प्रांताला पालेस्तैनप्रांत जोडून घेतला.

## धडा १४.

आतां येथें रोमच्या राज्याचा इतिहास सविस्तर देण्याचा यत्न आह्मी करीत नाहीं. नकाशावर पाहत असल्याप्रमाणें तुह्मी मात्र एका उंच जाग्यावरून युरोपखंड व आशिया खंडाचा कांहीं भाग ह्यांजकडे पाहत आहां, व त्यामुळें देशांतल्या मुख्य मुख्य जागा मात्र तुमच्या दृष्टीस पडत आहेत, असें समजा.

रोमची बादशाही कारकीर्द इ० स० पू० ३१–इ० स० १९२ (आक्शियम चे लढाइपासून कामोडस बादशहाचे मृत्यूपर्यंत).

रोमचें सार्वभौम राज्य हें भूमध्यसमुद्रासभोंवती मोठ्या एका वलया सारखेंच होतें. त्यांत (ऐन भरभराटीच्या वेळीं) ब्रितन, गाल ह्मणजे फ्रान्स, युरोपाचे दक्षिणेकडील सगळीं द्वीपकल्पें, स्पेन, इताली, ग्रीस, आशियामैनर, असुरदेश, सुरदेश, पालस्तैन, अरबस्तानाचा कांहीं भाग, मिसरदेश, व आफ्रिकेचा उत्तरकिनारा इतके देश होते. त्याच्या उत्तरसीमेवर ऱ्हैननदी, दान्युबनदी, आणि कौकसस पर्वत हीं होतीं. (देश्या–ह्मणजे थीस नदीच्या पूर्वेकडील हंगारी प्रांताचा भाग, वालाख्या, आणि मालदेवी ह्या तिहींनी मिळून झालेला मुलूख–हा रोमच्या ताब्यांत होता खरा, पण थोडे दिवस होता). पूर्वेकडील सीमेवर तैग्रिस नदी होती. ह्या राज्याचें क्षेत्रफळ सुमारें पंधरा लक्ष चौरस मैल, ह्मणजे हिंदुस्थानच्या द्वीपकल्पाच्या क्षेत्रफळाइतकें होतें.

ह्या सार्वभौम राज्याच्या सीमांच्या पलिकडे ज्यांना ग्रीकलोक व रोमनलोक अडाणी ह्मणत, ते होते. ग्रीकलोक व रोमनलोक त्यांला फार तुच्छ मानीत, व त्यांच्या भाषेचा अभ्यास करण्याची फारशी पर्वा बाळगीत नसत. परंतु ज्यांच बरोबर सीजर ह्यानें युद्ध केलें त्या केल्त व जर्मन लोकांच्या भाषेचा अभ्यास

जर सीजर ह्यानें केला असता तर, लातिन भाषा [1]ग्रीकभाषेसारखी आहे, व त्या दोन्ही भाषा संस्कृत भाषेसारख्या आहेत, हें जसें आह्मांला समजतें, त्याप्रमाणेंच केल्त व जर्मन लोक ह्यांची भाषा लातिन भाषेसारखी आहे, असें त्याला समजून आलें असतें. हे लोक कोण होते?

आर्यलोक वसाहती करण्याकरितां जें मोठें मैदान कांहीं युरोपांत व कांहीं आशियांत आहे त्या मैदानांत कसे फिरत होते हें मागें (दुसऱ्या धड्यांत) दाखविलें आहे. जंदधर्मास अनुसरणारे व वेदधर्मास अनुसरणारे आर्यलोक जसे इराणांत व हिंदुस्थानांत गेले, तसे केल्तलोक पश्चिमयुरोप, गाल, स्पेन, बेलजियम व ब्रितन ह्या ठिकाणीं गेले, आणि ते देश, केल्तांचे देश, असे त्यांनीं करून ठेविले. आर्यलोकांपैकीं ग्रीक व रोमन लोक हे ग्रीस व इताली ह्या द्वीपकल्पांत येऊन तेथें मूळचे राहणारे जे काळे लोक त्यांस आढळले त्यांत कसे मिसळले, हें आपणांस माहीत नाहीं. परंतु, इ० स० पू० ४०० वर्षांच्या सुमारास केल्त नांवाचे गाल लोक इतालींतल्या आल्प्स पर्वतांच्या वायव्येकडील बाऱ्यांतून पो नदीच्या थडींत येऊन सर्व भरले, ही गोष्ट खरी आहे. हिंदुस्थानांत जसा हिमालय तसा इतालींत आल्प्सपर्वत आहे, आणि हिंदुस्थानांत जशी गंगा तशी तेथें पो नदी आहे. इ० स० पू० ३८७ त ह्या गाललोकांनीं रोमशहर जाळून टाकिलें. इ० स० पू० २८० त ग्रीसचें शकुनस्थान जें [1]देल्फी गांव त्यावर त्यांनीं स्वारी करण्याचा धाक घातला. त्या

१ हें गांव ग्रीस देशामध्यें फोकिस प्रांतांत पारनेसस पर्वताच्या नैर्ऋत्य दिशेकडे एका खोऱ्यांत होतें. येथें ग्रीक लोक देवाला कौल लावून प्रश्न विचारीत असत.

वेळेच्या सुमारासच आशियामैनरांतील गलतीप्रांतांत ते येऊन राहिले. ह्या ठिकाणीं त्यांची भाषा फार दिवस चालू राहिली होती. रोमन लोकांनीं स्पेन व गाल एथील केल्तलोकांना जिंकिलें, व ते त्यांना आपणांत मिसळून टाकण्याविषयीं पुष्कळ मेहेनत करीत होते. आर्य लोकांपैकीं उत्तरयुरोपांत प्रथमतः केल्तलोकच आले असें दिसतें. त्यांच्या मागून जे त्यूतन लोक आले त्यांनीं त्यांना पश्चिमेकडे हाकून लाविलें. आतां त्यांचा माग, इंग्लंदाचा अगदीं पश्चिमेकडील भाग, ह्मणजे वेल्स आणि कार्नवाल, येथें, आणि ऐर्लंद, स्कातलंद, ऐल आफ् मान, व ब्रितनी ह्यांत मात्र थोडा थोडा लागतो. त्यूतन लोकांत [१]दोन प्रकारची जर्मन, आणि गाथिक व स्कांदिनेवी ह्या भाषा बोलणारे लोक येतात. जर्मन लोकांच्या जाती दान्युबनदी व बाल्तिक समुद्र येथून निघून इताली व रोमच्या राज्याचे दुसरे प्रांत घेण्याकरितां जेव्हां एकामागून एक येऊं लागले असें वर्णन करूं, तेव्हां ह्या त्यूतन लोकांविषयीं आणखी सांगूं. इ० स० पू० १०२ त त्यूतन लोक स्पेन व गाल (फ्रान्स) ह्यांवर स्वारी करून आले, आणि इतालीला त्यांनीं स्वारी करण्याचा धाक घातला; परंतु रोमच्या मारियसनामक सेनापतीनें इतालीचें रक्षण केलें. सीजर जर्मन लोकांच्या वसाहतींत चाल करून गेला, व एल्बनदीपर्यंत सुद्धां त्यानें रोमचे झेंडे नेले; प्ररंतु वारसनामक रोमनसेनापतीच्या हाताखालच्या तीन पलटणींचा नाश झाल्यामुळें त्यांचें पुढें जाणें कुंठित झालें. गालचे लोक व स्पेनचे लोक ह्यांची भाषा व रीतिभाती ह्यांजवर जसा इतालीची भाषा व रीतिभाती ह्यांचा पगडा बसला, तसा जर्मन लोकांची भाषा व रीतिभाती ह्यांवर

---

१ एका प्रकाराला हाइदाय्च आणि दुसऱ्या प्रकाराला नीदरदाय्च असें ह्मणतात.

बसला नाहीं. वारसाचा पराभव झाल्यावर २५० वर्षेपर्यंत त्यूतन लोकांनीं रोमनलोकांच्या मुलखावर मोठासा हल्ला केला नाहीं.

रोमच्या राज्याच्या पूर्वेस सेल्यूकसच्या वंशांतील राजांच्या नष्ट झालेल्या राज्यांत पार्थी (तुराणी) लोक राहिले, व ते हिंदुस्थानापासून सुरदेशचे सरहद्दीपर्यंत पसरले. इ० स० पू० ५३ त त्यांनीं क्रासस नांवाच्या एका रोमनलोकांच्या सेनापतीचा फौजेसुद्धां नाश केला.

रोमच्या राज्याच्या हद्दीच्या आंतल्या ज्या भूमीला हल्लीं स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स, स्वित्जर्लंद, व वालाख्या (दान्यूब नदीच्या उत्तरेस) हीं नांवें आहेत, तेथील भाषा व रीतिभाती ह्या विजयी रोमन लोकांच्याच कशा होत्या, आणि प्रांतोप्रांतीं केल्त जातीचे किंवा त्यूतन जातीचे लोक जी लातिन भाषा बोलत तिजवरून हल्लीं त्या देशांत ज्या भाषा चालू आहेत त्यांना रोमान्स भाषा कां ह्मणतात, हें तुह्मांला आतां समजेल. रोमच्या राज्याच्या हद्दीबाहेर रोमन न झालेल्या अडाणी लोकांच्या जाती राहत असत, त्यांची अजून रोमच्या राज्यांतील प्रांतांस गराडा घालून त्यांचें आक्रमण करण्यासारखी तयारी झाली नव्हती, परंतु त्या हळूहळू तयारी करीत होत्या.

---

## धडा १५.

रोमची बादशाही कारकीर्द (२.)

बादशाही कारकीर्दींतील रोमच्या राज्याचें स्वरूप थोडक्यांत सांगतां येईल. आगस्तस बादशाहापासून कामोदस बादशाहापर्यंत दोन शतकें गेलीं. तेवढ्या काळांत राज्याची वृद्धि करण्याविषयीं फारच थोडा यत्न झाला होता. आगस्तसपासून त्राजन बाद-

शाहापर्यंत फक्त ब्रितन देश मात्र कायतो जिंकून राज्यास जो-डला. शिकंदराप्रमाणें आपण आपलें शौर्य गाजवावें, असा हेतु धरून त्राजन बादशाहानें देश्याप्रांत जिंकून घेतला, व तो हिंदुस्थानापर्यंत आला; परंतु त्याच्या पुढच्या हाद्रियन बादशाहानें फक्त देश्याप्रांत मात्र ठेविला, आणि मागील बादशाहानें जिंकलेला बाकीचा पूर्वेकडील मुलूख सोडून दिला. राज्याचें संरक्षण ३० पलटणी (लेगेओन) ह्मणजे २,७५,००० लोक करीत होते. ह्या पलटणींपैकीं तीन ब्रितनांत ठेविल्या होत्या, सोळा ऱ्हैन व दान्युब ह्या नद्यांवर होत्या; आणि आठ युफ्रातिस नदीवर होत्या; स्पेन देशांत आणि लिब्या व आफ्रिका एथील वालुकामय प्रदेशांत एकेक होती.

प्रांतांतील लोकांना आपले पूर्वजांचा धर्म पाळण्याची परवानगी होती; परंतु दुसऱ्या कोणत्याही प्रकारची राज्यनीतिसंबंधानें स्वतंत्रता नव्हती. कोणाला प्रतिष्ठा वगैरे मिळणें तें सर्व रोमशहरांतून होत होतें. बादशाह व सेनेत नांवाच्या राज्यकारभार पाहणाऱ्या सभेचे कामगार ह्यांचे द्वारानें सर्वत्र सरकारी काम चालत असे. तथापि प्रांतांतील ज्या लोकांना रोमनगरवाशांचा हक्क प्राप्त झाला होता त्यांची व रोमनगरवाशांची बहुतेक अंशीं बरोबरी झाली होती. प्रांतांत वसाहती करणें व प्रांतांतील कांहीं लोकांना रोमनगरवाशांचा हक्क देणें ह्या द्विविध युक्तीनें हळूहळू प्रांतांत रोमनलोकांचें एक राष्ट्रच झालें होतें. बादशाही कारकीर्दीत रोमच्या राज्याची लोकसंख्या बायकांमुलांसुद्धां दोन कोटि रोमनगरवासी, चार कोटि प्रांतांतले लोक, आणि सहा कोटि दास इतकी होती, असें गिबन नवाच्या इतिहासकर्त्यानें सरासरी स्थूलमानानें काढिलें आहे.

वास्तविक पहातां रोमच्या राज्यांत सर्वसत्ता लष्करी लोकांचे

हातीं होती; तथापि बादशाहा बाहेरून असें दाखवी कीं, लोकांना मुलकीसंबंधें स्वातंत्र्य आहे, आणि मला व सैन्याला सेनेत सभा वरिष्ठ आहे, ह्यामुळें लष्करी लोकांनीं माझ्या हुकुमांत राहिलें पाहिजे, असा जो मी हक्क सांगतों तो फक्त प्रजासत्ताक राज्याचा मुख्य अधिकारी आहें ह्या नात्यानें सांगतों. सेनेत मधले लोक आपल्या अधिकारानें बादशाह निवडून काढीत; पण त्या निवडलेल्या मनुष्याला बादशाह नेमण्याविषयीं शिपायांचें अनुमोदन घ्यावें लागत असे. बादशाह आपण जिवंत असतांनाच आपले पश्चात् होणारे बादशाहाला बहुत करून गादीचा मालक कबूल करून त्याचे हातीं कांहीं सत्ता देत असत. ह्यामुळें गादी रिकामी पडल्यापासून होणारे धोके होत नसत. ह्याप्रमाणें कामोदस बादशाह मृत्यु पावे तोंपर्यंत कांहीं धोके खेरीज करून लष्करी अमलाला उद्भवणारे बाकीचे सर्व धोके मोठया युक्तीनें टाळले होते.

रोमचीं आरमारें तांबडया समुद्रावरील मियासहोर्मस बंदराहून मलबारकिनारा व सिंहलद्वीप एथें प्रतिवर्षी रेशीम, मोतीं, व मसाल्याचे जिन्नस आणण्याकरितां जात असत. आणि ह्या जिनसांबद्दल ते तेथल्या लोकांला चांदी देत असत; कांकीं हल्लींप्रमाणें त्या वेळेसही हिंदुस्थानांतले लोक आपल्या देशांत उत्पन्न होणाऱ्या पदार्थांवरच संतुष्ट असत, व त्यामुळें ते दुसऱ्या देशांतील जिन्नस आपल्या देशांत फारसे आणीत नसत.

---

## धडा १६.

कामोदस बादशाहानंतर (इ० स० १९२,) बादशाहाचे गाडदीचे शिपाई व त्यांच्यावरचा मुख्य अधिकारी ह्यांनीं बाद-

शाह नेमण्याचा हक्क आपणाकडे घेतला होता, पण पहिल्या बादशाहाचा वध करून मग दुसऱ्या बादशाहानें त्याच्या गादीवर यावें ह्याप्रमाणें वरचेवर होऊं लागलें. बादशाही जांभळा झगा आपणांस मिळावा (ह्मणजे गादी आपणांस मिळावी) असा हक्क सांगणाऱ्यांच्या सैन्यांचे जे परस्पर कलह होत असत त्यांखेरीज बादशाहीचे हद्दींत कोठें लढाईचा आवाज ऐकूं येत नसे. सेप्तिमियस सेवरस बादशाहानें सेनेत नांवाची राज्यकारभार करणारी सभा एकीकडे ठेवून व्यवस्थित राज्याचें पोम होतें तें अगदीं नाहींसें केलें. त्या वेळेपासून सर्व मुलकी व लष्करी अधिकार बादशाहाकडे आला. त्याच्या आंगची पवित्रता ईश्वराचे पवित्रते जवळ जवळ आहे असें मानीत. निरनिराळे देशांच्या संबंधानें जे भेद होते ते, हें सर्वांचें मिळून एक सामान्य राज्य झालें होतें ह्मणून ह्यांत लोपून गेले. दोन लोकांखेरीज बाकी सर्व लोक एकसारखे होऊन गेले होते. यहुदी लोक आपल्या धर्मामुळें निराळे राहिले, आणि ग्रीक लोक आपल्या विद्येमुळें निराळे राहिले.

रोमची बादशाही कारकीर्द (पश्चिम). इ० स० २००-५६८.

पुढें प्रत्येक बादशाहाचे मरणानंतर गादीविषयीं झटपट होणें ही गोष्ट नित्याच्या पाठांतली होऊन गेल्यामुळें, दूरदूरच्या प्रांतांतील सेनापति आपणांस स्वतंत्र ह्मणवूं लागले. मुख्य अधिकाराचें स्थळ एकच राहणें आतां ह्यापुढें शक्य नाहीं, असें दियोक्लेशियन (इ० स० २८४) बादशाहाला वाटल्यावरून त्यानें बादशाही अमलाखालचा सर्व मुलूख चौघांला वांटून दिला, व त्यांतून प्रत्येकाचा डामडौल पूर्वेकडील बादशाहांच्या डामडौलाप्रमाणें ठेविला. हा मुलखाचे निरनिराळे भागांत निरनिराळे अधिकारी ठेवण्याचा दियोक्लेशियनचा बेत कान्स्तंतैन

बादशाहानें अधिक अमलांत आणिला (इ० स० ३०६). त्यानें मुलकी व लष्करी हीं दोन्ही कामें वेगवेगळीं केलीं, सरहद्दींवर व मोठमोठ्या शहरांत कौन्त व ड्यूक ह्या नांवांचे अंमलदार करून ठेविले, आणि खासदरबारांत मोठमोठे अधिकारी नेमिले. ह्याप्रमाणें प्रथम निकोमेदी व मिलान ह्या दोन रोम शहरांखेरीज नव्या राजधान्या झाल्या, आणि नंतर बादशाहाची गादी बदलून बैजांतियम (कान्स्तांतिनोपल) शहरास आणली. त्यामुळें पश्चिमेकडील मुलूख व पूर्वेकडील मुलूख असे बादशाही अमलाखालच्या मुलखाचे दोन भाग केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. ह्याप्रमाणें झालेली राज्याची वांटणी वालेंतिनियन बादशाहानें कायम मात्र ठेविली होती. पण पुढें थियोदोशियस बादशाह मरण पावल्यावर त्याच्या दोन मुलांनीं ती अगदींच पक्की केली. ह्मणजे त्याचे दोन मुलांपैकीं एक होनोरियस हा पश्चिमेचा बादशाह ह्या नांवानें रोम शहरांत राज्य करूं लागला, आणि दुसरा आर्केदियस हा पूर्वेचा बादशाह ह्या नांवानें बैजांतियम एथें राज्य करूं लागला (इ० स० ३९५).

ह्यानंतर जे लोक आल्प्स पर्वतांपलीकडे हा काळपर्यंत प्रसिद्धीस न येतां राहिले होते (त्यांला अडाणी ह्मणत असत, परंतु ते मुख्यत्वेंकरून आर्य वंशांतले होते, ह्मणजे गाथ, वान्दल, व बर्गंदी हे लोक होते.) ते आल्प्स पर्वतांवरून पश्चिमेकडील राज्यांत आले, आणि इ० स० ४७६ त त्या राज्याची समाप्ति करून अडाणी लोकांच्या जुटाचा सेनापति ओदोयासर ह्याला त्यांनीं इतालींतील प्रांतांच्या गादीवर बसाविलें.

इतकें झालें तरी रोमन लोकांनीं सर्व जगाला आपणासारखें करून बादशाही अमलाखालचे सर्व लोक एक जातीचे करण्याविषयीं फार मेहेनत चालविली होती ती व्यर्थ झाली नाहीं, ह्मण-

जे बादशाही राज्यांतील सर्व लोकांचें एकजातित्व नष्ट झालें नाहीं, इतकेंच नाहीं तर नूतन व जोरदार जो ख्रिस्ती धर्म ह्याची मदत झाली. कांहीं बादशाहांनीं त्या धर्माचा छल केला होता; परंतु तो व्यर्थ झाला. कारण सर्वत्र एक राज्य असल्यामुळें, व एका भागापासून दुसऱ्या भागाशीं सोप्या रीतीनें दळणवळण होत असल्यामुळें, त्या धर्माचा प्रसार चोहींकडे होण्यास साहाय्य झालें. कान्स्तंतैन बादशाहानें तो धर्म स्वीकारून तो सर्व राज्यांत चालू केला, आणि तेव्हांपासून त्या धर्माला सरकारांतून आश्रय मिळूं लागला. यहुदी लोक व प्राचीन रोमन लोक ह्यांच्या मध्यें धर्म व सरकार ह्यांचें ऐक्य होतें. परंतु ह्या नव्या धर्माचा अंमल स्वतंत्र होता, व तो इतका पूर्ण होता कीं बादशाही अमलाचे बरोबरीचा झाला होता. ह्यापासून प्रत्यक्ष काथलिक पंथ उत्पन्न झाला. त्यांत श्रद्धा व कर्मपद्धति सर्वत्र एकसारखी होती. तो स्वतंत्र होता; परंतु पाखंडी लोकांचें शासन करण्याकरितां साहाय्य पाहिजे तेव्हां तें सरकाराजवळ मागावें लागत असे. ह्याप्रमाणें जेथें जेथें रोमच्या बादशाहांचें राज्य होतें तेथें तेथें ख्रिस्ती व सुधारणा हीं होतीं.

---

## धडा १७.

अज्ञाणी लोक इटाली देशांत येतात. इ० स० २००-५६८.

त्यूतन ह्मणजे जर्मन लोक ह्यांचीं कुळें दान्युब नदी व बाल्तिक समुद्र येथून निघून रोमच्या राज्याच्या सरहद्दीपर्यंत येत होतीं अथवा आलीं, येथपर्यंत मागें चवदावे धड्यांत तुह्मी वाचिलें आहे. पुढें व्यापारी लोक सरहद्दीच्या अलीकडे येऊं जाऊं लागले. जर्मन लोक रोमच्या सैन्यांत चाकरीस रा-

हिले. कान्स्तंतैन बादशाहानंतर सैन्यांत अडाणी लोकांचा भरणा पुष्कळ झाला, व त्यूतन लोकांच्या सरदारांना मोठ्या पदव्या व हुद्याचीं कामें मिळूं लागलीं. ह्यामुळें जेव्हां त्यूतन लोकांचे खूमचे खूम रोमच्या राज्याच्या प्रांतांत येऊन राहूं लागले तेव्हां ते परक्या लोकांसारखे आले नाहींत, तर वसाहत करणाऱ्यांच्या नात्यानें आले. रोम शहरांतील लौकिकपद्धति, राज्यकारभाराची पद्धति, व सर्व प्रतिष्ठा आणि मान ह्याचें मूलस्थान जो बादशाह त्याची पवित्र मूर्ति, ह्यांना ते मनापासून मान देत. ख्रिस्ती शकाच्या चवथ्या शतकांत गाथ (आर्य) लोक बाल्तिक समुद्रापासून युक्झैन समुद्रापर्यंत जो प्रदेश आहे त्या सर्व प्रदेशावर पसरले. मागचे बाजूस राहणाऱ्या तुराणी लोकांनीं पुढें रेंटल्यामुळें ते दान्युब नदीवर येऊन पडले. येथें थियोदोशियस बादशाहानें त्यांना कांहीं वेळ पुढें जाऊं दिलें नाहीं. पुढें तो मरण पावल्यावर त्यांचा राजा अलारिक ह्यानें त्यांस घेऊन पुढें चाल करून ग्रीसदेश घेतला. तेथें कांहीं दिवस राहिल्यावर त्यांनीं इतालीवर चाल केली. तेव्हां होनोरियस बादशाह हा आपल्या रावेना शहराजवळच्या दलदलीपर्यंत मागें हटला. इ० स० ४१० त अलरिक राजानें रोम शहर घेतलें. त्याच वेळेस वान्दल, स्वेवी, बर्गंदी, व फ्रांक ह्या जर्मन लोकांच्या दुसऱ्या खूमांनीं ऱ्हैन नदी उतरून गाल (फ्रान्स) व स्पेन हे दोन देश घेतले. वान्दल लोकांनीं समुद्रांतून स्पेनमधून आफ्रिकेंत जाऊन तेथें जे रोमच्या राज्याचे प्रांत होते ते घेतले. नंतर [1]हूण (तुराणी) लोक आले, त्यांचा राजा आत्तिल हा होता. त्यानें पूर्वेच्या बादशाहाकडून जबरीनें कांहीं मुलूख

---

१ हे स्कुथदेशाच्या दक्षिणभागीं राहणारे लोक होते.

घेतल्यावर गाल व इताली ह्यांवर चाल केली, आणि इ० स० ४५२ त त्यानें मिलान शहर घेतलें. परंतु तो मेल्यामुळें त्याचें प्राबल्य नाहींसें झालें. नंतर वान्दल लोक आफ्रिकेंतून गलबतांत बसून सिसिली बेटांत गेले, आणि तें बेट घेतल्यावर त्यांनीं रोम शहर पुनः लुटिलें. पुढें असें झालें कीं, खुद्द बादशाहाला अडाणी लोकांचे सेनापति अगर मदत करणारे अडाणी लोक ह्यांच्या मर्जीप्रमाणें आश्रय मिळे किंवा त्यांच्या बदल्या होत. इ० स० ४७६ त मागें सांगितल्या प्रमाणें इतालींतल्या अडाणी लोकांच्या जुटाचा सेनापति ओदोयासर ह्यानें पश्चिमेच्या राज्याचा शेवटचा नांवाचा बादशाह होता त्याला स्थानभ्रष्ट केलें, आणि आपण त्याच्या गादीवर बसला.

परंतु तुराणी लोकांचा आत्तिला राजा खेरीज करून बाकीच्या अडाणी लोकांच्या सर्व राजांचें लक्ष्य रोमच्या बादशाहींतील व्यवस्था, कायदा, व कलाकौशल्य ह्यांचें रक्षण करण्याकडे विशेष होतें; त्यांचा नाश करण्याकडे नव्हतें. त्यांनीं रोमची पद्धति व कायदे ह्याचा स्वीकार केला, आणि बादशाहापासून आपले किताब घेतले. ओदोयासर सेनापति ह्यानें पश्चिमेकडील राज्य बुडविलें तेव्हां बैजंतियम एथील बादशाह हा पश्चिमेचें व पूर्वेचें ह्या दोन्ही राज्यांचा बादशाह झाला होता, त्याजकडन इतालींतील प्रांतांचा राजा हा किताब आपणास मिळवून घेतला. पूर्वेचा बादशाह हा अझूनही पश्चिमेच्या राज्याच्या कामांत हात घालीत असे. बैजंतियम एथील दरबारांत हुशार झालेला आस्ट्रोगाथ लोकांपैकीं थियोदोरिक ह्मणून एक होता, त्यानें ओदोयासर व त्याचे अव्यवस्थित लोक ह्यांपासून इताली देश सोडविला, हें त्यानें आपण बादशाहाचा प्रतिनिधि ह्या नात्यानें केलें. नंतर त्यानें तेथें आस्ट्रोगाथ ह्यांचें राज्याची

स्थापना करून सर्व राष्ट्राची सत्ता पुनः एकाधीन करण्यासाठीं प्रयत्न केला. त्यानें कायदे केले ते रोमन व गाथ ह्या दोघांनाही सारखे लागू असणारे केले. त्यानें शेतकी व कलाकौशल्य ह्यांला पुनः ऊर्जित दशेस आणिलें, आणि रोम शहरांतील जुन्या वैभवाची आठवण राहण्यासारखीं जीं प्राचीन कालचीं इमारती वगैरे कामें होतीं तीं त्यानें तशींच राखिलीं होतीं. सर्वत्र स्वस्थता होऊन धान्यादिकांची स्वस्ताई झाली, त्यामुळें विद्येचें पुनरुज्जीवन झालें, आणि आदिकवींच्या ग्रंथांसारख्या ग्रंथांचा जो शेवटीं एकदम भरभराट झाला त्याचें थियोदोरिक ह्याचे राज्याला मोठें भूषण झालें. परंतु त्याचे वंशज झाले ते त्यासारखे नव्हते. पूर्वेचा बादशाह जस्तिनियन ह्यानें आपला महान् सेनापति बेलिसारियस ह्याला इ० स० ५३६ त इताली परत घेण्याकरितां पाठविलें, तेव्हां जें युद्ध झालें त्यांत आस्त्रोगाथ ह्यांचा वंश व नांव हीं बुडालीं. इताली पुनः रोमच्या राज्याला जोडल्यावर तिचे निरनिराळे भाग केले. कांहीं भागांवर कौंत नामक अधिकारी होते, व कांहींवर ड्यूक होते, ते सर्व, बेजंतियम एथील बादशाहाचा प्रतिनिधि जो रावेना शहरचा एक्सार्क ह्मणून होता, त्याला इ० स० ५६८ त लांबर्द लोकांनीं त्याचे शहरांत कोंडून टाकीपर्यंत, त्याचे अमलाखालीं होते.

इ० स० ४९३.

आल्प्स पर्वतांचे पलीकडे सुद्धां दोन गोष्टींनीं रोमचें स्मरण राहिलें होतें, ह्मणजे एक धर्माची मंडळी आणि एक कायदा. जिकडे तिकडे अव्यवस्था पाहून धर्माच्या मंडळींतील लोक रोम शहर मध्यस्थान समजून तेथें चहूंकडून जमले. व एकामागून एक जे धर्माधिकारी झाले ते हुशार आणि झटून काम करणारे असल्यामुळें त्यांनीं पोप नांवाच्या मुख्य धर्माधिकाऱ्यांच्या अमलाचा

पाया चांगला बसविला. पुढें सर्व अडाणी लोक एकामागून एक असे ख्रिस्ती धर्मानुयायी झाले. त्यांत प्रथम गाथ लोकांनीं तो धर्म स्वीकारिला, व शेवटीं फ्रांक आणि साक्सन ह्यांनीं स्वीकारिला.

रोम येथें जो मुलकी कायदा चालू होता तो स्पेन, गाल देशाचा दक्षिण भाग, व जर्मनीचे हद्दीवरचे प्रांत, एथील सामान्य लोक व धर्मोपदेशक लोक मानीत असत. इतालींत तो अद्भून-ही राहिला आहे. नव्या राजांनीं त्याला आश्रय दिला, व थियोदोशियस बादशाहाचे कायदे विसिगाथ व बर्गंदी ह्यांच्या राजांनीं पुनः चालू केले.

---

## धडा १८.

इतर त्यूतन लोकांपेक्षां लांबर्द लोक अधिक रानटी होते, व ते धर्मोपदेशकांचा फार द्वेष करीत. लांबर्द लोक पोपाशीं विरुद्ध चालल्यामुळें, आणि बैजांतियम येथील बादशाहाच्या प्रतिनिधी कडून त्याला साहाय्य न मिळाल्यामुळें, आल्प्स पर्वतांपलीकडील त्यूतन लोकांपैकीं जे सर्वांत प्रबळ होते त्यांच्या तोंडाकडे त्यांस पहावें लागलें. ते लोक फ्रांक होते.

फ्रांक लोकांचा उदय. ते रोमन लोकांबरोबर स्नेह करितात.

इ० स० ४८१. पांचव्या शतकाच्या अखेरीस फ्रांक लोकांच्या सालीं नामक खूमाचा मुख्य जो क्लोविस हा ऱ्हैन नदीच्या खालच्या भागावर राहणारे आपले बंधुवर्ग रिपुरी फ्रांक लोक ह्यांना सोडून गाल देश पुनः जिंकण्याकरितां निघाला. त्यानें ऱ्हैन नदीच्या थडींतील बर्गंदी लोकांचें राज्य लवकरच काबीज करून घेतलें, आणि आकितेन (गाल देशाचा नैर्ऋत्य भाग) येथून विसिगाथ लोकांना हांकून दिलें. ऱ्हैन नदीचे

पूर्वेस राहणारे आलेमनी लोक व त्यांचे एकोप्याचे लोक ह्यांना जिंकून जर्मनीच्या पश्चिम व दक्षिण भागांतील, ह्मणजे बिस्केच्या उपसागरापासून इन व एम्स ह्या दोन नद्यांपर्यंत जो प्रदेश आहे त्यांतील, सर्व लोकांना त्यानें आपल्या अमलाखालीं आणिलें. आठव्या शतकाचें अर्ध होईपर्यंत हे फ्रांक लोक मेरोविंजियन राजांच्या अमलाखालीं असतां त्यांचें एकच मोठें राज्य होतें असें नाहीं, तर लहान लहान संस्थानें मिळून त्यांचा एक कट झालेला होता. परंतु आठव्या शतकाचें अर्ध झाल्यावर "मेयर्स आफ् दि पालेस" ह्मणून मोठे कामगार होते त्यांचे हातीं सर्व खरी सत्ता गेली, व आस्त्रेशियन फ्रांक लोकांनीं आपल्या सर्व बंधुवर्गाचा पुढारीपणा घेऊन राज्य दृढ केलें. फ्रांक लोक हे सत्पथगामी होते, व ते धर्मोपदेशकांचे मित्र होते; त्यामुळें धर्मोपदेशकांनीं त्यांला आपले हाताखालचे प्रांतांतील रोमन लोकांत मोठ्या आदरानें येऊं दिलें. पोप हा लांबर्द लोकांवर खपा झाला होता, आणि मूर्तिपूजा पश्चिमयुरोपांतील खिस्ती लोकांनीं चालू केली असतां बेजांतियम एथील बादशाहानें मूर्ति मोडून टाकण्याचा हुकूम केला होता. हें पोपास वाईट वाटून हुकूम मानूं नये असा त्यानें निश्चय केला; आणि चार्लस मार्तेल ह्मणून जो मेयर आफ् दि पालेस व वास्तविक पाहिलें असतां फ्रांक लोकांचे राज्याचा अधिकारी होता, त्याच्याजवळ साहाय्य मागितलें. चार्लसचा मुलगा पेपिन ह्यानें त्याचें मागणें मान्य केलें, व उत्तरइतालींत एक्सार्काच्या, ह्मणजे बेजांतियम येथील बादशाहाच्या प्रतिनिधीच्या, हाताखालीं जितका मुलूख होता तितका सर्व त्या पोपाला दिला. ते उपकार फेडण्याकरितां पोपानें शेवटच्या मेरोविंजियन राजाला पदच्युत करून पेपिन ह्याला त्याच्या राज्याचा अधिकार दिला. ह्यानंतर वीस वर्षांनीं पेपिनचा मुलगा

चार्लस ह्यानें लांबर्द लोकांना जिंकून त्यांचें राज्य घेतलें. इ० स० ८०० त तो रोम शहरीं गेला तेव्हां कान्स्तंतैन बादशाहानें ख्रिस्ती धर्मानुयायी लोकांकरितां बांधिलेल्या सेंतपितरच्या थोरल्या देवळांत पोपानें त्याला रोमच्या राज्याचा मुगूट दिला. हा फ्रांक व पोप हे दोघे एकत्र मिळून त्यांनीं पूर्वेच्या राज्याचे बादशाहाचा अंमल आपणांवर नाहीं असें प्रगट केलें, व रोमशहरीं राज्याची मुख्य गादी पुनः स्थापिली. तरी अजून बैजंतियम एथील बादशाह राज्य करीतच होते. त्यावेळेपासून पूर्वेच्या राज्याची समाप्ति होईपर्यंत (१४५३) एकसारखे दोन्ही गाद्यांवरील बादशाह परस्परांस प्रतिस्पर्धी व शत्रू असें लेखीत.

इ० स० ७७४.

चार्लस ऊर्फ शार्लमेन ह्यानें पुनः नीट व्यवस्था करून पश्चिमेकडील सर्व मुलखाची चांगली बंदिस्ती केली, आणि रानवट व मूर्तिपूजक ह्या लोकांच्या बरोबर युद्ध करण्याकरितां ह्मणून आपल्या राज्यांतील सैन्य आणखी एकदां बाहेर पाठविलें. ईब्रो (स्पेन) नदीपासून कार्पेथियन पर्वतांपर्यंत, व ऐदर नदीपासून लिरिस (इताली) नदीपर्यंत, त्याचा अंमल होता. ऱ्हैन नदी हा त्याच्या राज्याचा मध्य होता, आखन (एलाशापेल) शहर त्याची राजधानी होती, व तो अस्सल जर्मन होता. प्रजेवर अंमल चालविणें; कायदे करणें; कलाकौशल्य, शिक्षण, आणि विद्या ह्यांविषयीं आस्था बाळगणें; युद्ध करणें; आणि वकिली करणें; ह्या सर्व कामांत तो मोठा प्रवीण होता. ज्या लोकांना त्यानें एका बादशाहीखालीं आणिलें ते नियमित रीतीनें वागण्यास तयार झालेले नसल्यामुळें तो मरण पावल्यावर पुनः ते वेगळे पडले. परंतु त्यानें केलेल्या गोष्टींचा परिणाम नाहींसा

झाला नाहीं. मागील काळचा घोंटाळा नाहींसा करून नूतन व्यवस्थापूर्वक राज्य स्थापन केलें तें ह्यानेंच पहिल्यानें केलें.

---

## धडा १९.

चार्लस ऊर्फ शार्लमेन ह्याच्या राज्याची त्याच्या नातवांमध्यें सारखी वांटणी झाली [इ० स० ८४३]. तेव्हां हल्लीं जो फ्रान्स देश आहे त्याचा जो भाग ऱ्होन व म्यूस ह्या नद्यांच्या पश्चिमेकडे आहे तो बहुतेक चार्लसानें घेतला. लोथर ह्याला बादशाह ह्मणत ह्मणून त्यानें उत्तरसमुद्रापासून भूमध्यसमुद्रापर्यंत एक लांबच लांब चिरोटी घेतली; तींत रोम व आखन हीं दोन्ही शहरें होतीं. लुईनें ऱ्हैन नदीच्या पूर्वेकडील सर्व भाग घेतला, तेव्हां हल्लीं ज्याला जर्मनी असें ह्मणतात तो भाग प्रथम निराळा झाला. लुईचे लोक जर्मन भाषा बोलत, व चार्लसाचे लोक फ्रांक लातिन भाषा बोलत. नंतर लोथरच्या राज्याचे इ-ताली, बर्गंदी, व लोरेन (लोथरिंजी) असे भाग झाले. इ० स० ८८८ त तिन्हीं राज्यें चार्लसाच्या अ-मलाखालीं झालीं. ह्या चार्लसाला "लठ्ठ चार्लस" ह्मणत. नंतर तीं राज्यें निरनिराळीं झालीं तीं पुनः कधीं एकत्र झालीं नाहींत.

जर्मनी– फ्रान्स. इ० स० ८४३.

इ० स० ८८८.

चार्लसाच्या वंशाची समाप्ति झाली तेव्हां जर्मनींत फ्रांकोनी, स्वाबी, बावारी, साक्सन, व लोरेनर (ऱ्हैनच्या पश्चिमेकडील) असे पांच लोक होते, ते निवड करून बादशाहांची नेमणूक करीत असत. त्यांपैकीं ओत्तो नांवाचा एक कोणी होता त्याला पोपानें सांगितलें कीं, इतालींतील झोटिंगबादशाही त्वां नाहींशी

चार्लस ह्यानें लांबर्द लोकांना जिंकून त्यांचें राज्य घेतलें. इ० स० ८०० त तो रोम शहरीं गेला तेव्हां
इ० स० ७७४.
कान्स्तंतैन बादशाहानें ख्रिस्ती धर्मानुयायी लोकांकरितां बांधिलेल्या सेंतपितरच्या थोरल्या देवळांत पोपानें त्याला रोमच्या राज्याचा मुगूट दिला. हा फ्रांक व पोप हे दोघे एकत्र मिळून त्यांनीं पूर्वेच्या राज्याचे बादशाहाचा अंमल आपणांवर नाहीं असें प्रगट केलें, व रोमशहरीं राज्याची मुख्य गादी पुनः स्थापिली. तरी अजून बैजंतियम एथील बादशाह राज्य करीतच होते. त्यावेळेपासून पूर्वेच्या राज्याची समाप्ति होईपर्यंत (१४५३) एकसारखे दोन्ही गाद्यांवरील बादशाह परस्परांस प्रतिस्पर्धी व शत्रू असें लेखीत.

चार्लस ऊर्फ शार्लमेन ह्यानें पुनः नीट व्यवस्था करून पश्चिमेकडील सर्व मुलखाची चांगली बंदिस्ती केली, आणि रानवट व मूर्तिपूजक ह्या लोकांच्या बरोबर युद्ध करण्याकरितां ह्मणून आपल्या राज्यांतील सैन्य आणखी एकदां बाहेर पाठविलें. ईब्रो (स्पेन) नदीपासून कार्पेथियन पर्वतांपर्यंत, व ऐदर नदीपासून लिरिस (इताली) नदीपर्यंत, त्याचा अंमल होता. ऱ्हैन नदी हा त्याच्या राज्याचा मध्य होता, आखन (एलाशापेल) शहर त्याची राजधानी होती, व तो अस्सल जर्मन होता. प्रजेवर अंमल चालविणें; कायदे करणें; कलाकौशल्य, शिक्षण, आणि विद्या ह्यांविषयीं आस्था बाळगणें; युद्धकरणें; आणि वकिली करणें; ह्या सर्व कामांत तो मोठा प्रवीण होता. ज्या लोकांना त्यानें एका बादशाहीखालीं आणिलें ते नियमित रीतीनें वागण्यास तयार झालेले नसल्यामुळें तो मरण पावल्यावर पुनः ते वेगळे पडले. परंतु त्यानें केलेल्या गोष्टींचा परिणाम नाहींसा

झाला नाहीं. मागील काळचा घोंटाळा नाहींसा करून नूतन व्यवस्थापूर्वक राज्य स्थापन केलें तें ह्यानेंच पहिल्यानें केलें.

---

## धडा १९.

चार्लस ऊर्फ शार्लमेन ह्याच्या राज्याची त्याच्या नातवांमध्यें सारखी वांटणी झाली [इ० स० ८४३]. तेव्हां हल्लीं जो फ्रान्स देश आहे त्याचा जो भाग ऱ्होन व म्यूस ह्या नद्यांच्या पश्चिमेकडे आहे तो बहुतेक चार्लसानें घेतला. लोथर ह्याला बादशाह ह्मणत ह्मणून त्यानें उत्तरसमुद्रापासून भूमध्यसमुद्रापर्यंत एक लांबच लांब चिरोटी घेतली; तींत रोम व आखन हीं दोन्ही शहरें होतीं. लुईनें ऱ्हैन नदीच्या पूर्वेकडील सर्व भाग घेतला, तेव्हां हल्लीं ज्याला जर्मनी असें ह्मणतात तो भाग प्रथम निराळा झाला. लुईचे लोक जर्मन भाषा बोलत, व चार्लसाचे लोक फ्रांक लातिन भाषा बोलत. नंतर लोथरच्या राज्याचे इ-ताली, बर्गंदी, व लोरेन (लोथरिंजी) असे भाग झाले. इ० स० ८८८ त तिन्हीं राज्यें चार्लसाच्या अ-मलाखालीं झालीं. ह्या चार्लसाला "लठ्ठ चार्लस" ह्मणत. नंतर तीं राज्यें निरनिराळीं झालीं तीं पुनः कधीं एकत्र झालीं नाहींत.

जर्मनी– फ्रान्स. इ० स० ८४३.

इ० स० ८८८.

चार्लसाच्या वंशाची समाप्ति झाली तेव्हां जर्मनींत फ्रांकोनी, स्वाबी, बावारी, साक्सन, व लोरेनर (ऱ्हैनच्या पश्चिमेकडील) असे पांच लोक होते, ते निवड करून बादशाहांची नेमणूक करीत असत. त्यांपैकीं ओत्तो नांवाचा एक कोणी होता त्याला पोपानें सांगितलें कीं, इतालींतील झोटिंगबादशाही त्वां नाहींशी

केली, तर मी तुला रोमचा बादशाह हा किताब देईन. त्यावरून तो रोमपर्यंत गेला, आणि तेथें त्यानें शार्लमेनच्या राज्याचें पुनरुज्जीवन केलें, किंवा रोमचें पवित्र राज्यच त्यानें नवें केलें, असें ह्मटलें असतांही चालेल. तें पवित्र राज्य त्या वेळेपासून तसेंच चाललें आहे. पृथ्वीवर जेथें जेथें रोमन काथलिक धर्म आहे तेथें तेथें तें राज्य असावें, असा त्याचा संकल्प होता. ह्मणजे धर्मसंबंधानें त्याचा स्वामी पोप असावा, व इहलोकच्या संबंधानें त्याचा स्वामी बादशाह असावा, असें होतें. ओत्तो हा जर्मनीचा राजा असल्यामुळें त्यानें लोथरिंजी प्रांत आपल्या राज्याला जोडला, आणि बर्गंदी प्रांत आपल्या आश्रयाखालीं ठेविला, आणि आपल्या राज्याच्या पूर्वेकडील भागाला बळकटी आणण्याकरितां तुराणी वंशांतील हंगरी लोकांकडून बरोबर कळप घेऊन फिरण्याची चाल जबरदस्तीनें सोडून देवविली. ह्याप्रमाणें खास जर्मनी, व इतालीचे दोन तृतीयांश, शिवाय बर्गंदी, बोहिमियां, मोराविया, पोलंद, व देन्मार्क हीं राज्यें त्याचे अमलाखालीं होतीं. हंगारीचें राज्यही त्याचे अमलाखालीं कदाचित् होतेंसें दिसतें. त्यानें सर्व जर्मन लोक एक करून त्यांचें एक राष्ट्रच केलें. त्याबरोबरच त्यानें रोम व रोमाकडचा अधिकार हीं त्यांचे हातीं देऊन त्यांला युरोपांतील सर्व लोकांमध्यें श्रेष्ठत्वाचे शिखरास चढविलें.

इ० स० ९८३.

पश्चिमेकडील फ्रांक लोकांचे राज्यांत कालिंग राजे (थोरल्या चार्लसाच्या वंशांतले) लेयान शहरीं राज्य करीत असत, त्यांचे जागीं ह्यू कापेत ह्मणून पारिस शहरचा कौन्त होता तो व त्याचे वंशांतले पुरुष इ० स० ९८७ पासून राज्य करूं लागले. ह्या देशांतील फ्रांक लोक रोमन झालेल्या केल्त लोकांतच मिळून गेले होते. ह्यांची भाषा वेगळी होती इतकाच काय तो हे व

जर्मनींतील फ्रांक लोक ह्या दोहोंत भेद होता. ह्यांच्या देशाच्या पूर्वेस जर्मनींतील बर्गंदी व लोरेन हे दोन प्रांत होते. येथील गादीवर ह्यू कापेत बसला तेव्हांपासून ह्या देशास फ्रान्स हें नांव दिलें तरी चालेल.

इ० स० ९८७.

---

## धडा २०.

पश्चिम युरोपां-तील आर्य लोकांच्या वसाहतींचा पुनः विचार.

जे त्यूतन लोक सरहद्दीचें उल्लंघन करून रोमच्या राज्यांत आले, त्यांच्या इतिहासाची तुह्मांला आतां थोडीशी माहिती झाली आहे; तरी सर्व त्यूतन लोकांनीं युरोपांत ज्या ज्या वसाहती केल्या त्यांचीही सामान्य माहिती तुह्मांला असली पाहिजे.

तुह्मांला मागें वाचून जें समजलें आहे तें प्रथम मनांत आणा:—

१. आपणांला ठाऊक आहेत असे युरोपांतले अगदीं प्राचीन काळचे लोक काळे होते. ते पिरनीस पर्वतांचे बास्क प्रांत व आक्वितेन (फ्रान्स देशाचा नैर्ऋत्यभाग) ह्यांमध्यें निराळेच हल्लीं आढळतात. त्यांची भाषा आर्य लोकांच्या भाषेहून निराळी आहे.

२. नंतर केल्त लोक आले. ते आर्य वंशांतले होते (धडा १४). त्यांनीं मूळचे राहणारे बहुतेक काळे लोक आपणांत मिळवून घेतले, व त्यांजकडून आपल्या केल्तिक भाषेचा स्वीकार करविला.

३. केल्त लोकांच्या मागून आर्य वंशांतील दुसऱ्या लोकांची एक टोळी आली. ते लोक त्यूतन होते. त्यांनीं केल्त लोकांना युरोपाच्या पश्चिमहद्दींत हांकून लाविलें, आणि आपण त्यांच्या जागा घेतल्या.

गाथ लोकांनीं स्पेन देशांत आपला अंमल बसविला, आणि आपण तेथें राहणारे बहुतेक रोमनासारखे झालेले केल्त लोक होते त्यांच्या मध्यें मिसळले, व एका प्रकारची लातिन भाषा बोलूं लागले. इताली, स्वित्सर्लंदचा कांहीं भाग, आणि फ्रान्सचा दक्षिणभाग (प्राविन्स प्रांत) ह्या ठिकाणीं असेंच झालें. रोमच्या राज्याचे हद्दीनजीकचे प्रांत, ह्मणजे वालाख्या, मोल्देव्या, हंगारीचा कांहीं भाग, त्रान्सिल्वानिया, व बेसारब्या, ह्या सर्व प्रांतांतही असेंच झालें. भाषा, कलाकौशल्य व पलडेल्या चाली ह्यांमध्यें रोमचे संबंधानें इताली व प्रोविन्स प्रांत ह्या दोन ठिकाणीं फारच फरक चालत आलेला होता; अकितेनमध्यें त्यापेक्षां कांहीं कमी होता; नार्मंदींत त्याहीपेक्षां कांहीं कमी होता; ब्रितनांत अगदींच कमी होता, मुळींच नव्हता असें ह्मटलें तरी चालेल. ग्रीस देशांत अर्वाचीन स्वरूपास आलेली ह्मणजे कालगतीच्या योगानें व्याकरणदृष्टया बदललेली जुनी ग्रीक भाषा [१]रोमाइक भाषेंत आढळते. [२]रोमान्स भाषांचा प्राचीन लातिन भाषेशीं जो संबंध आहे तोच रोमाइक भाषेचा प्राचीन ग्रीक भाषेशीं संबंध आहे.

तुम्हांला मागें सांगितलें आहे कीं, कांहीं फ्रांक लोक ज्याला हल्लीं फ्रान्स म्हणतात त्या देशांत शिरले. तेथें राहणारे लोकांत रोमन झालेल्या केल्त लोकांचा भरणा मोठा होता! त्यांच्यांत ते पुढें कांहीं दिवसांनीं मिसळले, व त्याप्रमाणें एक प्रकारची लातिन भाषा बोलूं लागले.

रोमच्या जुन्या राज्याच्या हद्दीच्या बाहेर उत्तरेस व पूर्वेस

---

१ अर्वाचीन काळच्या ग्रीक लोकांच्या भाषेस रोमाइक भाषा ह्मणतात.

२ रोमन ह्मणजे लातिन भाषा हिजपासून थेट निघालेल्या भाषांस रोमान्स हें नांव आहे.

राहणाऱ्या त्यूतन लोकांनीं आपल्या भाषेंत लातिन भाषेचें मिश्रण होऊं दिलें नव्हतें, हेंही मागें सांगितलें आहे; व गाथ लोकांची भाषा नवव्या शतकांत अगदीं नाहींशी झाली (चवथ्या शतकांत त्या भाषेंत लिहिलेला असा फक्त एकच ग्रंथ उपलब्ध आहे); परंतु तत्सजातीय त्यूतन लोक व त्यांच्या भाषा अजून आहेत. हालंद व ब्रितिश बेटें एथील लोक व त्यांत जी एक प्रकारची जर्मन भाषा आहे ती, आणि मध्य जर्मनींतील लोक व त्यांत जी दुसरे प्रकारची जर्मनभाषा आहे ती, हीं त्यूतन जातीचीं आहेत. दुसरा त्यूतन लोकांचा वर्ग स्कान्दिनावी ह्मणून एक आहे, तो स्वीदन, नोर्वे, देन्मार्क, व ऐसलंद ह्या देशांत आहे. आर्य लोकांची तिसरी शाखा स्लावोनी ह्मणून एक आहे, तींत पूर्वप्रुश्या, रूस, पोलंद, बोहीमिया, बल्गारिया, सर्बिया, व क्रोयाशिया ह्या देशांतील लोक येतात.

आतां हीं नांवें कसकशीं पडलीं ह्याचा थांग लावणें हें येथें आवश्यक आहे. कारण ह्यावरून जे आर्य लोक मूळठिकाण सोडून पश्चिमेकडे गेले ते कोण कोणते देशांत राहिले हें तुह्मांला कळेल. हे पश्चिमेकडील आर्य लोक युरोपाच्या मोठया पश्चिमद्वीपकल्पांतच सर्व दाटीनें भरले होते. ह्यांचींच इंग्लंद, जर्मनी, फ्रान्स, स्पेन, आणि इतर सुधारलेलीं पश्चिमेकडील राष्ट्रं झालीं.

ह्यांच्या हद्दीचे बाहेर पूर्वेकडे तुराणी वंशांतले कळप घेऊन फिरणारे कांहीं लोक होते. हे आशियांतील उच्च प्रदेशांत आर्य लोक होते त्यांना तेथून पुढें रेटण्याविषयीं झटत असत असें आपणांला कळून आलेंच आहे. ह्यांत फिन्लंदचे लोक, बाल्तिक समुद्रावरील इस्थोनीचे लोक, लाप्लंदचे लोक, व हंगारीचे लोक हे येतात. ह्यांच्या पलीकडे पूर्वेस तुराणी घराण्यांतल्या लोकांचा मुख्य भरणा होता. त्यांच्या तुंगूसी, मंगोली, आणि

तुर्की अशा तीन शाखा होत्या. नकाशावरून तुमच्या ध्यानांत येईल कीं, युरोपाचा पूर्वभाग व आशियेचा उत्तरभाग हे चीनचें राज्य, रूसचें राज्य, आणि तुर्कस्थान ह्यांच्यामध्यें वांटले आहेत. तुराणी लोकांच्या इतिहासांत मुख्य गोष्ट ही आढळते कीं, मंगोली लोकांपैकीं [१]झिंगिजखान नांवाच्या एका महाविजयी पुरुषानें एक मोठें राज्य स्थापिलें इ० स० (१२२७). त्या राज्यांत चीन, रूस, सिलेसिया, पोलंद, आणि कास्पियन समुद्र व काळा समुद्र ह्यांच्या उत्तरेकडील तुर्की लोकांचीं संस्थानें, इतके मुलूख होते. तेराव्या शतकाच्या अखेरीस हें राज्य मोडून त्याचीं चीन, तुर्कस्थान, सैबीरिया, रूसदेशचा दक्षिणभाग, व इराण ह्या ठिकाणीं लहान लहान राज्यें होऊन त्यांवर मंगोली जातीचे राजे राज्य करूं लागले. सन १२६० त चीन देशांतून मंगोल लोकांना हांकून लाविलें, व पंधरावे शतकांत त्यांचेकडून रूस देश गेला. परंतु सन १३६९ त तैमूर ह्याच्या अमलाखालीं ते सांवरले. इ० स० १४६८ त हें राज्यही पुनः लयास गेलें. परंतु त्याचा कांहीं भाग जिहून व सिहून ह्या नद्यांच्या आसपास राहिला होता. तेथूनच बाबर हा दिल्ली एथें मोगल लोकांच्या राज्याची स्थापना करावयास निघाला. हल्लींचे मंगोली लोक बहुतकरून चीन देशांतील तुंगुसी जातीचे बादशाह, रूसदेशचे बादशाह, आणि तुर्कस्थानचे सुलतान ह्यांच्या अमलाखालीं आहेत.

तुंगूसी शाखेच्या लोकांनीं इ० स० १६४४ त चीन देश काबीज केला, तेव्हांपासून ते नांवलौकिकास आले. मान्शू अथवा मान्चू घराण्याचा अद्यूनही तेथें अंमल आहे. आ-

---

[१] हा मोंगल लोकांचा राजा होता.

णखीही कांहीं तुंगूसी घराणीं सैबीरिया एथें रशियनलोकांच्या अमलाखालीं आहेत.

तुर्की ह्मणून दुसरा एक तुराणी लोकांचा वर्ग आहे. तुर्की लोक इराणच्या उत्तरभागीं व आर्मेनी प्रांतांत व कौकसस पर्वत आणि काळा समुद्र व कास्पियन समुद्र ह्यांच्या जवळच्या प्रदेशांत आढळतात. बल्ख, खीबा, आणि बुखारा ह्या प्रांतांतील उस्बेक लोक तुर्की आहेत. किर्गिज नामक सपाट प्रदेशांतले फिरस्ते लोकही तुर्की आहेत. सेल्जूक ह्मणून दुसरी एक तुर्की लोकांची जात होती तिची ओस्मनली नांवाची शाखा हल्लीं कान्स्तांतिनोपल शहरामध्यें अंमल करीत आहे. तातार हें नांव सामान्यतः तुर्कीलोकांना देतात; परंतु वस्तुतः हें नांव मंगोली लोकांचें आहे.

मध्यकाळांत ( ख्रिस्ती शक ८००-१५०० ) युरोप व आशिया ह्या दोन खंडांच्या बहुतेक भागाची जी स्थिति होती तिची साधारण रीतीची कल्पना तुम्हांला आतां स्पष्टपणें करितां येईल. जर्मनी, फ्रान्स, इंग्लंद, स्पेन, इताली, पोलंद, बोहीमिया, सर्विया, देन्मार्क, व स्वीदन ह्या देशांतले आर्यलोक पश्चिम युरोपांत दाटीनें राहिले होते. तुराणी वंशांतले लोक रूसदेश व आशिया ह्यांत भटकत फिरत असत, आणि हंगारी, पोलंद, आणि आशियामैनर ह्या देशांच्या आसपास आर्य लोकांबरोबर त्यांची चकमक झडत असे. इ० स० १४५३ पर्यंत कान्स्तांतिनोपल ह्मणजे स्तंबूल शहर एथें रोमन लोकांचे (रोमन लोकांचें ह्मणावें ह्यापेक्षां ग्रीक लोकांचें ह्मणावें हें बरें) एक राज्य होतें त्याला आस्मनली तुर्की लोकांचा मोठा धाक होता, व तें अखेरीस त्यांनींच काबीज करून घेतलें.

दक्षिणेस आणखी दुसरे प्रबळ लोक होते त्यांविषयीं अजून

सांगावयाचें आहे. सहाव्या शतकापुढें पश्चिमेकडील आर्य व हिंदुस्थानांतील वेदोक्तधर्मास अनुसरणारे आर्य ह्यांच्या मध्यें ह्यांनीं येऊन त्या दोघांना वेगळे ठेविलें. ते कोण ह्मणाल तर महंमदी धर्माचे लोक. आतां त्यांची हकीकत सांगितली पाहिजे.

---

## धडा २१.

ज्यांत शमी कुळांतले एक लोक राहत होते त्या अरबस्तानाच्या द्वीपकल्पाचा नकाशा घ्या. ह्या द्वीपकल्पांत महंमद मक्केस इ० स० ५७१ त जन्मला, त्यावेळीं अरबस्तानचे लोक आकाशांतील तारागणाचें भजन पूजन करीत; किंबहुना वृक्ष व पाषाण ह्यांसही भजत. [१]काबाचा काळा दगड तुह्मांला ऐकून ठाऊक आहेच. परंतु अरबस्तान व पालिस्तैन ह्यांच्या मध्यें फार दिवस संबंध असल्यामुळें कांहीं सुशिक्षित यहुदी लोक त्या लोकांत होते. आणि महंमदानें त्या विद्वान् यहुदी लोकांपासून आपल्या धर्माचा पुष्कळ अंश घेतला. ही वेळ राष्ट्रें नव्या धर्माची वाट पाहत असतात अशा वेळांपैकीं एक होती असें दिसलें. महंमदाचे अनुयायी ह्यांनीं दुसऱ्या देशांत जाऊन आपला कुराणांत सांगितलेला धर्म तलवारीच्या बळानें प्रवृत्त करण्यास आरंभ केला. ते दोन्ही बाजूंस पसरले; ह्मणजे पश्चिमेस आफ्रिकेच्या उत्तरकिनाऱ्याच्या लगत्यानें, व उत्तरेस आणि पूर्वेस सुरदेश आणि इराणदेश ह्यांकडे पसरले.

महंमद ५७१-६५०.

---

१ मक्केचे देवळांत काबा नांवाचा एक चौरस दगड आहे त्याला महंमदी लोक भजतात. कधीं कधीं त्या देवळालाही काबा ह्मणतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सेल्यूकसच्या वंशांतील राजांचें बहुतेक राज्य पार्थी लोकांनीं कसें घेतलें ह्याविषयीं मागें (धडा १४) सांगितलें आहे. इ० स० २२६ त आर्दशीर राजानें इराणचे राज्याचें पुनरुज्जीवन केलें, आणि सासानिदीज वंशाची स्थापना केली. ह्या इराणचे राजांचें पूर्वेचे व पश्चिमेचे रोमच्या बादशाहांबरोबर वारंवार युद्ध होत असे. सातव्या शतकाचे शेवटीं इराणचे राजानें कान्स्तांतिनोपलचे तटबंदीपर्यंत रोमचें राज्य घेतलें, तेव्हां रोमचे बादशाहानें तुर्क लोकांजवळ साहाय्य मागितलें. इकडे इराणच्या राजालाही काळ अत्यंत प्रतिकूळ येऊन तो मोठ्या संकटांत होताच, इतक्यांत महंमदाचे अरब लोक त्यावर येऊन पडले. आणि त्यांनीं त्याचें सर्व राज्य आक्रमून बल्ख शहर आणि जिहून नदी येथपर्यंत सर्व मुलूख फस्त केला. त्या वेळीं जिहून नदी ही सहराजन (ह्मणजे अरब) व तुर्की लोक ह्यांच्या मधील मर्यादा झाली. हे अरब लोक जुलूम करूं लागले ह्मणूनच पारसी लोक आपली जन्मभूमि सोडून इराणी अखातांतून पश्चिमहिंदुस्थानांत येऊन आस्रा पाहून राहिले.

इराणांत इ० स० ६५०.

सुरदेशांत अरबांनीं दमास्कस, आलेपो, व अंत्योख हीं शहरें घेतलीं, आणि ते आशियामैनरांत शिरले. फीनिकी देशाचे किनाऱ्यावर त्यांनीं एक आरमार तयार केलें, व सैप्रस आणि ऱ्होदस हीं बेटें घेतलीं. मिसर देशांत त्यांनीं अलेक्जांद्रिया शहर घेतलें. आफ्रिकेंत बैजांतियम एथील बादशाहाचा जो थोडाबहुत अंमल राहिला होता तो त्यांनीं नष्ट केला. आपल्या राजाचा विश्वासघात करून कोणी सरदारानें त्यांना स्पेन देशामध्यें बोलाविलें; तेव्हां तेथें जाऊन त्यांनीं आस्तूरिया पर्वतांपर्यंत गाथ लोकांचें राज्य मागें हटविलें, आणि आपण फ्रान्सांत गेले. तेथें थोरल्या चार्लस-

स्पेनमध्यें इ० स० ७१०.

च्या आजानें त्यांचा पराभव करून त्यांस मागें हटविलें. स्पेनमधून जाऊन त्यांनीं सिसिली व क्रीत हीं बेटें घेतलीं, व गलबतांतून तैवर नदींतून वर जाऊन रोम शहरास जाणाऱ्या राजमार्गावर जीं कबरस्थानें होतीं तीं लुटलीं. [1]ओमयादी लोकांनीं स्पेन देशांत कार्दोवा शहरीं एका राजवंशाची स्थापना केली; [2]आबासैदी लोकांनीं ( इ० स० ७५० नंतर ) तैग्रिस नदीवर बगदाद शहरीं स्थापना केली; आणि [3]फातिमैती लोकांनीं आफ्रिका, मिसर, व पालिस्तैन ह्या देशांत केली.

हिंदुस्थानांत, ६६४–७११.

इ० स० ६६४ त [4]मेर्व येथून निघून एका अरबी सैन्यानें काबुलावर स्वारी केली, व मुलतान पर्यंत शिरकाव केला. ७११ त खलीपा वालिद ह्यानें समुद्रकिनाऱ्याचे बाजूनें व सिंधुनदाच्या उगमाकडे दुसरें एक सैन्य पाठविलें. ह्याप्रमाणें ह्या नव्या धर्माचा हिंदुस्थानांतील आर्य लोकांशीं संबंध झाला.

इ० स० ७१३ चे आंत अरबांनीं जिहून नदी उतरून [5]खारिसम व [6]फर्गाना हीं दोन राज्यें जिंकिलीं; ह्मणजे ज्या वेळीं त्यांनीं आपला अंमल स्पेन देशांत बसविला त्याच सुमारास

---

१ ओमयाद ह्मणून अरब लोकांचा सरदार होता. तो पुढें खलीप झाला त्याचे वंशज. ह्यांचें निशाण पांढरें होतें.

२ आबास म्हणून महंमदाचा चुलता होता त्याचे वंशज. ह्यांचें निशाण काळें होतें.

३ फातिमा ह्मणून महंमदाची मुलगी आणि अलीची बायको होती तिचे वंशज. ह्यांचें निशाण हिरवें होतें.

४ हें शहर खुरासान प्रांतांत होतें, हल्लीं तें मोडलेलें आहे.

५ स्वतंत्र तार्तरींतील खीवाचें राज्य आणि हें एकच.

६ स्वतंत्र तार्तरींतील लोकांचें राज्य आणि हें एकच.

हें केलें. त्यांचें सैन्य जाण्याची बहुतकरून येथपर्यंतच पराकाष्ठेची हद्द होती. परंतु महंमदी धर्म फार दूरवर ह्मणजे कळप बरोबर घेऊन हिंडणारे तार्तार लोकांत व चीन आणि मलाया ह्यांतही पसरला.

---

## धडा २२.

मुसलमान, तुर्क-लोक, सेल्जूक लोक इ० स० १०४०-१४५३.

अरबस्तानांतील मुसलमानांनीं स्थापित केलेल्या राजवंशावळींचा ऱ्हास लवकरच होऊं लागला. परंतु रोमच्या बादशाहांनीं अडाणी जे त्यूतन लोक ह्यांना जसें आपल्या घरांत व सैन्यांत ठेविलें होतें, त्याप्रमाणेंच खलिपांनीं कळप बरोबर घेऊन हिंडणाऱ्या तुर्क लोकांना ठेविलें होतें. नंतर तुर्क लोक स्वाऱ्या करूं लागले. इ० स० १०४० त सेल्जूक लोक (गिझनीच्या महमुदाचे वंशजांना हिंदुस्थानांत हाकून लाविल्यावर) इराणांतून बगदाद शहर व त्यापलीकडचें बैजंतियमचें राज्य ह्यांवर हल्ला करण्याकरितां गेले. आतां सेल्जूक लोक हे बगदादचे खरे धनी झाले, आणि खलिपा हा केवळ राजा असून नसल्यासारखा झाला. त्यांनीं आशियामैनर प्रांत घेतला; बैजंतियमचे बादशाहाला तह करायाला लाविलें; आणि यरूशालेम शहरांतील फतिमैती लोकांवर हल्ला केला. पुढें लवकरच सेल्जूक लोकांचे राज्याचे लहान लहान विभाग होऊन त्यांत सुल्तान नांवाचे अधिकारी अंमल चालवूं लागले. ह्या सुल्तान वंशांपैकीं एकाची स्थापना ओस्मन ह्यानें केली, व त्याचा नातु हेलेस्पांत सामुद्रधुनी उतरून युरोपांत प्रथम गेला (१३६७). त्याचे मागून झालेल्या सुल्तानानें बुल्गारिया व सर्विया एथील

स्लावोंनी (आर्य) लोकांचा पराभव केला. त्याच्या मागच्या सुल्तानानें थिसाली प्रांत घेतला, पेलापोनीसस देश उद्वस्त केला, व सिगिसमंद नामक जर्मनीच्या बादशाहाचा दान्युब नदीवर पराभव केला (१३९९). ह्याप्रमाणें सुल्तानांचा भरभराट चालला असतां मध्यें तैमूर ह्यानें बायजीद नांवाच्या ओस्मनली सुल्तानाला धरून कैद केलें (१४०२). त्यामुळें त्यांच्या भरभराटीस विघ्न आलें, परंतु महंमदाचे हाताखालीं ओस्मन सैन्याची थावराथावर झाली (१४१५), व त्यानें हंगरी प्रांताचे आणि स्लावोनिया प्रांताचे सरहद्दीपर्यंत पुनः लढाई चालविली. पुढें कान्स्तांतिनोपलचें रक्षण होईनासें झालें, तेव्हां दुसऱ्या महंमदानें तें घेतलें (१४५३). त्या वेळापासून तें शहर ओस्मनली सुल्तानांची राजधानी झालें, व अजूनही तें शहर त्यांचीच राजधानी आहे.

---

## धडा २३.

कान्स्तांतिनोपल एथील तुर्की राज्य. इ० स० १४५३–१७००.

नंतर लागलीच ओस्मनली लोक हे हंगरी, पोलंद, व बोहीमिया ह्या युरोपांतील आर्य लोकांच्या पूर्वभागावर हल्ला करूं लागले. हे आर्य लोक ख्रिस्ती होते, व मुसलमान लोकांचा फार कंटाळा करणें हें ख्रिस्ती लोकांचें कर्तव्य कर्म आहे असें त्या काळीं मानीत असत. ओस्मनली लोकांनीं यरूशालेम शहराला सुद्धां पीडा दिली. अरब लोक मक्केला मानतात त्याप्रमाणेंच त्या शहराला ख्रिस्ती लोक मानतात. पश्चिमेकडील लोक बैजंतियमच्या बादशाहाला अजूनही मनापासून मान देत होते; परंतु त्या बैजंतियमच्या बादशाहास समूळ

नाहींसें करण्याचें भय ओस्मनली लोकांनीं घातलें होतें. ह्या सर्व कारणांपासून, यरूशालेम शहर परत घेण्याकरितां ख्रिस्ती धर्मनिंदक सहराजन लोकांवर, ह्मणजे मुसलमानांवर, ख्रिस्ती लोकांनीं ज्या स्वाऱ्या केल्या, त्या उत्पन्न झाल्या. ह्यांला इंग्रजींत क्रूसेड्स ह्मणतात (इ० स० १०९५-१२९१). ह्या स्वाऱ्यांच्या योगानें पुष्कळांचें शौर्य बाहेर पडलें; परंतु यश थोडें मिळालें, आणि प्राणहानि फार झाली. इ० स० १४५३ त युरोपांतील शूरांना ह्या स्वाऱ्यांचा कंटाळा आला, आणि त्यामुळें कान्स्तांतिनोपल शहराचें संरक्षण करण्याकरितां पोपाला त्यांजकडून साहाय्य मिळेनासें झालें.

"क्रूसेड्स."

खिस्ती लोक व तुर्क लोक ह्यांच्या मध्यें युरोपाचे पूर्वभागांत लढाया चालल्याच होत्या. इ० स० १५२६ त तुर्कांच्या सुलतानानें विएना शहराला वेढा घातला, व ब्यूदा शहर घेतलें. तें १५० वर्षें त्याच्या ताब्यांत होतें. १५७१ त त्यानें माल्टा बेटावर हल्ला केला; परंतु आस्त्रियाचा *दान जान ह्यानें लेपांतो बंदर येथें त्याचा पराभव केला. सोळाव्या शतकाच्या अखेरीस कान्स्तांतिनोपल एथील सुलतानी सरकार ह्याचें प्राबल्य कमी होऊं लागलें. इ० स० १६५६ त तें कांहींसें पूर्वस्थितीवर आलें, परंतु त्या सरकाराची वागणूक फार त्रासक असल्यामुळें पुनः नवीन लढाई सुरू झाली, तींत पोलंदचा राजा जान सोबीस्की ह्यानें इ० स० १६८३ त तुर्क लोकांचा विएना येथें मोठा

युरोपाचे पूर्वभागांत लढाया.

---

* हा दान जान पांचवा चार्लस जो जर्मनीचा बादशाह ह्याचा कडू पुत्र होता.

पराभव केला. ब्यूदा शहर त्याच वेळीं परत घेतलें. आणि बेल्ग्रेद शहर पुढें लवकरच घेतलें. १६९९ त सुलतानी सरकारानें जिंकलेल्या मुलुखांतून पुष्कळ मुलूख सोडून दिला. तुर्कलोकांनीं वेनीस शहर, जर्मनीचें राज्य, व रूस देश ह्यांतील लोकांबरोबर ज्या लढाया केल्या त्या फार असल्यामुळें येथें सांगतां येत नाहींत, व अर्वाचीन राज्यनीतीकडे लक्ष्य लागून हें जुनें वैमनस्य नाहींसें होण्यापूर्वींच अठरावे शतकाचीं बरींच वर्षें होऊन गेलीं होतीं.

स्पेनमधून मुसलमान लोकांना घालविलें. इ०स० १४९२.

विषुववृत्ताच्या दुसऱ्या टोंकास स्पेन देशांत महंमदाचे अनुयायी हे फार दिवस युरोपांतून मागें हटले होते. अकराव्या व बाराव्या शतकांत लेयोन आणि कास्तिल्ला हीं राज्यें, तशींच आरागोन आणि नावारा हीं राज्यें, ह्यांतील लोकांनीं मुसलमानांवर चाल करून जाण्याची सुरवात केली. तेव्हां ते मागें हटून ग्रानदा प्रांतांत गेले, तेथून त्यांला इ० स० १४९२ त पुनः परत न येतील असें हांकून लाविलें. हा जय झाल्यामुळें मुसलमानांनीं कान्स्तांतिनोपल घेतल्याचें नुकसान हें बहुतकरून नाहींसें झालें.

---

## धडा २४.

अर्वाचीन युरोप.

युरोपांतील अर्वाचीन राज्यपद्धतीची सुरवात इ० स० १५०० पासून होते. ही पद्धत पुष्कळ गढून अभ्यास करण्यासारखा विषय आहे. परंतु युरोपांतील राज्यांत ह्या वेळीं पुष्कळ आणि मोठमोठे जरी फेरफार झाले होते, तरी ते येथें सांगतां येत नाहींत. पूर्वी ज्या लोकांच्या हातीं युरोप देश होता त्याच लोकांच्या हातीं तो राहिला आहे, व त्याचे

मुख्य विभागही पहिले होते तेच आहेत. ह्मणून युरोपांतील राज्यांविषयीं थोडेंसें लिहिल्यावर युरोपांतील आर्य लोक पश्चिम व पूर्व ह्या दिशांकडे पुनः कसकसे पसरत गेले ह्याचें वर्णन करणें आवश्यक आहे.

युरोपांतील संस्थानें.

इसवी सन १५०० चे पुढें युरोपांतील राज्यांचे दोन भाग करितां येतील; ह्मणजे एक दक्षिणेकडील भाग व दुसरा उत्तरेकडील भाग. दक्षिणेकडील भागांत इंग्लंद, फ्रान्स, स्पेन, आस्त्रिया, जर्मनीचें साम्राज्य, पोपाचा मुलूख, व तुर्की सुलतानांचें राज्य हीं मुख्य राज्यें होतीं, आणि उत्तरेकडील भागांत स्वीदन, देन्मार्क, पोलंद, रूस, व प्रुश्या हीं होतीं.

इंग्लंद. इंग्लिश लोक हे कोण?

इ० स० ४१० त रोमन लोकांनीं इंग्लंद देश सोडून दिल्यावर तेथें राहणाऱ्या केल्त जातीचे लोकांना [१]त्यूतन जातीचे जूत, [१]आंगल, व [१]साक्सोन ह्या लोकांनीं पश्चिम कोंपऱ्यांत हाकून लाविलें. हे सर्व लोक युरोपाच्या महाद्वीपांतून आले. आणि कांहीं काळ गेल्यावर ते वेगळीं वेगळीं अनेक राज्यें करून राहिले. तेच पुढें इंग्लिश लोक झाले. पुढें ह्या सर्व राज्यांचें मिळून एक राज्य झालें, व त्याचें नांव पश्चिमेकडील साक्सोन लोकांचें राज्य असें पडलें. हीं सर्व राज्यें मिळून एक राज्य झालें तें चार्लस धि ग्रेत ह्यानें ज्या वेळेस फ्रान्स व जर्मनी ह्यांतील फ्रांक लोकांचें राज्य एक केलें (इ० स० ८००) त्याच वेळेस झालें. त्यानंतर जूत व साक्सोन हे लोक जसे पूर्वी आले तसेच देन्स (ह्मणजे उत्तरेकडचे लोक) ह्मणून आणखी त्यूतन लोक युरोपाच्या मुख्य

---

१ हे देन्मार्क आणि हालंद ह्या देशांतील प्राचीन लोक होत.

भूमींतून (महाद्वीपांतून) इंग्लंदांत आले, आणि त्यांनीं इंग्लिशांना दोनशें वर्षेपर्यंत फार पीडा दिली. अखेरीस पुष्कळ देन्स लोक इंग्लंदांत घरेंदारें करून राहिले व इंग्लिश झाले.

देन्स लोकांपैकीं कांहीं लोक ९१२ त पश्चिमेकडील फ्रांक लोकांत आले; त्यावेळीं त्यांचा मुख्य रोलो ऊर्फ रोल्फ हा होता. कार्लिंग वंशांतील राजा जो पारिसचा कौंत होता त्यानें त्यांना कांहीं मुलूख दिला. आणि रुएन हें शहर त्याचे राजधानीकरितां दिलें. ते त्या मुलखाला नार्मंदी ह्मणजे उत्तरेकडच्या लोकांचा मुलूख असें ह्मणत. हे देन्स लोक फ्रेंच भाषा बोलावयास शिकले. रोल्फपासून नार्मंदीचा सहावा द्यूक हा इंग्लंदांत गेला, आणि त्यानें इंग्लंद व इंग्लिश लोक ह्यांना जिंकिलें (१०६६).

परंतु [१]नार्मन लोकही इंग्लिशांत मिसळून गेले, आणि ते आजपर्यंत इंग्लिशच आहेत. मागें इंग्लिश राजांकडे वडिलांपासून आलेल्या वारशाच्या हक्कानें फ्रान्साचा एक मोठा भाग होता; परंतु तो त्यांजकडून गेला (इ० स० १४५२).

लोथेयरच्या मध्य राज्याची वांटणी. फ्रान्साचा कांहीं भाग; स्वित्सर्लंदचा भाग; व इतालीचा कांहीं भाग.

लोथेयरच्या मध्य (फ्रान्स व जर्मनी ह्यांच्या मधल्या) राज्याचे (धडा १९) तीन भाग केले. एक लोथारिंजिया किंवा लॉरेन, हा उत्तरेस होता; दुसरा बर्गंदी (प्रोवेन्स, सावाय, आणि रोइस व जूरा ह्या नद्यांमधील स्वित्सर्लंद), हा मध्यें होता; आणि तिसरा भाग इताली, हा दक्षिणेस होता. हे तिन्ही भाग, निरनिराळ्या वेळीं जर्मन राज्याला जोडले होते; परंतु पुढें फ्रान्सचे लोकांनीं लॉरेन व बर्गंदी ह्या प्रांतांचा बराच

१ नार्मंदी प्रांतांतले लोक.

भाग आपणांकडे घेतला. बर्गंदीच्या बाकी राहिलेल्या भागाला हल्लीं स्वित्सर्लंद ह्मणतात. स्वित्सर्लंदचे लोकांनीं पंधराव्या शतकांत आपणांस स्वतंत्र करून घेतलें.

जर्मन बादशाहाची इतालींतील सत्ता चवदाव्या शतकांत नाहींशी झाली. पुढें फ्रान्सचा राजा व जर्मनी येथील बादशाह हे दोघे साम्राज्याचा हक्क सांगूं लागल्यामुळें इताली ही त्यांचे लढाईची जागा झाली होती. पण शेवटीं जर्मनीच्या पांचवा चार्लस नांवाच्या बादशाहाला पुनः वर्चस्व मिळालें. चार्लस हा स्पेनचाही राजा असल्यामुळें त्याच्या वेळेपासून इतालीचा उत्तरभाग स्पेन देशाखालीं आला. पुढें स्पेन देशांत चार्लेसच्या वंशाची समाप्ति झाल्यावर गादीवर बसण्याविषयीं फ्रान्स व आस्त्रिया ह्या दोन देशांमध्यें तंटा लागला. त्याचा निकाल असा झाला कीं, फ्रान्सांतील एक राजपुत्र स्पेनचें राज्य करण्याकरितां गेला, तों इतक्यांत इतालींतील मुलूख आस्त्रियाकडे गेला. [१]दक्षिण इतालींतून स्पेनच्या बुर्बोनवंशी राजास हाकून दिलें, तसेंच [२]आस्त्रियन लोकांनीं उत्तरइताली सोडून दिली, आणि त्याच्याही आलीकडे [३]पोपाची राजाप्रमाणें सत्ता चालत होती ती नष्ट झाली. ह्या सर्व गोष्टी हल्लींच्या लोकांच्या नजरेस आल्याच आहेत. आतां इतालीचे सर्व भाग एका राज्याखालीं आलेले दृष्टीस पडतात.

बैजंतियम येथील शेवटच्या ग्रीक लोकांला नार्मन साहसी

---

१ इतालींतील लोकांनीं बंड करून स्पेनच्या बुर्बोनवंशी राजास दक्षिण इतालींतून इ० स० १८५८ त हांकवून दिलें.

२ सार्दिनियाचे राजानें फ्रेंच लोकांच्या मदतीनें आस्त्रियन लोकांला उत्तरइतालींतून इ० स० १८६१ त हांकून दिलें.

३ पोपाची बादशाही इ० स० १८७० त नष्ट झाली.

लोकांनीं इतालीच्या दक्षिणभागांतून हाकून लाविलें ( इ० स० १०६०.)—त्यांनींही सहराजन लोकांला सिसिली बेटांतून हाकून लाविलें, व दोन सिसिलींचें राज्य ह्मणून ज्याला तेव्हांपासून ह्मणतात त्याची स्थापना केली. लग्नसंबंधामुळें तें राज्य नार्मन लोकांकडून स्वाब्नियन वंशांतील जर्मन बादशाहांकडे गेलें ( इ० स० ११८९.)-पुढें आंजू घराण्यांतील एका फ्रेंच राजानें तें त्यांच्या वंशांतून घेतलें ( इ० स० १२७२ ). नंतर त्याच्या घराण्यांतून तें आरागोनच्या राजांकडे गेलें. ह्याप्रमाणें तें स्पेन देशाकडे लागलें. फ्रान्सांतील राजकीय ( बुर्बोन ) घराण्यांतील एक पुरुष स्पेनच्या गादीवर बसला, तेव्हां हें दोन सिसिलींचें राज्य त्या घराण्यांतील एका पुरुषाकडे गेलें. थोडक्या दिवसांपूर्वी सार्दिनियाचा राजा हा इतालीचा राजा झाला, तेव्हां नेपल्स एथील बुर्बोन वंशांतील पुरुषांना कसें हाकून दिलें, व त्या आलीकडे स्पेनमधल्या बुर्बोन वंशांतील पुरुषांला कसें हाकून लाविलें, हें तुह्मांला स्मरत असेल.

दक्षिण इताली.

इ० स० १७३५.

पोर्तुगालच्या कौंतांनीं सहराजन किंवा मूर ह्या लोकांना ११-३९ त हाकून देण्यास आरंभ केला. तेव्हां पासून ते आपणांस राजे ह्मणवूं लागले. मूर लोकांचा पाठलाग करीत करीत ते आफ्रिकेंत गेल्यामुळें त्यांना समुद्रावर मोठमोठीं जोखमीचीं कृत्यें ( इ० स० १४१० पासून पुढें ) करावीं लागलीं.

फार दिवसपर्यंत जर्मन राष्ट्र हें युरोपांतील राज्यांच्या मुख्य स्थानीं होतें. तेथील बादशाह हा स्वतंत्र राजांच्या समूहाचा फक्त मुख्य होता, हें तुह्मांस स्मरत असेल. बाराव्या शतकापासून निवड करून बादशाह नेमण्याचें काम सात निवडणारे

राजे करीत होते. इ० स० १२७३ पासून जर्मन बादशाहाचे सत्तेचा उतरता पाया लागला. तेव्हां पुढें हाताखालचे राजे व स्वतंत्र शहरें हीं बादशाहाची आज्ञा मानीनातशीं झालीं, व त्यांजकडून तसें करविण्याचा उपाय त्याजवळ राहिला नव्हता. परंतु सर्व राष्ट्र हें जगांतील व्यवस्थेचा एक भाग आहे असें मानीत असत, व जर्मन लोकांना अजून बादशाह ह्या नांवाची मोठी प्रतिष्ठा वाटे, ह्यामुळें १८०६ पर्यंत नांवाचे बादशाह चालले होते. आलीकडे प्रुश्या देश सर्व जर्मन संस्थानांत श्रेष्ठ होऊन सर्व जर्मन लोकांचें एक बलाढ्य राष्ट्र करण्याविषयीं हल्लीं कसा झटत आहे, व जर्मन लोकांनीं फ्रेंच लोकांचा पराभव केल्यावर प्रुश्याच्या राजानें आपणास जर्मनीचा बादशाह हा किताब कसा घेतला, ह्यांविषयीं तुह्मीं सांप्रत कालच्या इतिहासांत वाचिलें असेल.

फ्रान्स देशांत ह्यू कापेत ह्यापासून इ० स० १७९२ त झालेल्या राज्यक्रांतीपर्यंत एकाच वंशांतील राजे सतत राज्य करीत होते. त्यानंतर १८१४ पासून १८४८ पर्यंतही पुनः एकाच वंशांतील राजे राज्य करीत होते.

इ० स० १५२७ त आस्त्रियाच्या ड्यूकांपैकीं एकजण हंगरी व बोहीमिया ह्याही प्रांतांचा राजा झाला; तेव्हांपासून हल्लीं ज्याला आस्त्रियाचें साम्राज्य ह्मणतात तें होऊं लागलें.

ज्याच्या योगानें अनेक कलह झाले तें धर्मसंबंधी वर्चस्व सर्व राजांवर असण्याचे हक्क पोपाला असून खेरीज "स्तेत्स आफ् दि चर्च" ह्या मुलखावर ऐहिक अधिकाऱ्यांच्या (राजांच्या) नात्यानें ते अंमल करीत असें इतिहासावरून दृष्टीस पडतें.

मंगोली लोकांचे हातांतून सुटल्यावर (इ० स० १४६२-

१५०५) स्लावोनी लोकांनीं रूसच्या राज्याची स्थापना केली, आणि तें आशियाच्या उत्तरभागावर वाढविलें (१५३३-१५८४.)

तुह्मांला स्मरत असेल कीं, पोलंद देश हा नकाशांतून नाहींसा झाला आहे, कारण १७७१-७२ व १७९३-९५ ह्यांत रूस व आस्त्रिया आणि प्रुश्या ह्यांनीं तो देश वांटून घेतला.

वेनिस शहरचें व्यापारी लोकसत्तात्मक राज्य (आत्तिला राजापुढें टिकाव धरवेना ह्मणून आकिलीया शहर सोडून पळून गेलेल्या लोकांनीं स्थापित केलेलें) तुह्मांला विसरतां कामा नये. सोळाव्या शतकांत ह्या राज्याखालीं मुख्य भूमींतील (महाद्वीपांतील) पुष्कळ मुलूख होता. तसेंच नेदर्लंद्स ह्मणून जे देश आहेत तेही विसरतां कामा नये. त्यांनीं इ० स० १६४७ त स्पेन देशापासून स्वातंत्र्य जिंकून घेतलें. हे देश लग्नसंबंधामुळें बर्गंदी प्रांताच्या ड्यूकाच्या घराण्यांतून जर्मनीचा बादशाह पांचवा चार्लस ह्याजकडे गेले, व त्याजकडून त्याचा मुलगा स्पेनचा फिलिप ह्याजकडे गेले.

ही गोष्ट लक्षांत ठेवा कीं वरील संक्षिप्त वर्णन फक्त इतक्याच करितां केलें आहे कीं, तेणेंकरून प्रत्येक अर्वाचीन राज्याला हल्लींचा आकार कसा प्राप्त झाला व त्यांत जे लोक हल्लीं आढळतात ते तेथें कसे आले ह्यांची तुह्मांला सामान्य माहिती व्हावी, ह्मणजे त्यांपैकीं एकाद्या राज्याच्या अर्वाचीन इतिहासाचा अभ्यास करण्यास तुह्मी आरंभ कराल, तेव्हां त्यांच्या मागील इतिहासाचें अगदींच अज्ञान तुह्मांला असल्यास तितकें राहणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. धडा २५.

इ० स० १५०० पूर्वी थोड्या वर्षांपासून युरोपांतील आर्य लोक दुसऱ्या देशांत कसकशा वसाहती करूं लागले हें आतां तुह्मांला समजून घ्यावयाचें आहे. प्रथम पोर्तुगाल व स्पेन ह्या देशांतून मुख्यत्वेंकरून वसाहती करणारे लोक येत होते, आणि नंतर हालंड व इंग्लंड ह्या देशांतून येऊं लागले, ह्मणून भूमध्यसमुद्र सर्व पृथ्वींतील व्यापाराचें मुख्य स्थल होतें तें बदलून युरोपाचे पश्चिम किनारे हें व्यापाराचें मुख्य स्थळ त्यावेळीं झालें,

पोर्तुगाल व स्पेन एथील लोकांच्या सफरी. १४१०–१५३५.

हे वसाहती करणारे व व्यापार चालविणारे लोक दोन दिशांकडे गेले, ह्मणजे कांहीं पश्चिमेस आणि कांहीं पूर्वेस; किंवा स्थूलमानानें पश्चिमेस ह्मणजे अमेरिकेंत गेले, आणि पूर्वेस ह्मणजे हिंदुस्थानांत व त्याच्या पलीकडच्या बेटांत गेले, असें ह्मटलें तरी चालेल.

इ० स० १४९० त अमेरिका खंड आहे हें सुद्धां कोणाला माहीत नव्हतें हें तुह्मांला स्मरत असेल. हिंदुस्थान ह्मणून एक देश आहे असें माहीत होतें खरें,–परंतु तेथील लोक, त्यांचे कायदे किंवा रीतिभाती ह्यांविषयीं कांहींएक माहीत नव्हतें.

पोर्तुगीज लोकांनीं मुर लोकांचा पाठलाग करण्याकरितां सफरी करण्यास १४१० त आरंभ केला. त्यांला वाटेंत काय काय नवें सांपडलें तें नकाशावरून काढतां येईल. तें येणेंप्रमाणें, मदीरा बेट (१४१९); केप बोजादोर (आफ्रिकेंत) १४३९; केप वर्द (आफ्रिकेंत) १४४६; सेन्त तामस व आन्नोबान बेटें (आफ्रिकेंत) १४७१; केप आफ् गुद् होप एथें [1]दियाज हा गेला

१ हा पोर्तुगीज लोकांचे आरमाराचा मुख्य होता.

(१४८६), व वास्को दि गामा ह्यानें त्या केपाला वळसा घातला (१४९८), आणि तोच हिंदुस्थानांत येऊन कालिकोट बंदर येथें उतरला. पोर्तुगीज लोकांच्या वसाहतींच्या मुलखाची गोवें ही मुख्य जागा १५१० त झाली. आफ्रिकेच्या पूर्वकिनाऱ्यावरील मोजांबीक, सोफाला, व मेलिंदा (१५०८) हीं स्थळेंही त्यांचे ताब्यांत होतीं. तशींच दिवबेट व दमान बंदर (१५३३), कोची प्रांत, व मलबार किनारा, मद्रास किनाऱ्यावरील निगापट्टण शहर, आणि मलाका शहर (१५११), व मोलुका बेटें (१५११), हीं त्यांनीं घेतलीं. तेथून ते सुमात्रा, जावा, बोर्निओ, इराणी आखातांत मस्कत बंदर व होर्मज बेट (१५१५), आणि सिंहलद्वीप एथें गेले. त्यांनीं सिंहलद्वीपांत दालचिनीचा व्यापार दुसऱ्या कोणाला करूं न देतां तो आपणांकडेच ठेविला होता. (१५१८).

आतां पश्चिम गोलार्धाचे नकाशाकडे पहा. बहामा बेटांपैकीं सेन्त साल्वादोर हें बेट कोलंबसाला १४९२ त सांपडलें. नंतर त्यानें तीन सफरी केल्या त्यांत त्याला दुसरीं बेटें व मुख्य भूमीचा (महाद्वीपाचा) कांहीं भाग हीं सांपडलीं. हिस्पानिओला, क्यूबा, जमेका, ह्या बेटांत १५०८–१५१० त वसाहती केल्या. स्पानिश लोकांनीं तेथील लोकांना जुलमानें हिस्पानिओलाच्या खाणींत काम करायाला लाविलें, आणि दास करून टाकिलें. ह्या दासत्वापासून सुटका होण्याची आशा तेथील लोकांस नव्हती. बिल्बोआ हा १५१३ त [१]दरिएनच्या संयोगी भूमीस पोहोंचला, आणि त्यानें त्याच्या खडकाळ मध्यावर उभें राहून खालीं पासिफिक महासागर पाहिला. लास कासस नांवाच्या एका स्पानिश सद्गृहस्थानें तद्देशीय लोकांवर जुलूम न होण्याविषयीं प्रयत्न केला.

---

१ ही संयोगी भूमि दक्षिणअमेरिकेंतील न्यूग्रानादा देशांत आहे, हिला पानामा हेंही नांव आहे.

परंतु दुर्दैवानें अशी गोष्ट घडली कीं आफ्रिकेंतून नाग्रो लोक त्या देशांत न्यावे हा त्यांच्या दुःखनिवारणार्थ त्यानें उपाय योजिला, त्यामुळें आफ्रिकेंतील गुलामांचा व्यापार मात्र सुरू झाला. ह्या स्पेन देशांतील वसाहती करणाऱ्या लोकांचा उद्देश मेक्सिकोच्या आखातांतील बेटांत सोनें आणि रुपें शोधून काढावें ह्याशिवाय दुसरा नव्हता.

---

## धडा २६.

इ० स० १५१९ पासून १५३६ पर्यंत स्पानिश लोकांनीं अमेरिका खंडांत चार प्रांतांचें एक मोठें राज्य स्थापलें. ते प्रांत मेक्सिको, पेरू, दक्षिण अमेरिकेच्या उत्तर भागांतील तेराफर्मा, आणि न्यू ग्रानादा हे होते. स्पेनमध्यें ह्या वसाहतींवर राजा एका मंत्रिसभेच्या साहाय्यानें अंमल चालवी, आणि मेक्सिकोमध्यें एक व पेरूमध्यें एक असे दोन राजप्रतिनिधि असत ते अमेरिकेंत अंमल चालवीत. ह्या प्रत्येक प्रतिनिधीला साहाय्य करण्याकरितां एकेक मंत्रिसभा असे. मेक्सिको येथें एक व लिमा (१५४२) येथें एक अशीं दोन हे कोर्तें होतीं, ह्यांनीं केलेल्या ठरावावर इंदीजचा राज्यकारभार पाहणाऱ्या सभेस अपील होत असे. येथील लोकांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारिला होता; धर्मसंबंधी काम करण्याकरितां धर्मोपदेशकांची नेमणूक केली होती, व मठांची स्थापना केली होती. अमेरिकेंतील जुने विद्याचार व तेथील लोकांचा स्वराष्ट्राभिमान हीं नष्ट करून टाकिलीं होतीं. तेथील लोकांना गुलाम करून त्यांचे धनी स्पानिश लोक ह्यांचे हातांखालीं त्यांच्या जमिनींत त्यांना खपायास लाविलें

स्पानिश लोकांचें अमेरिकेंतील वसाहतींचें राज्य. १५१९–१८२५.

होतें. देशाचा व्यापार सगळा तीन बंदरीं होत होता, ह्मणजे स्पेनमध्यें सेविल्ल बंदरीं, मेक्सिकोंत वेराक्रूज बंदरीं, आणि दक्षिणअमेरिकेंत पोर्तोबेलो बंदरीं. ह्या वसाहतींस लागणारे जिन्नस घेऊन जाऊन त्यांबदला त्यांच्या खाणींतून मौल्यवान धातु आणण्याकरितां प्रतिवर्षी तारवांचे दोन तांडे सेविल्ल बंदराहून रवाना होत असत. पेरूमधील स्पानिश लोकांनीं हळुहळू चिली प्रांत जिंकून घेतला.

पोर्तुगीज लोकांनीं ब्राझिलमध्यें ज्या वसाहती केल्या (१५१९-१५५०) त्यांत तेथल्या मूळच्या लोकांच्या संबंधानें पाहिलें असतां स्पानिश लोकांचीच पद्धत त्यांनीं सुरू केली होती. सेन्त साल्वादोर ही त्यांच्या वसाहतींची राजधानी होती. परंतु अठराव्या शतकाच्या आरंभापर्यंत पेरूमधील सोन्याच्या खाणी व हिरे सांपडले नव्हते.

अंमल चालविण्याचे पद्धतींत फेरफार झाल्यानें १८ व्या शतकांत मेक्सिकोंत राहणाऱ्या लोकांची स्थिति बरी झाली, व खाणींत काम करण्याविषयीं लोकांवर बलात्कार करण्याची चाल होती ती बंद झाली. ब्राझिलमध्यें पोर्तुगीज लोक परक्यांना येऊं देत नसत, त्यामुळें सुमारें दोन शतकेंपर्यंत त्या सुंदर देशाची माहिती नव्हती, आणि असली तरी फारच थोडी असेल.

आतां ह्या वसाहतींचा पुढील इतिहास येथें सांगितला असतां बरें आहे ह्मणून तो सांगतों.

अठराव्या शतकाच्या अखेरीस फ्रान्स देशांत मोठी राज्यक्रांति झाली. तिच्या समाप्तीचे सुमारास फ्रान्साचा जो हल्लीं नुकता बादशाह होता त्याचा चुलता नापोलियन बोनापार्त हा आपण फ्रेंच लोकांचा बादशाह झाला, आणि युरोपांतील दुसऱ्या राज्यांच्या गाद्यांवर आपल्या संबंध्यांना बसवूं लागला, हें तुह्मांस माहीत

असेल. तेव्हां त्यानें पुष्कळ राजांला हाकून लाविलें. त्यांत स्पेनच्या बुर्बोनवंशी राजालाही त्यानें इ० स० १८०८ त हाकून लाविलें. त्यावेळीं मेक्सिको व दक्षिण अमेरिका ह्यांतील स्पेन देशाच्या वसाहतींतील लोकांची प्रथम आपल्या राजाच्या ताब्यांत राहण्याची इच्छा होती; परंतु राजाचे पक्षाचे लोकांनीं (स्वतंत्रतेचे जे हक्क वसाहतवाले मागत होते त्यांतून एकही कबूल न केल्यानें) वेडेपण केलें, त्यामुळें त्या लोकांना प्रजासत्ताक राज्यें करून स्पेन देशाचा संबंध तोडून टाकणें भाग पडलें. जीं ह्यावेळीं प्रजासत्ताक राज्यें झालीं तीं येणें प्रमाणें. मेक्सिको (१८२९); ग्वातिमाला (१८२१); कोलंबिया (न्यू ग्रानादा), कितो किंवा एकादोर, आणि वेनिजूएला किंवा काराकास (हीं तिन्ही मिळून कोलंबियाचें एक प्रजासत्ताक राज्य झालें होतें); बोलिविया ह्मणजे वरचा पेरू देश; ज्यानें कोलंबिया देशाची दास्यापासून मुक्तता केली (१८२५) त्या सिमोन बोलिवर नांवाच्या शूर पुरुषाचे नांवावरून हें नांव वरच्या पेरू देशाला पडलें आहे; चिली (१८१८); पेरू १८२४-६; रियोदि ला प्लाता अथवा ब्यूएनोस ऐरेस, ह्याला हल्लीं आर्जेन्तैन कान्फेडरेशन ह्मणतात; पाराग्वे; आणि युराग्वे किंवा बांडा ओरियंटल, हा पूर्वीं ब्राझिल देशांमधील एक प्रांत होता (१८२८).

पोर्तुगीज लोकांकडे जो ब्राझिल देश होता त्यांत काय काय झालें तें तुह्मांस सांगावयाचें राहिलें आहे, तें आतां तुह्मांस सांगतों. पोर्तुगाल देशांतील राजकीय घराण्यालाही नापोलियन ह्यानें हाकून लाविलें. तेव्हां ते ब्राझिलमध्यें गेले (१८०८); तेथें १८२० पर्यंत त्यांचें राज्य होतें. पोर्तुगाल देश फ्रेंच लोकांचे अमलाखालीं गेला तेव्हां परकी राष्ट्रांना ब्राझिल देशाबरोबर व्यापार करण्याची मोकळीक झाली, व पोर्तुगालच्या मृतराजाच्या

राणीचा मुलगा दान जान ह्यानें राज्यव्यवस्थेंत पुष्कळ सुधारणुका केल्या. दान जान हा पोर्तुगालचा राजा होण्याकरितां परत पोर्तुगालमध्यें गेला, आणि ब्राझिलमध्यें राज्य करण्याकरितां त्यानें आपला मुलगा दान पेंद्रो ह्याला मागें ठेविलें. परंतु सर्व लोकांची स्वतंत्र होण्याची इच्छा होती, त्यामुळें ब्राझिलमधील लोक पोर्तुगाल देशाचे अमलाखालीं पुनः येण्यास कबूल होत ना. आह्मी स्वतंत्र आहों, असें साफ सांगून त्यांनीं राज्यव्यवस्था पहाण्याकरितां बादशाहाच्या हाताखालीं मंडळी नेमिली, आणि तिच्या अनुमतें बादशाहानें राज्यकारभार चालवावा, असा ठराव करून दान पेंद्रो ह्याला बादशाह केलें (१८२२). अजूनही त्याचेच घराण्याचा अंमल ब्राझिलमध्यें आहे. आतां दक्षिण अमेरिकेचा नकाशा घेऊन तुह्मी लक्ष्यपूर्वक पाहिला, तर हें समजण्यास तुह्मांला अडचण पडणार नाहीं.

---

## धडा २७.

उत्तर अमेरिका १५७०-१८६१.

आतां उत्तर अमेरिकेच्या नकाशाकडे वळा, आणि मेक्सिकोच्या उत्तरेस कोणते आर्य लोक जाऊन राहिले तें ऐका. एथेंही इतर देशांप्रमाणें मूळचे राहणारे ह्मणून कांहीं लोक होतेच. त्यांजपासून नवीन जाऊन राहणाऱ्या लोकांनीं त्यांचा देश काढून घेतला.

सफरी करणारे इंग्लिश लोक ह्या लोकांकडे सोळाव्या शतकांत आले. ते दोन ठिकाणीं राहिले. कांहीं व्हर्जिनिया प्रांतांत (१५७८ व १६०७) राहून तंबाकू पिकवूं लागले. पुढें त्यांनीं दच लोकांचें गलबत नीग्रो लोक घेऊन आलेलें पाहिलें त्यावरून त्यांना गुलामांकडून काम करविण्याची वाईट सवय

लागली (१६१६). आणि प्यूरितनपंथाचे कांहीं इंग्लिश लोक इंग्लंदांतील धर्मसंबंधी व्यवस्था न आवडल्यामुळें इंग्लंद देश सोडून व्हर्जिनिया संस्थानाचे उत्तरेस मासाचूसेत्स संस्थानांत जाऊन राहिले (१६२०). पुढें लवकरच फ्रान्सांतून वसाहती करणारे लोक आले. ते इंग्लिशांचे उत्तरेस कानदा व आकादिया ह्या प्रांतांमध्यें (१६०८) आणि दक्षिणेस लुइसियाना ह्या प्रांतांमध्यें (१६८६) राहिले. फ्रान्स व इंग्लंद ह्यांच्या मध्यें परस्पराशीं होणाऱ्या लढायांचा परिणाम त्यांचे वसाहतींतील लोकांना भोगावा लागला. युत्रेक्त शहर एथें तह होऊन (१७१३) फ्रेंच लोकांनीं नोवा स्कोशिया प्रांत व न्यूफौंदलांद बेट हीं इंग्लिशांस दिलीं. इंग्लिशांनीं केबेक शहर घेतल्यावर (१७६३) त्यांना फ्रेंचांनीं कानदा प्रांत दिला. हा वेळ पर्यंत अमेरिकेंतील वसाहतींतले लोक आपल्या मूळच्या देशांशीं फार सख्यानें वागत होते. परंतु पुढें कराच्या संबंधानें तंटे उद्भवल्यामुळें इ० स० १७७५ त इंग्लिश व त्यांच्या वसाहतींतील लोक त्यांच्यामध्यें लढाई उपस्थित झाली. इ० स० १७७६ त तेरा युनैतेद स्तेत्स (ज्यांची एकी झाली आहे अशीं संस्थानें) ह्यांनीं आपण स्वतंत्र आहों असें प्रकट केलें. पुढें त्यांची व इंग्लिशांची कांहीं दिवस लढाई चालली होती, पण तींत इंग्लिशांस जय मिळाला नाहीं त्यामुळें युनैतेद स्तेत्सचें स्वातंत्र्य त्यांस इ० स० १७८२ त मान्य करावें लागलें. इंग्लंदानें कानदा व नोवा स्कोशिया हे प्रांत आपणाकडे ठेविले. बाकी राहिलेली लुइसियाना नांवाची फ्रेंच लोकांची वसाहत युनैतेद स्तेत्स ह्यांनीं १८०३ त विकत घेतली, व स्पेनपासून [१]दान्ही फ्लोरिदा

---

१ पूर्व फ्लोरिदा आणि पश्चिम फ्लोरिदा.

द्वीपकल्पें १८२० त विकत घेतलीं. त्यानंतर [1]तेक्सास प्रांत हा मेक्सिको देशाला सोडून देऊन युनैतेद स्तेत्स ह्यांना मिळाला. मेक्सिकोनें तह करण्याकरितां कालिफोर्निया देश सुद्धां दिला होता. अखेर इ० स० १८६७ त अमेरिकन लोकांनीं अमेरिका खंडाचे वायव्य कोंपऱ्यास रूस लोकांची अमेरिका ह्मणून अफाट मुलूख होता तो रूस देशापासून विकत घेतला. हल्लीं एकंदर ३४ स्तेत्स[2] व ८ तेरितोरी आहेत. इ० स० १८६१ त उत्तरेकडील स्तेत्स ह्यांनीं दक्षिणेकडील स्तेत्स ह्यांशीं लढाई कशी आरंभिली, व तिच्यामुळें हिंदुस्थानांतील कापसाचा व्यापार कोणत्या स्थितीस येऊन पोंचला, हें तुह्मांला आठवत असेल.

---

## धडा २८.

हिंदुस्थानांत पोर्तुगीज लोकांचा ऱ्हास. दच व इंग्लिश यांचा उदय. १५८०-१६५०.

पोर्तुगीज लोक हिंदुस्थानांत एक एक पाऊल पुढें टाकीत कसे आले, व हिंदी सागरांत त्यांनीं कोठें कोठें वसाहती केल्या, हें तुह्मांला मागें ( २५ वे धड्यांत ) समजलेंच आहे. अरबस्तान व मिसर देश ह्यांचे व्यापाराचे जिन्नस ते मस्कत बंदरीं जमवीत, व आशियांतील जिन्नस होर्मज बेटांत जमवीत. होर्मज बेटांतली जमीन नापीक होती; परंतु त्यांनीं ऐषआरामाचे जिन्नस व संपत्ति ह्यांची तेथें पेठ बनविली. ते हिंदुस्थानांतून लिस्बोन शहरास मिऱ्यें व दुसरे मसाल्याचे जिन्नस, तसाच कापूस,

---

१ तेक्सास प्रांत उत्तर अमेरिकेंत मिसिसिपी नदीचे पश्चिमेस आहे.

२ स्तेत पदवी प्राप्त होण्यास अमुक लोकसंख्या पाहिजे व आणखी कांहीं गोष्टी पाहिजेत असा नियम आहे. तितकें नाहीं तर तेरितोरी हें नांव असतें. तितकी योग्यता झाली

रेशमी कापड, आणि मोत्यें हे जिन्नस पाठवीत, व हे जिन्नस पोर्तुगीज लोकांकडून विकत घेण्याकरितां युरोपांतील दुसरे देश आपलीं गलबतें लिस्बोन शहरास पाठवीत. इ० स० १५१८ त त्यांनीं चीन देशाशीं संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यांना १५८५ त चिनांतलें मकाओ बंदर मिळालें, व त्यापूर्वीं ते जपान बेटाशीं व्यापार करीत असत. १५५० पासून १६०० पर्यंत पोर्तुगीज लोकांचें हिंदी सागरांत फार प्राबल्य होतें असें समजा.

परंतु ह्या कालाच्या शेवटाच्या सुमारास युरोपांतील दुसरे दोन लोक हिंदीसागरांत आले. ते कोणते ह्मणाल तर इंग्लिश लोक व दच, ह्मणजे स्वतंत्र होण्याकरितां स्पेनबरोबर लढाई चालविणाऱ्या नेदर्लंदांतील कांहीं प्रांतांचे लोक, हे होते.

अशी गोष्ट घडून आली कीं १५८० पासून कांहीं काल-पर्यंत स्पेनचा राजा हा पोर्तुगालचाही राजा होता. त्यान दच लोकांस त्रास द्यावा ह्या हेतूनें १५९४ त त्यांला हिंदुस्थानांतील जिन्नस नेण्यास लिस्बोन शहरीं येण्याची बंदी केली. ह्यामुळें खलाशी कामांत कुशल होत जाणाऱ्या दच लोकांना ते जिन्नस आपणांकरितां हिंदुस्थानांत जाऊन आणणें भाग पडलें. त्यामुळें १६०२ त त्यांनीं दच ईस्तइंदिया कंपनी ह्या नांवाची एक मंडळी स्थापिली, व मोलूका बेटांमध्यें वसाहती केल्या; त्यांत जावा बेट ही मुख्य वसाहत केली (१६१८). आंबो-यना, बांडा, व तेदार ह्या बेटांतही त्यांनीं वसाहती केल्या, आणि जपान बेटाशीं व्यापार सुरू केला. नंतर त्यांनीं मलबार किनारा व कारोमांडल किनारा ह्यांवरील पोर्तुगीज लोकांच्या वसाहती घेतल्या. इ० स० १६४० त त्यांनीं मलाका शहर जिंकून घेतलें, व सिंहलद्वीपही त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतलें. पूर्वेदेशीं जाण्याकरितां निघालेल्या त्यांच्या गलबतांना कांहीं वेळ

उतरण्यासाठीं जागा असावी ह्मणून त्यांनीं केप आफ् गुदहोप येथेंही एक वसाहत केली. त्यांचे हिंदीसागरांत पांच ठिकाणीं सुभे होते, ह्मणजे जावा, आंबोयना, तर्नेती, सिंहलद्वीप, व मकासर. आणि केप आफ् गुदहोप येथें नवी वसाहत झाली तेव्हां तो सहावा सुभा झाला.

उत्तरेस व पूर्वेस गलबतें चालवून युरोप व आशिया ह्यांच्या उत्तर भागास प्रदक्षिणा घालून हिंदुस्थानांत जाण्याचा मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न इंग्लिश लोक करूं लागले. तेव्हांपासून सफर करण्याचा त्यांचा क्रम सुरू झाला (इ० स० १५५३). हिंदुस्थानांत येण्याचा मार्ग तर त्यांना सांपडला नाहीं, परंतु त्यांपैकीं कांहींजण गलबतांत बसून गेले ते ओबी नदींत गेले, आणि पुढें रूस देशांतील कांहीं व्यापाऱ्यां बरोबर आस्त्राखान शहर व कास्पियन समुद्र ह्यांजवरून इराण देशांत गेले. नंतर रूसदेश, आफ्रिकाखंड, व लिवांतकिनारा ह्यांच्या बरोबर व्यापार करण्याकरितां मंडळ्या झाल्या. पहिल्या ईस्त इंदिया कंपनीला इ० स० १६०० त दिसेंबर महिन्याचे ३१ वे तारखेस सनद मिळाली. सुमात्रा व जावा ह्या बेटांकडे पहिली सफर इ० स० १६०१ त झाली. परंतु त्या ठिकाणीं दच लोक प्रबल होते. जे इंग्लिश लोक आंबोयना बेटांत होते त्यांची त्यांनीं इ० स० १६२३ त कत्तल उडविली, व दुसऱ्या मसाल्याचे बेटांत जे होते त्यांनां तेथून हाकून लाविलें. परंतु इराण देशाशीं व्यापार करण्याकरितां इंग्लिशांची वखार सुरत येथें इ० स० १६१२ पासून होती. इ० स० १६२२ त हे होर्मज बेटांतून पोर्तुगीज लोकांना हाकून देण्यासाठीं इराणी लोकांना सामील झाले. इ० स० १६४० त ते कर्नाटकांत राहिले, व मद्रास येथें त्यांनीं फोर्त जार्ज नांवाचा किल्ला बांधिला.

## धडा २९.

इ० स० १६६४ त एक फ्रेंच ईस्त इंदिया कंपनी स्थापित झाली, आणि तिनें मादागास्कर बेटांत (१६६५) व सुरतेस (१६७५) वखारी घातल्या. इ० स० १६७९ त त्यांनीं पोंदेशरी शहराची स्थापना केली. परंतु ह्या वसाहती भरभराटीस आल्या नाहींत. इ० स० १६९० त ते ऐल आफ् फ्रान्स येथें राहिले, व १७२० त ऐल आफ् बुर्बोन येथें राहिले. हीं दोन्ही बेटें दच लोकांनीं सोडून दिलीं होतीं.

युरोपियन लोक पूर्वेकडील देशांत जातात. इ० स० १६६०-१८००.

दच लोकांनीं केप आफ् गुदहोप येथें वसाहत केली तेव्हां सेन्त हेलीना बेट त्यांनीं सोडून दिलें होतें, तें इ० स० १६६१ त इंग्लिश लोकांनीं घेतलें. [1]राणीचें स्त्रीधन ह्मणून मुंबई बेट इ० स० १६६१ त मिळालें तें इंग्लंदच्या राजानें १६६८ त कंपनीला दिलें. इ० स० १६८७ त मुंबई व मद्रास हे दोन इलाखे झाले. सुमात्रा बेटांत बेन्कुलेन बंदर येथें एक व कलकत्ता येथें एक अशा दोन वखारी त्यांनीं घातल्या, व कलकत्त्याजवळची जमीन विकत घेऊन तेथें एक किल्ला बांधिला. इ० स० १६७० पासून हिंदुस्थानांतील मलमलीचें कापड व रेशमी कापड इंग्लंदास फार जाऊं लागल्यामुळें इंग्लंदांतील कारखानेवाले व लिवांत किनाऱ्यावरचे व्यापारी ह्यांना आपला व्यापार बुडाला असें वाटून फार राग आला. हिंदुस्थानांत फ्रेंच व इंग्लिश ह्यांचा परस्पर कलह इ० स० १७४६ पासून

---

१ पोर्तुगालचा राजा चवथा जान ह्यानें आपली मुलगी काथरैन ही इंग्लंदचा राजा दुसरा चार्लस ह्यास इ. स. १६६१ त दिली, त्यावेळीं त्यानें मुंबई बेट तिला आंदण दिलें.

चालला होता तो हिंदुस्थानचे इतिहासाचा भाग आहे, ह्मणून येथें सांगितला नाहीं.

इ० स० १७४०–१८०० ह्या काळांत दच वसाहतींस उतरती कळा लागली. ह्या काळाचे अखेरीस दच लोकांची इंग्लिशांबरोबर युरोपांत कांहीं दिवस लढाई चालली होती. जावा बेटांत इ० स० १७४० त दच लोकांनीं निर्दय होऊन चिनी लोकांची कत्तल उडविल्यामुळें सर्व लोक त्यांचा द्वेष करूं लागले. हिंदुस्थानाच्या किनाऱ्यावरचा व्यापार व इराण आणि अरबस्तान ह्या देशांचा व्यापार त्यांजकडे होता तो त्यांजकडून इंलिशांनीं घेतला. सिंहलद्वीप, मलाका शहर, व मलबार किनाऱ्यावरच्या वसाहती इंग्लिशांनीं इ० स० १७९५ त घेतल्या. त्याच वर्षी त्यांनीं केप आफ् गुदहोप घेतलें, व मोलूका बेटें इ० स० १७९६ त घेतलीं. दच कंपनीचें दिवाळें निघाल्यामुळें ह्या वसाहती सरकारच्या झाल्या. इंग्लिशांनीं जावा बेट इ० स० १८११ त घेतलें, परंतु १८१६ त परत दिलें. तें अजूनही हालंदर लोकांकडे आहे. त्यांत ते अंमल कसा चालवितात ह्याविषयींचा शोध करण्यांत तुह्मीं काळ खर्चिला असतां तो फुकट जाणार नाहीं.

हिंदुस्थानचे द्वीपकल्पांत दच लोकांचे सत्तेचा मुलूख वगैरे कांहीं हल्लीं राहिलें नाहीं, तरी सुरतेस दचबंदर ह्मणून एक बंदर आहे, व सुरत आणि अहमदाबाद ह्या ठिकाणीं दच लोकांच्या कबरा आहेत, त्यामुळ त्यांचें नांव ह्या देशांत राहिलें आहे.

फ्रेंचांकडे कांहीं शहरें अजून राहिलीं आहेत. पोंदेशरी एथें त्यांचें एक लहानसें संस्थान आहे त्याचें क्षेत्रफळ १०७ चौरस मैल आहे. ह्या खेरीज मद्रासकिनाऱ्यावर कारिकल, मलबार

किनाऱ्यावर माही, गोदावरीचे मुखाजवळ यानान, व कलकत्त्याजवळ चंद्रनगर ह्या त्यांच्या वसाहती आहेत. सुरतेच्या तटाबाहेर एक शेत अजूनही त्यांजकडे आहे हें तुह्मांपैकीं कांहीं जणांस माहीत असेल.

---

## धडा ३०.

पूर्वेकडे व पश्चिमेकडे वर सांगितलेल्या वसाहतींखेरीज दुसऱ्या वसाहती आहेत, पण त्यांचीं नावें अजून सांगितलीं नाहींत. वेस्त इंदीज किंवा आंतिलीज ह्मणून एक बेटाचा मोठा वेढा आहे तो तुह्मांला माहीत आहेच. तो मेक्सिकोच्या आखातापासून दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्या पर्यंत पसरला आहे. त्यूतन लोकांचे व रोमान्स लोकांचे राष्ट्रांनीं वसाहतींच्या संबंधानें केलेल्या अचाट कृत्यांविषयीं व कलहांविषयीं जें तुह्मीं वाचिलें आहे, त्यावरून ह्या बेटांपैकीं पुष्कळ बेटें ब्रितिशांकडे कां आहेत, आणि फ्रेंच, स्पानियर्द, हालंदर, स्वीद, व देन ह्या लोकांकडे थोडीं कां आहेत, तशींच युनैतेद स्तेत्समधल्या अमेरिकन लोकांकडे थोडीं कां आहेत, हें समजण्यास सुलभ पडेल.

वेस्त इंदीज व आस्त्रालिया ह्या ठिकाणीं युरोपियन जातात.

हिंदी महासागर आणि पासिफिक महासागर ह्यांच्या मध्यें इंग्लिशांच्या आणखीही वसाहती आहेत. त्या वरील वसाहतींपेक्षां अलीकडच्या आहेत. इ० स० १७८८ त आस्त्रालिया देशांतील न्यू सौथ वेल्स प्रांतीं सिदनीकोव येथें एक वसाहत स्थापिली होती. तिजपासून वसाहतींचे दुसरे इलाखे झाले. तास्मान्या बेट व न्युजीलंद बेटें ह्यांचा कप्तान कुक ह्यानें शोध लाविला (१७६९). तास्मान्या येथें सन १८०३ त पहिल्या प्रथम वसाहत

झाली. इंग्लिश लोकांनीं गुन्हेगार ठरलेल्या अपराध्यांला काळे पाण्यावर ह्मणून पाठवून देण्याच्या उपयोगाला ह्या वसाहती प्रथम लाविल्या होत्या. परंतु त्या पुढें मोठ्या झाल्या आणि सुधारल्या तेव्हांपासून ती चाल बंद केली.

मागील इतिहासाचा उपसंहार.

अगदीं प्राचीन काळापासून आजपर्यंत झालेलीं राष्ट्रांचीं स्थलांतरें तुह्मीं (एकाद्या उंच स्थळावरून पाहावें त्याप्रमाणें) आतां पाहिलीं. प्राचीन लोकांचा मागमूस आतां थोडाच राहिला आहे. त्याचीही सामान्य माहिती तुह्मांला आतां झाली आहे; परंतु ती दूर व धुक्यांतून पाहिलेल्या वस्तूसारखी अस्पष्ट आहे. जरी आपणापाशीं इतिहास नाहीं तरी, हिंदुस्थानांतले लोक व युरोपांतले लोक हे जींत सारखेच मोडतात ती मनुष्यांची मोठी शाखा आशियाच्या मध्यभागांतील आपलें ठिकाण सोडून हिंदुस्थान, इराण, व पश्चिमेकडील देश ह्यांत पसरली असें भाषांच्या सारखेपणावरून खात्रीनें कसें अनुमान करतां येतें, हेंही तुह्मांला समजलें आहे. कांहीं काळपर्यंत आर्य लोक कोठें दिसत नव्हते तरी शिलालेख, नाणीं, व युफ्रातिस आणि नील ह्या नद्यांच्या थड्यांतील शमी लोकांच्या इमारती ह्यांपासून अधिक भरंवसा ठेवण्यासारखी माहिती इतिहासाला कशी मिळते, हेंही तुह्मांला समजलें आहे. युरोपांतील सर्वांत दूरचीं द्वीपकल्पें हस्तगत होत तों पर्यंत आर्यलोक पश्चिमेकडेच एकसारखे कसे जात होते; घडलेल्या गोष्टी ज्यांत लिहून ठेविल्या असतात अशीं पुस्तकें ह्मणजे इतिहास हे ग्रीस व रोम ह्या देशांचेच प्रथमतः कसे वाचावयास सांपडतात; ग्रीस व रोम ह्यांपैकीं प्रत्येकानें पाळी पाळीनें इतिहासाचें सूत्र आपले हातीं कसे घेतलें; कांहीं कालपर्यंत रोम शहरानें सर्व जगाचा इतिहास आपल्या एकट्याचे इतिहासांत कसा आ-

णिला, व पुनः त्यूतन लोकांच्या संबंधानें त्याला पुष्कळ फांटे कसे फुटले; स्वातंत्र्य व व्यापार ह्यांच्या वृद्धीच्या योगानें समुद्रावर मोठमोठीं अचाट कृत्यें करून हे त्यूतन लोक पृथ्वीवर तों काळपर्यंत जीं रानटी स्थळें होतीं तेथें कसे पसरले, व अमेरिका आणि आस्त्रालिया ह्या देशांत मूळचे राहणारे लोक होते त्यांना हाकून देऊन त्यांच्या जागीं आपण कसे बसले; व वर्चस्व मिळविण्याकरितां आपसांत कलह करीत असतां ह्यांनीं हिंदुस्थानांतील राज्यकारभाराच्या गोष्टींत पडून आश्रय कसा मिळविला; त्या कलहांत इंग्लिशांना जय मिळाल्यावर आपलें स्वास्थ्य राहण्यास शेजारच्या राजांकडून स्वस्थता ठेवविण्याची आवश्यकता त्यांना कशी दिसून आली; व हा हेतु सिद्धीस नेत असतां कांहीं बिनतोड गोष्टी घडून आल्या त्यांत ते हिंदुस्थानच्या द्वीपकल्पांत पूर्ण वर्चस्व कसे पावले; ह्या सर्व गोष्टी तुह्मांला समजल्या आहेत.

---

# ह्या ग्रंथांत आलेल्या प्राचीन व अप्रसिद्ध शब्दांचा कोश.

---

**अर्मनी.**—(अर्मेनीआ). हा आशिआ खंडांतील तुर्कस्थानांत ईशान्य दिशेकडे देश आहे.

**अलेक्जांद्रिया.**–हें आफ्रिका खंडांत मिसर देशाचे उत्तरेस भूमध्य समुद्राचे किनाऱ्यास बंदर आहे. हें अलेक्जांदर म्हणजे शिकंदर बादशाह ह्यानें इ० स० पू० ३३२ वे वर्षी वसविलें.

**असूरदेश.**–(आसिरिया). आशियांतील तुर्कस्थानांत तैग्रिस नदीचे पूर्वेस हा देश होता.

**अहूरामजदा.**–इराणी लोकांचा एक देव होता.

**आक्शियम.**–ग्रीस देशामध्यें ईपैरस प्रांतांत हें गांव होतें. येथें इ० स० पू० ३१ वे वर्षी आगस्तस बादशाह व आंतनी आणि क्लियोपात्रा ह्यांची लढाई होऊन आगस्तसाला जय मिळाला. ह्या गांवाला हल्लीं आक्झियो म्हणतात.

**आक्लीया.**–हें रोमन लोकांनीं वसाहत केलेलें शहर होतें. हें इताली देशाचे हद्दीवर आद्रियातिक समुद्राचे उत्तरेस होतें.

**आखन.**–हें शहर कोलोन शहरापासून ४० मैलांवर पश्चिमेकडे होतें. कोलोन शहर जर्मनी देशांत ऱ्हैन नदीच्या डाव्या कांठीं होतें.

**आखिमेनिदी.**–इराणी लोकांच्या मूळराजांच्या घराण्याला हें नांव होतें. ह्याचा मूळपुरुष आखिमेनिस हा होता. हा इ० स० पू० ७०० वर्षे झाला होता.

**आत्तिला**.–हूण लोकांचा राजा होता.

**आथेन्स**.–ग्रीस देशांतील आतिका प्रांताचें मुख्य शहर.

**आमासिस**.–हा पहिल्यानें बाबुलोनचे राजाचे एका पलटणींत यःकश्चित् शिपाई होता. तो पुढें मिसर देशचा राजा झाला.

**आर्केदी**.–(आर्केदिआ). ग्रीस देशाचे दक्षिणेस पेलापोनीससमध्यें हा प्रांत होता.

**ओलिंपियद**.–ग्रीक लोकांमध्यें दर पांचवे वर्षीं कांहीं खेळ खेळत असत त्यांस आलिंपिक गेम्स् (खेळ) ह्मणत. त्यावरून ४ वर्षांचे कालास हें नांव पडलें आहे. वर्षांची गणना ते ह्यावरूनच करीत असत.

**आस्त्रोगाथ**.-पूर्वेकडचे गाथ लोक.

**इथियोपी**.–(इथियोपिया). हा देश आफ्रिका खंडांत मिसर देशाचे दक्षिणेस होता. हल्लीं त्यास न्यूबिया देश आणि आबिसिनिया ह्मणजे हेबस देश असें ह्मणतात.

**इन्दीज**.–(ईस्त). हिंदुस्थान, भागीरथीचे पलीकडचें हिंदुस्थान आणि पूर्वेकडील आर्किपेलागोंतील बेटें ह्यांला हें नांव इंग्रजींत आहे. (वेस्त) उत्तर अमेरिकेंतील फ्लारिदा द्वीपकल्प आणि दक्षिण अमेरिकेंतील ओरिनोको नदीचें मुख ह्यांच्या मध्यें हजारांचे जवळ जवळ इतकीं बेटें आहेत त्यांस हें नांव इंग्रजींत आहे.

**इब्री**.–(हीब्रू). यहुदी लोकांची भाषा.

**इसस**.–हें आशिया मैनरचे सिलिसी प्रांतांत गांव होतें. तेथें इ० स० पू० ३३३ वे वर्षीं शिकंदर बादशाह आणि इराणचा राजा दारयावेश ह्यांची लढाई होऊन शिकंदरास जय मिळाला.

## ह्या ग्रंथांत आलेल्या प्राचीन व अप्रसिद्ध शब्दांचा कोश.

---

**अर्मनी.**—(अर्मेनीआ). हा आशिआ खंडांतील तुर्कस्थानांत ईशान्य दिशेकडे देश आहे.

**अलेक्जांद्रिया.**-हें आफ्रिका खंडांत मिसर देशाचे उत्तरेस भूमध्य समुद्राचे किनाऱ्यास बंदर आहे. हें अलेक्जांदर ह्मणजे शिकंदर बादशाह ह्यानें इ० स० पू० ३३२ वे वर्षी वसविलें.

**असूरदेश.**-(आसिरिया). आशियांतील तुर्कस्थानांत तैग्रिस नदीचे पूर्वेस हा देश होता.

**अहूरामजदा.**-इराणी लोकांचा एक देव होता.

**आक्शियम.**-ग्रीस देशामध्यें ईपैरस प्रांतांत हें गांव होतें. येथें इ० स० पू० ३१ वे वर्षी आगस्तस बादशाह व आंतनी आणि क्लियोपात्रा ह्यांची लढाई होऊन आगस्तसाला जय मिळाला. ह्या गांवाला हल्लीं आक्झियो ह्मणतात.

**आक्लीया.**-हें रोमन लोकांनीं वसाहत केलेलें शहर होतें. हें इताली देशाचे हद्दीवर आद्रियातिक समुद्राचे उत्तरेस होतें.

**आखन.**-हें शहर कोलोन शहरापासून ४० मैलांवर पश्चिमेकडे होतें. कोलोन शहर जर्मनी देशांत ऱ्हैन नदीच्या डाव्या कांठीं होतें.

**आखिमेनिदी.**-इराणी लोकांच्या मूळराजांच्या घराण्याला हें नांव होतें. ह्याचा मूळपुरुष आखिमेनिस हा होता. हा इ० स० पू० ७०० वर्षे झाला होता.

**आत्तिला.**–हूण लोकांचा राजा होता.

**आथेन्स.**–ग्रीस देशांतील आतिका प्रांताचें मुख्य शहर.

**आमासिस.**–हा पाहिल्यानें बाबुलोनचे राजाचे एका पलटणींत यःकश्चित् शिपाई होता. तो पुढें मिसर देशचा राजा झाला.

**आर्केदी.**–(आर्केदिआ). ग्रीस देशाचे दक्षिणेस पेलापेनीससमध्यें हा प्रांत होता.

**ओलिंपियद.**–ग्रीक लोकांमध्यें दर पांचवे वर्षी कांहीं खेळ खेळत असत त्यांस आलिंपिक गेम्स् (खेळ) ह्मणत. त्यावरून ४ वर्षांचे कालास हें नांव पडलें आहे. वर्षांची गणना ते ह्यावरूनच करीत असत.

**आस्त्रोगाथ.**–पूर्वेकडचे गाथ लोक.

**इथियोपी.**–(इथियोपिया). हा देश आफ्रिका खंडांत मिसर देशाचे दक्षिणेस होता. हल्लीं त्यास न्यूबिया देश आणि आबिसिनिया ह्मणजे हेबस देश असें ह्मणतात.

**इन्दीज.**–(ईस्त). हिंदुस्थान, भागीरथीचे पलीकडचें हिंदुस्थान आणि पूर्वेकडील आर्किपेलागोंतील बेटें ह्यांला हें नांव इंग्रजींत आहे. (वेस्त) उत्तर अमेरिकेंतील फ्लारिदा द्वीपकल्प आणि दक्षिण अमेरिकेंतील ओरिनोको नदीचें मुख ह्यांच्या मध्यें हजारांचे जवळ जवळ इतकीं बेटें आहेत त्यांस हें नांव इंग्रजींत आहे.

**इब्री.**–(हीब्रू). यहुदी लोकांची भाषा.

**इसस.**–हें आशिया मैनरचे सिलिसी प्रांतांत गांव होतें. तेथें इ० स० पू० ३३३ वे वर्षी शिकंदर बादशाह आणि इराणचा राजा दारयावेश ह्यांची लढाई होऊन शिकंदरास जय मिळाला.

**इस्राइल.**-( इस्रलैत ). यहुदी लोक.

**इस्राइल.**-१. हा इस्राइल लोकांचा मूळपुरुष होता. २. हें एक यहुदी लोकांचें राज्य होतें.

**ईजियन.**-ग्रीस देश आणि आशिया मैनर ह्यांच्या मध्यें जो भूमध्यसमुद्राचा भाग आहे त्याचें प्राचीन नांव. हल्लीं त्याला आर्किपेलागो ह्मणतात.

**ईस्तइंदिज.**-इंदीज शब्द पाहा.

**एल्ब.**-ही नदी युरोपाचे मध्यभागांतून वाहत जाऊन जर्मन समुद्रास मिळते.

**काप्ती.**-(काप्तिक). मिसरदेशचे प्राचीन लोकांचे जे वंशज त्यांस काप्त ह्मणतात आणि त्यांचे भाषेस काप्ती ह्मणतात.

**कापदकी.**-(कापादोसी). हा आशिया मैनरांत पूर्वेकडे प्रांत होता.

**कार्थेज.**-हें मोठें प्रसिद्ध राजधानीचें शहर होतें. हें आफ्रिकेचे उत्तर किनाऱ्यावर हल्लींचे त्यूनिस शहरापासून सुमारें १२ मैलांवर होतें. हें कधीं वसलें हें पक्कें समजत नाहीं; परंतु इ० स० पू० ८६९ चे सुमारास फीनिकी लोकांनीं वसविलें असावेंसें दिसतें.

**केल्त.**-(केल्तिक). फ्रान्स देशांत राहणाऱ्या लोकांस हें नांव होतें. जर्मनी आणि स्पेन ह्या देशांत राहणाऱ्यांलाही केल्त ह्मणतात. परंतु सेन नदी आणि गारोन नदी ह्यांच्या मधील फ्रान्स देशाचे भागांत राहणाऱ्यांला विशेषेंकरून ह्मणतात. ह्यांस गाल हेंही नांव होतें.

**क्यूमी.**--आशिया मैनरांतील इयोली प्रांतांत हें गांव होतें.

**खलीपा.**-महमदाच्या मागून जे त्याचे गादीवर बसले त्या स-

वीस हा किताब होता. ह्यांजकडे धर्मसंबंधी व राज्यसंबंधी असे दोन्ही अधिकार असत.

**खालदी.**–(खाल्दिआ) आशियांतील तुर्कस्थानांत युफ्रातिस व तैग्रिस ह्या नद्यांच्या मधला देश. ह्याचें मुख्य शहर बाबुलोन होतें.

**खोरेश.**–(सैरस). हा इराणचा राजा होता. ह्याचे बापाचें नांव कांबुसस आणि आईचें नांव मंदानी. ही मेदी देशचा राजा आस्त्रायजीज ह्याची कन्या होती.

**गाथ.**–स्वीदन आणि नार्वे येथील राहणारे प्राचीन लोक.

**गाल.**–फ्रान्स देशचें प्राचीन नांव. ह्यावरून तेथें राहणाऱ्या लोकांसही गाल ह्मणत होते.

**गेदिज.**–हें बेट अतलान्तिक महासागरांत स्पेन देशचे किनाऱ्यावर होतें. ह्याला पूर्वी कोणी तार्तेसस ह्मणत असत.

**ग्रानिकस.**–ही नदी आशियामैनर देशांत बिथिनी प्रांतांत आहे. येथें इ० स० पू० ३३४ वे वर्षी मासिदोनी लोकांचा राजा शिकंदर बादशाह आणि इराणी लोकांचा राजा दारयावेश ह्यांची लढाई होऊन शिकंदराचा जय झाला. ह्या लढाईवरून ही नदी प्रसिद्ध आहे.

**जरतुष्ट.**–(जोरोआस्तर). हा पारशी लोकांचा धर्मप्रवर्तक होता. हा इराणचे पूर्वेस बाक्त्री ह्मणून एक प्रांत होता तेथें राजा होता. ह्याचें नांव ऋग्वेदांत जरदष्टि असें आढळतें.

**जरतुष्टी.**–(जोरोआस्त्रियन). जरतुष्टाला अनुसरणारे ह्मणजे पारशी लोक.

**जिहून.**–(आक्सस). ही नदी स्वतंत्र तार्तरी देशांत बदकशान, बुखारा, खीवा, वगैरे प्रांतांतून वाहत पश्चिमेकडे उराल समुद्राला मिळते. हिला आमू असेंही नांव आहे.

**झन्द.**–इराणची प्राचीन भाषा.

**तार्तेसस.**–हें भूमध्य समुद्राचे कांठीं हर्क्युलिसाचे स्तंभाजवळ स्पेन देशांत गांव होतें. ह्याला पूर्वी गेदिज ह्मणत.

**तुराणी.**–(तुरेनियन) इराण देशाच्या ईशान्य दिशेकडे कांहीं प्रांत आहेत; ते इराणचे अमलाखालीं कधीं कधीं असत. त्यांस तुराण ह्मणतात, तेथील लोक.

**त्यूतन.**–(त्युतानिक). जर्मनी देशांत राहणाऱ्या लोकांपैकीं हे लोक होते.

**थर्मापली.**–हा ग्रीस देशामध्यें थिसाली देशांतून लाक्रिस गांव आणि फोकिस प्रांत येथें जाण्याचा फार अरुंद मार्ग आहे. येथें इ० स० पू० ४८० वे वर्षी ग्रीक लोक व इराणी लोक ह्यांची लढाई होऊन इराणी लोकांचा पराजय झाला. ह्या लढाईवरून ही जागा फार प्रसिद्ध आहे.

**थीब्स.**–वरच्या आफ्रिकेंत ह्मणजे दक्षिण आफ्रिकेंत हें फरोहा प्रांताचें मुख्य शहर होतें.

**थ्रेस.**–हा देश युरोपांत स्कुथ देशाचे दक्षिणेस हीमस पर्वतापर्यंत होता. ह्याच्या मर्यादा येणेंप्रमाणें. दक्षिणेस ईजियन समुद्र. पश्चिमेस मासादोन देश आणि स्त्रैमान नदी. पूर्वेस युक्झैन समुद्र आणि प्रापांतिस आणि हेलेस्पांत ह्या सामुद्रधुन्या.

**दच.**–हालंद देशांतले लोक.

**देन.**– देनमार्क देशांतलें लोक.

**दोरी.**–ग्रीस देशांतल्या फोकिस, थिसाली, आणि आकर्नैनिया ह्या प्रांतांच्या मधल्या भागास दोरिस असें पूर्वी ह्मणत. हल्लीं ग्रीस देशांत पुष्कळ जागांस हें नांव लागतें. ह्यावरून ग्रीक लोकांला दोरी ह्मणजे "दोरिस भागांतले" असें नांव पडलें आहे.

**निकोमेदी.**–आशिया मैनरांतील बिथिनी प्रांताचें मुख्य शहर होतें. हल्लीं त्यास इजनिकामिद म्हणतात.

**निनवी.**–(निनवे). हें तुर्कस्थानांत तैग्रिस नदीच्या पूर्व किनाऱ्यावर शहर होतें. हल्लीं तेथें ननी ह्मणून खेडें आहे.

**निमराद.**–असूर देशचे राज्याचा स्थापक.

**नेपल्स.**–हें ह्याच नांवाचे राज्याचें मुख्य शहर भूमध्य समुद्राचे किनाऱ्यास एका वांकणावर आहे. ह्याला नापोली असेंही ह्मणतात.

**नबुखद्रेस्सर.**–(नेबुकद्रेजर). हा बाबुलोनचा राजा होता.

**पर्सेपालिस.**–हें इराणचे राजधानीचें शहर होतें. तें शिकंदर बादशाहानें दारयावेश राजा जिंकल्यावर धुळीस मिळविलें. हल्लीं त्यास एस्तकर किंवा तेहेलमिवर ह्मणतात.

**पांतस.**–आशिया मैनरांत ईशान्येकडचा एक प्रांत होता.

**पांपी.**–रोमन लोकांचा मोठा सरदार होता. हा जूलियस सीझरचा प्रतिस्पर्धी होता.

**पार्थी.**–१ (पार्थिया). आशिया खंडांत एक देश होता. त्याच्या मर्यादा येणेंप्रमाणें. पश्चिमेस मेदी देश आणि दक्षिणेस कार्मनी देश. उत्तरेस हर्कनी देश आणि पूर्वेस आर्य वगैरे देश.

२. पार्थी देशांतले लोक.

**पालिनोशिया.**–पासिफिक महासागरांत मकरवृत्त आणि कर्कवृत्त ह्यांच्या मध्यें जे बेटांचे पुंजके आहेत त्यांस ह्मणतात.

**पालिस्तैन.**–हा देश सूर देशाच्या दक्षिणेस भूमध्य समुद्राचे किनाऱ्याच्या लगत्यास आहे. ख्रिस्ती लोकांचा प्रभु जो येशूख्रिस्त त्याचा जन्म ह्या देशांत झाला. ह्मणून

ह्याची त्या लोकांत फार मान्यता आहे. ह्या देशांत प्राचीन फीनिकी देश मोडत होता.

**प्लाती.**–ग्रीस देशांत बियोशिया प्रांतांत हें गांव होतें. येथें इ० स० पू० ४७९ वे वर्षीं ग्रीक आणि इराणी ह्या लोकांची लढाई होऊन ग्रीक लोकांचा जय झाला.

**पेलापोनीसस.**–ग्रीक देशाच्या अगदीं दक्षिण भागाच्या द्वीपकल्पास ह्मणतात. पीलाप्स ह्मणून लोक येथें येऊन राहिले होते. त्यावरून हें नांव (ह्मणजे पीलाप्स लोकांचें बेट) पडलें आहे. हल्लीं ह्याचें नांव मोरिया आहे. लातिन भाषेंत मोरस हें तुतीचे झाडाचें नांव आहे. हीं झाडें येथें पुष्कळ आहेत म्हणून आतां मोरिया ह्मणतात.

**फीनिकी.**–(फीनिश्या). हा देश आशिया खंडांत भूमध्य समुद्राचे पूर्वेस होता. ह्याच्या मर्यादा निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या होत्या. फिनिक्स ह्मणून येथला राजा होता त्यावरून हें नांव पडलें आहे.

**फ्रांक.**–युरोपाचे पश्चिमभागीं राहणारे जे लोक त्यांस तुर्क, ग्रीक, आणि अरब ह्या लोकांनीं दिलेलें नांव होतें.

**बाक्त्री.**–१ (बाक्त्रिया). इराणच्या पूर्वभागास हा देश पूर्वीं होता. जरतुष्ट येथला राजा होता.

२. ह्या देशांतले लोक.

**बाबुलोन.**–(बाबिलन). हें असूर देशचे साम्राज्यांतील बाबुलोनी ह्मणजे खाल्दी प्रांत ह्याचें मुख्य शहर युफ्रातिस नदीच्या कांठीं आहे. शिकंदर बादशाह येथें मरण पावला.

**ब्रितनी.**–हा फ्रान्स देशचा एक प्रांत अतलांतिक महासागरांत पुढें आलेलें ह्या नांवाचें एक द्वीपकल्प होतें तेथें होता. ह्यास ब्रीतन असेंही म्हणतात.

**बेजंतियम**.–हें युरोपांत थ्रेस देशांत शहर होतें. ह्याला कान्स्तन्तैन बादशाहानें कान्स्तान्तिनोपल हें नांव दिलें होतें. हें पूर्वेकडील रोमचे साम्राज्याचें मुख्य शहर होतें.

**मक्काबी**.–यहुदी लोकांचा एक भेद.

**मागी**.–पूर्वेकडील देशांत धर्मनिष्ठ लोक होते त्यांस ह्मणत. हे विशेषेंकरून इराणांत होते. ह्यांचा धर्मकृत्यांत व राज्यकारभारांतही हात असे. ह्यांचा मुख्य प्रवर्तक जरतुष्ट होता.

**मायकेल**.–हें शहर आशिया मैनरांत सामोस बेटासमोर होतें. येथें इ० स० पू० ४७९ वे वर्षीं ग्रीक आणि इराणी ह्या लोकांची लढाई होऊन ग्रीक लोकांचा जय झाला. हें शहर ह्या लढाईवरून प्रसिद्ध आहे.

**माराथन**.–हें खेडें आतिका प्रांतांत आथेन्स शहरापासून दहा मैलांवर होतें. येथें इ० स० पू० ४९० वे वर्षीं ग्रीक आणि इराणी ह्या लोकांची लढाई होऊन ग्रीक लोकांचें सैन्य थोडें होतें तरी त्यांनीं इराणी लोकांस जिंकिलें. ह्या लढाईवरून हें गांव प्रसिद्ध आहे.

**मासिदोन**.–हा थ्रेस, इपैरस, आणि ग्रीस ह्यांच्या मध्यें प्रांत होता.

**मेदी**.–१ (मीदिया). कास्पियन समुद्राचे दक्षिणेकडचा इराणचा भाग. ह्याला पूर्वी आर्य असें ह्मणत. येथें कोणी मीद्स ह्मणून एक राजा झाला होता त्यावरून हें नांव ह्या भागाला पडलें आहे. ह्याच्या मर्यादा येणेंप्रमाणें. उत्तरेस कास्पियन समुद्र, पश्चिमेस अर्मनी देश, दक्षिणेस इराणी देश, आणि पूर्वेस पार्थी आणि हर्कानी हे देश. २. ह्या देशांतले लोक.

**मेरियस.**–रोमन लोकांचा एक मुख्य सरदार होता.

**मेरोविंजियन.**–मेरोवियस नामक मूळपुरुषावरून हें नांव फ्रेंच राजांच्या एका घराण्यास पडलें आहे. मेरोवियस हा इ० स० ५ व्या शतकांत झाला होता.

**मेसापोतामिया.**–युफ्रातिस आणि तैग्रिस ह्या नद्यांच्या मधला देश, मेसस ह्मणजे मध्य आणि पातमस ह्मणजे नदी ह्या दोन ग्रीक शब्दांवरून हें नांव झालें आहे. हल्लीं ह्याला दायर बकर असें ह्मणतात.

**मोंगोलिया.**–हा देश चिनईतातरीमध्यें मांचूरिया देशाचे पश्चिमेस असून तिबेत व खास चीन ह्यांच्या उत्तरेस आणि सैबेरियाच्या दक्षिणेस आहे. हा उंचवट्याचा देश आशिया खंडाच्या मध्यभागीं आहे.

**यरूशालेम.**–(जरूजलेम). हें शहर पालिस्तैन देशांत [illegible] यहुदी आणि ख्रिस्ती ह्या लोकांचा इतिहास झाला तो सर्व येथेंच झाला ह्यावरून हें शहर फार प्रसिद्ध आहे.

**यूक्झैन.**–काळ्या समुद्राचें प्राचीन नांव.

**रावेना.**–आद्रियातिक समुद्राचे कांठीं इतालींतलें हें शहर होतें. हें इतालीचें कांहीं दिवस मुख्य शहर होतें. हें शहर दलदल जमिनीमध्यें आहे.

**लिगूरिया.**–इतालीमध्यें हा पश्चिमेस प्रांत होता.

**लिब्या.**–(लिबिया). हें आफ्रिकेंतल्या एका प्राचीन देशाचें नांव होतें. ह्याच्या मर्यादा पूर्वेस मिसर देश आणि पश्चिमेस हल्लीं ह्मणतात तें त्रिपोलीचें राज्य.

**लुदीदेश.**–(लिदिया). हें आशिया मैनरचें एक राज्य होतें. ह्याच्या मर्यादा निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या होत्या. ह्याला प्राचीन काळीं मिओनिया ह्मणत. पुढें लुदस